# योजना कल्याणकारी
# सर्वसामान्यांच्या दारी!




अंमलबजावणी
## वेगवान



**महाराष्ट्र राज्य** हे सर्वांगाने संपन्न असे राज्य आहे. कृषी, आरोग्य, शिक्षण, उद्योग, पर्यटन यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये महाराष्ट्र हे राज्य कायम आघाडीवर राहिले आहे. महाराष्ट्राला सातत्याने प्रगतिपथावर ठेवण्याचे काम येथील कष्टकरी, शेतकरी आणि कामगारांनी केले आहे. लोकांचे हित हा एकच अजेंडा घेऊन काम करत असलेल्या या सरकारला त्यामुळेच सामान्यांच्या मनात स्थान मिळाले आहे. शासनाच्या वतीने विविध कल्याणकारी योजना राबविल्या जात असल्याने राज्यातील जनतेचे भविष्य उज्ज्वल आणि जीवन सुखमान होण्यास नक्कीच मदत होणार असल्याचा विश्वास आहे.



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**महाराष्ट्र राज्याला** प्रगतीच्या वाटेवर ठेवण्याचे काम आपले सरकार करत आहे. राज्यातील जनतेच्या हिताचे अनेक निर्णय सरकार घेत असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठीही सरकार कटीबद्ध आहे. केंद्र आणि राज्याच्या संयुक्त विद्यमाने राज्यभरात राबविण्यात येणाऱ्या अनेक कल्याणकारी योजना सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान अधिक सुखकर करत असतात. याच हेतूने आपले सरकार काम करत असून येत्या काळात शासनाची प्रत्येक योजना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे सरकारचे ध्येय आहे.



**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

सर्वसमावेशक विकासाची संकल्पना घेऊन शासन काम करत आहे. पायाभूत सुविधा, कृषी , आरोग्य, सामाजिक न्याय, महिला, आदिवासी विकास, शिक्षण अशा विविध क्षेत्रांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजना राज्यातील प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सरकारसमवेत प्रशासनही प्रयत्नशील आहे.



**अजित पवार**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

संकल्पना व माहिती संकलन

## मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष

प्रकाशक

## माहिती व जनसंपर्क
## महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# अनुक्रमणिका

१. अर्थसंकल्प २०२३-२४

२. कृषी विभाग

३. पशुसंवर्धन विभाग

४. मत्स्यव्यवसाय विभाग

५. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

६. आदिवासी विकास विभाग

६. स्वयंरोजगार योजना

७. कामगार विभाग

८. आवास योजना

९. सार्वजनिक आरोग्य विभाग

१०.शालेय शिक्षण विभाग

११. मुख्यमंत्री साहाय्यता निधी

## विकासाचे
## पंचामृत असलेला

₹

# अर्थसंकल्प
# २०२३-२४





## प्रथम अमृत

# शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी

### २९ हजार २६३ कोटी रुपयांची तरतूद

- अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी 'नमो शेतकरी महासन्मान निधी' केंद्र सरकारच्या प्रतिवर्ष, प्रतिशेतकरी ६ हजार रुपयांत राज्य सरकारची आणखी ६ हजार रुपयांची भर.
- प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकऱ्यांचा विमाहप्ता राज्य सरकार भरणार. शेतकऱ्यांना केवळ १ रुपया भरून नोंदणी. वार्षिक ३ हजार ३१२ कोटी रुपयांची तरतूद.
- छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना लाभ देणार.
- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत १५ फेब्रुवारी २०१३ पर्यंत १२.८४ लाख पात्र खातेधारकांच्या बँक खात्यात ४ हजार ६८३ कोटी रुपये हस्तांतरित.
- महाकृषीविकास अभियान जिल्हानिहाय शेतकरी गट, समूहांसाठी एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा. आगामी ५ वर्षांत या योजनेसाठी ३ हजार कोटी रुपये
- धान्याची विक्री न तपासता ७/१२ नोंदीवरील लागवडीच्या क्षेत्रप्रमाणात डीबीटीद्वारे दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी १५ हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम.
- नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानासाठी शेतकऱ्यांना एसडीआरएफच्या दुप्पट दराने मदत - बाधित शेतकऱ्यांना ७ हजार ९३ कोटी रुपये निधी वितरित. सततच्या पावसासाठी मदतीचा निकष नव्याने समाविष्ट
- गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना. विमा योजनेऐवजी अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबास २ लाख रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान.
- 'महाराष्ट्र श्रीअन्न अभियान' २०० कोटी रुपये तरतूद. श्रीअन्नाच्या उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा प्रसार, पीक प्रात्यक्षिके, यांत्रिकीकरण प्रक्रिया, मूल्य साखळी विकास आणि प्रचार प्रसिद्धी सोलापूर येथे 'श्रीअन्न उत्कृष्टता केंद्राची' स्थापना.
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या ठिकाणी शेतकरी बांधवांना मुक्कामाची व शिवभोजन थाळीची सोय.
- देशी गोवंशाच्या संवर्धनासाठी भ्रूण बाह्यफलन व प्रत्यारोपणाच्या सुविधेत वाढ. महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना. 'गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना' आणि 'गोमय मूल्यवर्धन योजना' या योजनांची अंमलबजावणी.
- राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून मेंढी, शेळी पालनाकरिता १० हजार कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र मेंढी व शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना मुख्यालय अहमदनगर.

- धनगर समाजाच्या उन्नतीकरिता आदिवासी उपयोजनेच्या धर्तीवर २२ योजनांसाठी एक हजार कोटी रुपये किमतीचा कार्यक्रम.त्याकरिता सर्वसाधारण योजनेतून आवश्यक निधी.
- विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना आता अन्नधान्याऐवजी प्रतिवर्ष, प्रतिव्यक्ती १८०० रुपये रोख रक्कम.
- नदीजोड प्रकल्प- मुंबई शहर आणि गोदावरी खोऱ्यातील तूट दूर करण्यासाठी नदीजोड प्रकल्प राज्य शासनाच्या निधीतून करण्यात येतील. मराठवाड्यासहित उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर आणि जळगाव या जिल्ह्यांना फायदा.
- वैनगंगा-नळगंगा-पैनगंगा नदीजोड प्रकल्पातून विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा व वाशिम या जिल्ह्यातील अवर्षणप्रवण क्षेत्रात पाणी वळविण्यात येईल.
- कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी ११ हजार ६२६ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता. धाराशिव व बीड जिल्ह्यातील १३३ गावांना लाभ.
- सन २०२३-२४ मध्ये गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पास १ हजार ५०० कोटी रुपये निधी. हा प्रकल्प जून २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात येईल.
- कोकणामध्ये सिंचनाच्या सोयीसुविधा निर्माण करण्याकरिता एक विशेष कृती कार्यक्रम
- मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीसाठी सिंचन, पिण्याच्या पाण्याच्या सततच्या समस्येवर मात करण्यासाठी प्रथम, द्वितीय व तृतीय वॉटर ग्रीड निर्माण करणार 'हर घर जल' योजनेंतर्गत मराठवाडा वॉटर ग्रिडचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेकरिता पाठविला.
- नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन. आगामी ३ वर्षांत २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली १,००० जैवनिविष्ठा स्त्रोत केंद्रांची स्थापना.
- 'मागेल त्याला शेततळे' योजनेचा विस्तार. मागेल त्याला फळबाग, ठिबक सिंचन, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणीयंत्रे आणि कॉटन श्रेडर १ हजार कोटी रुपये.
- सुमारे २०० कोटी रुपयांच्या भागभांडवलासह कोकणासाठी काजू बोर्डाची निर्मिती.
- 'काजू फळ विकास योजना' संपूर्ण कोकण, कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा या तालुक्यांत राबविण्यात येईल. आगामी ५ वर्षांत १ हजार ३२५ कोटी रुपये.
- शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होण्यासाठी आगामी ३ वर्षांत ३० टक्के कृषी वीजवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण सुमारे ९.५० लाख शेतकऱ्यांना लाभ. प्रधानमंत्री कुसुम योजनेतून १.५० लाख सौर कृषी पंप.
- नादुरुस्त विद्युत ट्रान्सफॉर्मर्स तत्काळ बदलण्यासाठी 'निरंतर वीज योजना.
- सन २०२३ - २४ मध्ये जल जीवन मिशन अंतर्गत १७ लाख ७२ हजार कुटुंबांना नळजोडणी.
- जलयुक्त शिवार योजना २.० प्रारंभ करून ती ५ हजार गावांमध्ये राबविण्यात येणार.

# द्वितीय अमृत



## महिला, आदिवासी, मागासवर्ग, ओबीसींसह सर्व समाजघटकांचा सर्वसमावेशक विकास

- 'मोदी आवास' घरकुल योजना इतर मागासवर्गीय लाभार्थ्यांसाठी येत्या तीन वर्षात १० लाख घरे बांधणार. या योजनेसाठी येत्या ३ वर्षात १२ हजार कोटी रुपये उपलब्ध करून देणार.
- 'लेक लाडकी' - पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबातील मुलींच्या जन्मानंतर, - इयत्ता पहिली, सहावी, अकरावीच्या टप्प्यांवर ४ ते ८ हजार रुपये अनुदान - १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रुपये रोख रक्कम देणार.
- महिलांना एसटी बस तिकिटात ५० टक्के सवलत.
- नोकरदार महिलांसाठी ५० वसतिगृहे.
- पीडित महिलांच्या आश्रयासाठी विधी सेवा, आरोग्य सेवा, समुपदेशन यासाठी नवीन शक्तीसदन योजनेत ५० केंद्रे स्थापन करणार.
- आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकांच्या मानधनात प्रत्येकी १ हजार ५०० रुपये ऐवढी वाढ करणार.
- अंगणवाडी सेविकांचे मानधन १० हजार रुपये, मिनी अंगणवाडी सेविकांचे मानधन ७ हजार २०० रुपये आणि अंगणवाडी मदतनीसांचे मानधन ५ हजार ५०० रुपये करणार.
- अंगणवाडी, मिनी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांची २० हजार रिक्त पदे भरणार.
- महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेत उपचाराची मर्यादा वार्षिक १.५० लाखांवरुन ५ लाख रुपये करणार. मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या दरात २.५० लाखांहून ४ लाख रुपये इतकी वाढ करणार.
- संपूर्ण राज्यात हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना' - ७०० दवाखाने सुरु करणार - विनामूल्य वैद्यकीय चाचण्या, चिकित्सा व उपचार.
- संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्यनिवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांचे अर्थसाहाय्य १,००० वरून १,५०० रुपये. महिन्याच्या पहिल्या आठवड्यात प्रदान करणार.
- लिंगायत समाजाच्या उन्नतीसाठी 'जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ', गुरव समाजासाठी 'संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ', रामोशी समाजासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ, वडार समाजासाठी पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ यांची स्थापना.
- असंघटित क्षेत्रातील ३ कोटीहून अधिक कामगारांना लाभ देण्यासाठी महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण मंडळ स्थापन करणार.
- राज्यातील ऑटोरिक्षा, टॅक्सीचालक व मालकांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याकरिता 'महाराष्ट्र राज्य ऑटोरिक्षा व टॅक्सी चालक-मालक कल्याणकारी महामंडळ' स्थापन करणार.

# तृतीय अमृत



## भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधा विकास

- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा विस्तार करून सिंदखेडराजा नोड ते शेगावपर्यंत चौपदरी महामार्ग बांधणार.
- महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग (पवनार ते पात्रादेवी) नागपूर- गोवा शिघ्रसंचार द्रुतगती महामार्ग. ८६ हजार ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित.
- पुणे रिंगरोडचे भूसंपादन, मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली ते खंडाळा या घाट लांबीतील मिसिंग लिंकचे बांधकाम, विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका, ही कामे करणार. रेवस ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेड्डी या सागरी महामार्गाचे काम सुरू.
- सार्वजनिक बांधकाम विभागाकडून एशियन डेव्हलपमेंट बँक, हायब्रीड ॲन्युईटी व इतर नियमित योजनांमधून सुमारे १८ हजार किलोमीटर लांबीची रस्ते सुधारणा आणि ४ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या जिल्हा व ग्रामीण मार्गांची कामे हाती घेणार.
- मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद शेत रस्ते योजनेत सुधारणा करून नवीन योजना सुरू करणार.
- ठाणे शहराचा वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प, नाशिक मेट्रो निओ प्रकल्प, पुणे मेट्रोच्या पिंपरी- चिंचवड ते निगडी कॉरिडॉर आणि स्वारगेट ते कात्रज मेट्रो प्रकल्प. केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर प्रकल्पांची कामे हाती घेणार.
- कल्याण-मुरबाड, नाशिक-पुणे या सेमी हायस्पीड, सोलापूर-तुळजापूर-धाराशिव, नांदेड- बिदर, फलटण-पंढरपूर, खामगाव-जालना तसेच वरोरा- चिमूर-कांपा या नवीन रेल्वेमार्गासाठी ५० टक्के राज्यहिस्सा देणार.
- शिर्डी विमानतळ येथे नवीन प्रवासी टर्मिनल, छत्रपती संभाजीनगर विमानतळाच्या भूसंपादनासाठी ७३४ कोटी रुपये निधी, नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विस्तार व पुरंदर येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नियोजन.
- नागपुरातील मिहान प्रकल्पासाठी १०० कोटी रुपये, अमरावतीतील बेलोरा आणि अकोल्यातील शिवणी या विमानतळांच्या कामाचे नियोजन करणार.
- मुंबई मेट्रो मार्ग १०, ११ व १२ हे प्रकल्प लवकरच पूर्ण करणार.
- मुंबई सभोवताल जलवाहतुकीसाठी ठाणे व वसई खाडी एकमेकांना जोडणार, दक्षिण मुंबईहून कल्याण, डोंबिवली, ठाणे, वसई खाडी, नवी मुंबई अशी जलमार्गाने प्रवासी वाहतूक करण्याकरिता जेट्टी व संबंधित सुविधा उभारणार.

# चतुर्थ अमृत



## रोजगार निर्मिती: सक्षम, कुशल रोजगारक्षम युवा

- महाराष्ट्राच्या नवीन लॉजिस्टिक धोरणांतर्गत नागपूर येथे १ हजार एकर जमिनीवर लॉजिस्टीक हब तयार करणार.
- केंद्र शासनाच्या रिड्यूस, रियूज, रिसायकल या तत्त्वावर आधारित नागपूर, मुंबई महानगर प्रदेश, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व रत्नागिरी या सहा ठिकाणी सर्क्युलर इकॉनॉमी पार्क उभारणार.
- नवी मुंबई येथे भव्य जेम्स व ज्वेलरी पार्क उभारणार.
- स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंरोजगाराकरिता ५०० ग्रामपंचायतींमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करणार.
- पुढील तीन वर्षात २ हजार ३०७ कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करून राज्यातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करणार.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार ८१६ शाळांना 'पीएमश्री शाळा' म्हणून विकसित करणार. पुढील पाच वर्षात १ हजार ५३४ कोटी रुपये निधी उपलब्ध करणार.
- सातारा, अलिबाग, सिंधुदुर्ग, धाराशिव, परभणी, अमरावती, भंडारा, जळगाव, रत्नागिरी, गडचिरोली, वर्धा, बुलढाणा, पालघर आणि ठाणे जिल्ह्यांतील अंबरनाथ या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालये बांधणार.
- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने दहा पर्यटनस्थळांवर 'टेंट सिटी' उभारणार.
- प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेत ४ लाख ८५ हजारांहून अधिक तरुणांनी प्रशिक्षण पूर्ण केले. २ लाख ८१ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना गटशेती व्यावसायिकांच्या नोकरीसाठी प्रशिक्षित प्रमाणित केले. यातूनच ३०० शेतकरी उत्पादक गटांची स्थापना झाली.
- गावांकडून शहरांकडे होणारे स्थलांतर थांबावे यासाठी स्थानिक पातळीवरील रोजगार व स्वयंरोजगाराकरिता ५०० ग्रामपंचायतींमध्ये कौशल्य विकास कार्यक्रम सुरू करण्यात येईल.
- लहान मुलांमध्ये कौशल्य शिक्षणाची आवड निर्माण व्हावी म्हणून महानगरपालिका व जिल्हा परिषद शाळांमध्ये कौशल्य प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येतील. शैक्षणिक वर्ष २०२३- २४ पासून मुंबईतील २०० शाळांमध्ये प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात येईल.
- कौशल्यवर्धनाद्वारे युवक रोजगारक्षम बनवण्याकरिता पुढील तीन वर्षात २ हजार ३०७ कोटी रुपयांची अतिरिक्त गुंतवणूक करून राज्यातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ करण्यात येईल. तसेच ७५ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण करण्यासाठी ६१० कोटी रुपयांचा प्रकल्प राबवण्यात येईल.



## पंचम अमृत

### पर्यावरण पूरक विकास

- हरित हायड्रोजन, हरित अमोनिया, सौर व पवन ऊर्जा या क्षेत्रात ७५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित.
- २० हजार ग्रामपंचायतीमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प उभारणार.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा प्राणी संग्रहालयात आफ्रिकन सफारी व पक्षी उद्यान येत्या वर्षी सुरू करणार. शिवनेरी, ता. जुन्नर, जि. पुणे येथे बिबट सफारी सुरू करणार.

## स्मारके व इतर योजना

- शिवराज्याभिषेक महोत्सव आयोजित करण्यास ३५० कोटी रुपये.
- आंबेगाव, ता. हवेली, जि. पुणे येथे छत्रपती शिवाजी महाराज संकल्पना उद्यान उभारण्यासाठी ५० कोटी रुपये.
- मुंबई, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथे दृकश्राव्य माध्यम सुविधेसह सार्वजनिक उद्याने. छत्रपती शिवाजी महाराजांची जीवनगाथा २५० कोटी रुपये.
- छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान किल्ले शिवनेरीवर महाराजांच्या जीवनचरित्रावर संग्रहालय. शिवकालीन किल्ल्यांच्या संवर्धनासाठी ३०० कोटी रुपये.
- स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ मौजे तुळापूर, ता. हवेली व समाधी स्थळ वढु (बु.), ता. शिरुर, जिल्हा पुणे येथील स्मारकासाठी आवश्यक निधी देणार.
- कीर्तनकार, प्रवचनकार, निरूपणकार यांच्यासाठी श्रीसंत नामदेव महाराज कीर्तनकार सन्मान योजना राबविणार.
- महाराष्ट्रातील पाचही ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र व परिसर विकासाची कामे हाती घेणार, प्राचीन मंदिरांच्या जतन व संवर्धनाच्या कामांकरिता ३०० कोटी रुपये तरतूद करणार.
- श्री. चक्रधर स्वामी अष्टशताब्दी जन्मोत्सवानिमित्त महानुभाव पंथाच्या दृष्टीने महत्त्वाच्या रिद्धपूर, काटोल, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, नांदेड, पांचाळेश्वर, पैठण इत्यादी देवस्थानांच्या ठिकाणी विकासासाठी भरीव तरतूद करणार.
- श्रीक्षेत्र रिद्धपूर, जि. अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करणार.

# कृषी विभाग



# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत-

- फळझाडे , वृक्ष , फुलपिके, औषधी वनस्पती, मसाला पिके लागवड तसेच गांडूळ खत

## लागवड कोणत्या ठिकाणी करता येते

- वैयक्तीक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर-फळझाडे लागवड/वृक्ष लागवड व फुलपिके लागवड
- वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेताच्या बांधावर-फळझाडे लागवड / वृक्ष लागवड
- वैयक्तीक लाभार्थ्यांच्या पडीक शेत जमिनिवर-फळझाडे लागवड / वृक्ष लागवड

## लाभार्थी पात्रता-



- अनुसूचित जाती
- अनुसूचित जमाती
- भटक्या जमाती
- विमुक्त जमाती
- दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे
- स्त्री कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे
- दिव्यांग व्यक्ती कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे
- भुसुधारक योजनेचे लाभार्थी
- प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण योजनेखालील लाभार्थी
- अनुसूचित जमातिचे व अन्य परंपरागत वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ नुसार पात्र व्यक्ती.
- कृषी कर्ज माफी योजना २००८ नुसार-

i.लहान शेतकरी (१ हेक्टर पेक्षा जास्त परंतू २ हेक्टर पर्यंत जमीन असलेले) (जमीन मालक व कूळ) सिमांत शेतकरी

ii. सिमांत शेतकरी(१ हेक्टर पर्यंत जमीन असलेले शेतकरी) (जमीन मालक व कूळ).

अनुसूचित जाती अनुसूचित जमाती भटक्या जमाती, विमुक्त जमाती,दारिद्र्य रेषेखालील इतर कुटुंबे, स्त्री कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे, दिव्यांग व्यक्ती कुटुंबप्रमुख असलेली कुटुंबे या प्रवर्गांना वैयक्तिक लाभाच्या योजनेच्या पात्रतेसाठी जमिनीची कमाल मर्यादेची अट लागू नाही.

लाभार्थी स्वत: साठी जॉब कार्ड धारक असावा. सदर योजना राबविण्या करीता तो स्वत:/ कुटुंबातील कार्यक्षम व्यक्ती प्रमाणीत मजुर म्हणुन घोषित करणे आवश्यक. लागवडी साठी खड्डे खोदणे, लागवड करणे, पाणी देणे, औषधे फवारणे लाभधारकाने स्वत: व जॉबकार्ड धारक मजुरांकडून करुन घेणे आवश्यक आहे.

## क.क्षेत्र मर्यादा-

फळझाड फळपीक व वृक्ष लागवडीसाठी किमान ०.०५ हेक्टर व कमाल २ हेक्टर प्रती लाभार्थी क्षेत्र मर्यादा आहे.

इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. ही जमीन कूळ कायद्या खाली येत असल्यास व ७/१२ वर कुळाचे नाव असेल तर योजना कुळाच्या संमतीने राबविण्यात येते.

## ड) अर्ज कुठे करावा-

ग्रामपंचायत कार्यलयात. तसेच प्रत्येक महसूली गावात २४ तास अर्ज टाकता येईल अशा सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी (उदा. अंगणवाडी शाळा ग्रामपंचायत समाजमंदिर इ.) अर्ज पेटी ठेवण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ऑनलाइन अर्जाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## इ.)अर्ज कोणत्या नमुन्यात करावा-

प्रपत्र-अ व प्रपत्र-ब मध्ये.

योजनेचे काम ग्रामपंचायत विभाग ,कृषी विभाग व सामजिक वनीकरण विभागामार्फत करण्यात येते. यापैकी कोणत्या विभागामार्फत काम करायचे आहे ही निवड करण्याचा अधिकार लाभार्थीस आहे. फळपिके व् फुलपिके लागवड ग्रामपंचायत विभाग / कृषी विभाग मार्फ़त करण्यात येते. तसेच वृक्ष लागवड सामाजिक वनीकरण विभागामार्फत करण्यात येते.



## ई.) अर्जांना मान्यता कोण देतात -

अर्जांना मान्यता ग्रामपंचायत/ ग्रामसभा देते.
ग्रामपंचायतीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर कामास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता शेतकऱ्यांनी दिलेल्या पसंतीनुसार ग्रामपंचायत विभाग /कृषि विभाग तसेच वृक्ष लागवडीस सामजिक वनीकरण मार्फत मान्यता देण्यात येऊन फळबाग/ वृक्ष व फूलपिक लागवड सुरू केले जाते.
अंदाजपत्रके तयार करणे-कृषी सहाय्यक/ तांत्रिक सहाय्यक पं.स./ वनक्षेत्रपाल
अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देणे- मंडळ कृषी अधिकारी/ कृषी अधिकारी पं.स./ सामाजीक वनीकरण विभागाचे सक्षम अधिकारी
अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे- तालुका कृषी अधिकारी/ गट विकास अधिकारी/ सामाजीक वनीकरण विभागाचे सक्षम अधिकारी.

## फ) अर्ज करण्याचा कालावधी -

अर्ज वर्षभर करता येतो. मात्र १५ जुलै ते ३० नोव्हेंबर या कालावधीत आलेले अर्ज मंजूर करून त्या वर्षाच्या लेबर बजेट मध्ये समाविष्ट केले जातील.
ज्या लाभार्थ्यांचे नाव वरील लेबर बजेट मध्ये समाविष्ट झाले नाही व सदर लाभार्थी योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक आहेत, अशा लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याकरीता पूरक लेबर बजेट तयार करण्यात येते. त्याकरीता १ डिसेंबर ते पुढील वर्षाचे १४ जुलै पर्यंत प्राप्त अर्ज त्या त्या महिन्याच्या पंचायत
**सभेत मान्यता घेऊन पंचायत समितीस मान्यतेसाठी पाठवण्यात येतील. व त्यापुढील होणाऱ्या ग्रामसभेस सदर यादी अवलोकनार्थ ठेवण्यात येईल.**

## ग) आवश्यक कागदपत्रे-



७/१२ उतारा
८ अ उतारा
आधार कार्ड
राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक झेरॉक्स
जॉब कार्ड
दारिद्र्य रेषेखाली असल्यास तो दाखला,
जातीचा दाखला किंवा जातीचा उल्लेख असलेली कोणतेही अधिकृत शासनाचे पुरावे.

## ह) कलमे रोपे खरेदी कोठून करावीत-

कलमे रोपे निवड व खरेदी व वाहतूक लाभार्थी यांनी स्वत: करावी. कलमे/ रोपे दर्जाबाबतची जबाबदारी लाभार्थींची राहील. लाभार्थ्यांने कलमे/ रोपे खरेदी करताना खालीलप्रमाणे रोपवाटीकांना प्राधान्य द्यावे.

१. कृषी विभागाच्या रोपवाटीका
२ .कृषी विद्यापीठाच्या रोपवाटिका-कृषी विभागाच्या रोपवाटीका खाजगी शासन मान्यता प्राप्त (पंजीकृत) रोपवाटिका, सामाजिक वनीकरण विभाग किंवा अन्य शासकीय विभाग रोपवाटिकांवर फळरोपे/ फूलरोपे /औषधी वनस्पती तसेच मसाला पीके यांची रोपे उपलब्ध नसल्यास लाभार्थीने स्वतःच्या जबाबदारीवर खरेदी करुन मंडळ कृषि अधिकारी यांनी बिले प्रमाणित करावीत. त्यासाठी मंजूर दराप्रमाणे अनुदान देय राहील.
३. खाजगी शासन मान्य रोपवाटिका
४. सामाजिक वनीकरण विभाग किंवा अन्य शासकीय रोपवाटिका
परवानाधारक खाजगी रोपवाटीकेवरुन कलमे/ रोपे खरेदी करावयाची गरज पडल्यास मा. आयुक्त कृषी यांनी लागू केलेल्या दराने खरेदी करता येईल.
कलमे/ रोपे उपलब्धतेबाबतच्या अद्यावत माहितीसाठी National Nursery Portal च्या nnp.nhb.gov.in या संकेतस्थळाचा वापर करण्यात यावा.
खते औषधे व इतर साहित्य शेतकरी यांनी स्वत: खरेदी करुन खरेदीच्या पावत्या सादर करणे आवश्यक आहे.

## इ) योजनेत समाविष्ट फळपीके/वृक्ष/फुलपिके-

► आंबा ► काजू ► चिकू ► पेरू ► डाळिंब ► संत्रा ► मोसंबी ► कागदी लिंबू ► नारळ ► बोर ► सिताफळ ► आवळा ► चिंच (विकसित जाती) ► कवठ ► जांभूळ ► कोकम ► फणस ► अंजीर ► सुपारी ► बांबू ► साग ► जट्रोफ़ा ► गिरिपुष्प ► कडीपत्ता ► कडूलिंब ► सिंधी ► शेवगा ► हादगा ► पानपिंपरी ► केळी(3 वर्ष) ► ड्रैगन फ्रुट ► अव्हाकडो ► द्राक्ष ► चंदन ► खाया ► निम ► चारोळी ► महोगनी ► बाभुळ ► अंजन ► खैर ► ताड ► सुरु ► रबर ► महारुख ► मैंजियम ► मिलियाडुबीया ► तूती ► ऐन ► शिसव ► नीलगिरी ► सुबाभूळ ► शमी ► महुआ ► गुलमोहर ► बकान निब ► चिनार ► शिरीष ► करवंद



## फुलझाडे

१) गुलाब २) मोगरा ३) निशिगंध ४) सोनचाफा

## औषधी वनस्पती -

१)अर्जुन, २) असन, ३)अशोक, ४) बेहडा, ५) हिरडा ,६) बेल, ७)टेटू,८) डीकेमाली, ९) रक्त चंदन, १०) रिठा, ११)लोध्रा, १२)आइन, १३)शिवन, १४) गुग्गुळ, १५) बिब्बा १६) करंज

## मसाला पिके -

१) लवंग २) मिरी ३) दालचीनी ४) जायफळ

## ज) लागवडीपूर्वी माती परिक्षण आवश्यक आहे आहे का-

शेतजमिनीच्या प्रतवारीनुसार सुयोग्य फळपिके/फुलपिके/वृक्ष यांची निवड करण्यात येते लिंबू वर्गीय फळपिकांसाठी चुनखडी प्रमाण योग्य असणे आवश्यक असल्याने माती परिक्षण करणे आवश्यक आहे. बाकीच्या पिकांसाठी माती परिक्षण आवश्यक नाही.

## क ) अनुदान किती व कसे मिळेल-

**खालीलप्रमाणे अनुदान हे ३ वर्षात मिळेल.**

- दुसर्या व तीसरे वर्षी बागायती पिकांचे बाबतीत जे लाभार्थी कमीत कमी ९० टक्के व कोरडवाहू पिकांच्या बाबतीत किमान ७५ टक्के झाडे जिवंत ठेवतील अशाच लाभार्थ्यांना दुसर्या व तीसरे वर्षाचे अनुदान देय आहे.
- वैयक्तीक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर निशीगंध, मोगरा ,गुलाब , सोनचाफा या फुलपिकांची लागवड करण्यासाठी प्रती हेक्टर २ लाख रु. पर्यंत अनुदान देण्यात येते.आणि हे सर्व अनुदान एकाच वर्षात १०० टक्के मिळते.
- या योजने साठी हजेरी पत्रक (इ-मस्टर) निर्गमीत करणे, भरणे,पारित करणे, आणि कुशल व अकुशल बाबींची देयके प्रदान करण्याचे अधिकार तालुका कृषी अधिकारी यांना आहेत.
- तसेच मजुरीच्या बाबतीत ग्रामरोजगार सेवक हजेरी पत्रक भरुन कृषी सहाय्यकाच्या प्रती स्वाक्षरी सह तालुका कृषी अधिकारी यांना सादर करतात. तांत्रिक अधिकारी कामाचे मोजमाप घेउन मजुरीची परीगणना करतात व तालुका कृषी अधिकारी यांना सादर करतात. कृषी सहाय्यक लागवडीच्या नोंदी मापनपुस्तिकेत घेतात.
- तालुका कृषी अधिकारी यांना हजेरी पत्रकाचे देयक प्रदान करण्यासाठी डिजिटल स्वाक्षरीदार म्हणुन घोषित करण्यात आलेले आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील सहाय्यक अधिक्षक/ कृषी अधिकारी हे प्रथम स्वाक्षरीदार तर तालुका कृषी अधिकारी हे द्वितीय स्वाक्षरीदार असतात.

वेजलिस्ट/ मटेरियल लिस्टची प्रिंट काढुन तालुका कृषी अधिकारी स्वाक्षरी करतात.

तालुका कृषी अधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या वेजलिस्ट/ मटेरियल लिस्ट प्राप्त झाल्यानंतर दोन दिवसात F T O तयार करुन प्रदानासाठी बँक/ पोस्ट ऑफिसला पाठवण्यात येते. दर १५ दिवसांनी हजेरीपत्रका प्रमाणे मजुरी दिली जाते. मजुरीची रक्कम फक्त बँक/ पोस्ट मार्फत दिली जाते.

## फळपिकनिहाय मापदंड २० जानेवारी २०१२ च्या शासननिर्णयानुसार व दि. ४/१०/२०२१ च्या परिपत्रकानुसार

| अ.क्र. | फळपिकाचे नांव | लागवड अंतर (मी ) | झाडे संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | आंबा कलमे | १० X १० | १०० | १८४५९० |
| २ | आंबा रोपे इन सीटू पध्दत | १० X १० | १०० | १७४८१२ |
| ३ | काजू कलमे | ७ X७ | २०० | १३१८८५ |
| ४ | चिकू कलमे | १० X १० | १०० | १८०८७९ |
| ५ | पेरु कलमे | ६ X ६ | २७७ | १५०७४३ |
| ६ | डाळींब कलमे | ५ X ५ | ४०० | १५६१४४ |
| ७ | संत्रा,मोसंबी,कागदी लिंबू कलमे | ६ X ६ | २७७ | १७४४२८ |
| ८ | नारळ रोपे बानावली | ८ X ८ | १५० | १५५६७७ |
| ९ | नारळ रोपे टी x डी | ८ X ८ | १५० | १६४१४७ |
| १० | बोर रोपे | ७ X ७ | २०० | ९१४७० |
| ११ | बोर रोपे. | ५ X ५ | ४०० | ११९९८९ |
| १२ | सिताफळ रोपे | ५ X ५ | ४०० | १४५९३७ |
| १३ | सिताफळ कलमे | ५ X ५ | ४०० | १५७९३७ |
| १४ | कागदी लिंबू रोपे | ६ X ६ | २७७ | १६५४७८ |
| १५ | आवळा कलमे | ७ X ७ | २०० | १२०७०४ |
| १६ | आवळा रोपे | ७ X ७ | २०० | ११३५०४ |
| १७ | चिंच,कवठ,जांभूळ रोपे | १० X १० | १०० | १०९५२५ |
| १८ | चिंच कलमे विकसित जाती | १०X १० | १०० | ११५१७५ |
| १९ | कोकम रोपे | ७ X ७ | २०० | १०६६६८ |
| २० | कोकम कलमे | ७ X ७ | २०० | ११०२६८ |
| २१ | फणस कलमे | १० X १० | १०० | ९५६०५ |
| २२ | फणस रोपे | १० X १० | १०० | ९२६०५ |
| २३ | अंजीर कलमे | ५ X५ | ४०० | १६१७९२ |
| २४ | सुपारी रोपे | २.७० X २.७० | १३७० | २५१६८८ |
| २५ | डाळींब कलमे. | ४.५० X ३.०० | ७४० | २७५३९१ |
| २६ | काजू रोपे | ७ X ७ | २०० | १२३४८४ |
| २७ | आंबा कलमे. | ५ X ५ | ४०० | २४७२३४ |



तसेच
नाडेप खत उत्पादन युनिट साठी एकूण अनुदान १५५००/-
गांडूळ खत उत्पादन युनिट साठी एकूण अनुदान ११५२० /-

वेळोवेळी मजुरी,कलमे/ रोपे व सामुग्री दरामध्ये वाढ व बदल झाल्यास त्यानुसार सुधारित मापदंड शासनामार्फत मान्य करण्यात येतो. सुधारित मापदंड मान्य होईपर्यंत पुर्वीच्या मंजूर मापदंडा प्रमाणे योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.

## ल ) लागवड कधी करावी तसेच लागवड कालावधी -

तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर लागवड करावी. पावसाळ्याचा विचार केल्यास फळबाग /वृक्ष लागवड/फुलपिके लागवडीचा  कालावधी १ जून ते ३१ डिसेंबर पर्यंत योग्य असतो. जमिनीतील आर्द्रता योग्य असल्यास या कालावधीत वाढ करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितिस आहेत. तथापि सिंचनाची व्यवस्था असल्यास वर्षभरात केव्हाही लागवड करता येईल. त्यासाठी इतर प्राधिकाऱ्याच्या मंजुरीची आवश्यकता असणार नाही.

## जिल्हास्तरीय समिती-

जिल्हाधिकारी- अध्यक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.- सहअध्यक्ष
विभागीय वन अधिकारी सामाजीक वनीकरण- सहअध्यक्ष
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी- सदस्य
प्रकल्प संचालक आत्मा- सदस्य
कृषी विकास अधिकारी जि.प.- सदस्य
प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा- सदस्य सचिव



# मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

**प्रस्तावना :**

जागतिक बँक अर्थसाहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात येत आहे.

प्रकल्पाची अंमलबजावणी २३ मार्च २०२० पासून सुरु झालेली असून प्रकल्प अंमलबजावणीचा कालावधी ७ वर्षे (२०२०-२१ ते २०२६-२७) आहे.

प्रकल्पाची एकूण किंमत रु. २१०० कोटी आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| निधीचे स्त्रोत | रक्कम (दश लक्ष $) | रक्कम (रु. कोटी) | % |
|---|---|---|---|
| जागतिक बँकेचे कर्ज | २१० | १४७० | ७० |
| राज्य शासनाचा हिस्सा | ८० | ५६० | २७ |
| खाजगी उद्योगक्षेत्राच्या माध्यमातून (सीएसआर) | १० | ७० | ३ |
| **प्रकल्पाची एकुण किंमत** | **३००** | **२१००** | **१००** |

**प्रकल्पाचे उद्दिष्ट:**

"लहान आणि सिमांत शेतकरी तसेच कृषी नवउद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून शेतमालाच्या सर्वसमावेशक आणि स्पर्धात्मक मूल्यसाखळ्यांच्या विकासासाठी मदत करणे."

**प्रकल्प अंमलबजावणी संरचना :**

प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कृषी विभाग हा नोडल विभाग असून खालीलप्रमाणे ७ विभागातील ११ यंत्रणा या "प्रकल्प अंमलबजावणी कक्ष" म्हणून कार्यरत आहेत.

| अ.क्र. | प्रशासकिय विभाग | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|
| १ | कृषी विभाग | आत्मा संचालनालय, कृषी आयुक्तालय, पुणे |
| २ | पशुसंवर्धन विभाग | पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे |
| ३ | पणन विभाग | पणन संचालनालय, पुणे<br>महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे<br>महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, नागपूर<br>महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ |
| ४ | सहकार विभाग | महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ, पुणे |
| ५ | महिला व बाल कल्याण विभाग | महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई |
| ६ | ग्राम विकास विभाग | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती प्रकल्प, मुंबई<br>ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन (व्हीएसटीएफ), मुंबई |
| ७ | नगर विकास विभाग | पुणे महानगरपालिका |

**मूल्यसाखळी उपप्रकल्पः**

मूल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पामध्ये भागीदारी उपप्रकल्प, बाजारसंपर्क वाढ उपप्रकल्प, गोदाम आधारित उपप्रकल्पांचा समावेश आहे. मूल्यसाखळी विकासाच्या या उपप्रकल्पांतर्गत पीक काढणीत्तोर पायाभूत सुविधांसाठी उदा. गोदाम, प्राथमिक स्वच्छता व प्रतवारी केंद्र, दालमिल, फ्लोअरमिल, राईसमिल ऑईलमिल, मिलेट प्रोसेसिंग, पशुखाद्य उत्पादन युनिट, दुय्यम व तृतीय प्रक्रिया युनिट, पूर्व शीतकरण गृह, Integrated Pack House, शीतगृह, शीत वाहन, Blast Freezer, IQF, मँगो पल्प, काजू प्रक्रिया, कांदा निर्जलीकरण, फळांचे ज्युस, जाम-जेली उत्पादन युनिट, टोमॅटो प्रक्रिया-सॉस, प्युरी, केचअप व हळद प्रक्रिया इ. प्रामुख्याने अनुदान देय आहे. पीक काढणीत्तोर पायाभूत सुविधासाठी प्रकल्प खर्चाच्या किमान ७० टक्के खर्च प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

मूल्यसाखळी विकासाच्या उपप्रकल्पाकरिता एकूण प्रकल्प किंमतीच्या ६० टक्के अनुदान देय आहे व उर्वरित ४० टक्के रक्कम समुदाय आधारित संस्थेने स्वहिस्सा किंवा बँक कर्ज माध्यमातून उपलब्ध करावयाची आहे. मूल्यसाखळी विकासाच्या फलोत्पादन व्यतिरिक्त इतर उपप्रकल्पाकरिता अधिकतम रु. २ कोटी पर्यंत अनुदान देय आहे. तर फलोत्पादन प्रकल्पाकरिता अधिकतम रु. ३ कोटी पर्यंत अनुदान देय आहे. ऊस, दुग्धव्यवसाय, रेशीम उद्योग, बांबू तसेच व्यावसायिक कुक्कुटपालन याबाबींना अनुदान देय नाही. तसेच प्रकल्पामध्ये कोणत्याही उपक्रमाकरिता जागा खरेदीकरण्याकरिता अनुदान देय नाही

स्मार्ट प्रकल्पांतर्गत मूल्यसाखळी विकास उपप्रकल्पांचा लाभ शेतकरी उत्पादक कंपनी, माविम व एमएसआरएलएम अंतर्गत स्थापित लोकसंचालित साधन केंद्र व प्रभाग संघ आणि प्राथमिक सहकारी संस्था या समुदाय आधारित संस्थांना देय आहे. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ / अनुदान देय नाही. प्रकल्पांतर्गत किमान १००० समुदाय आधारित संस्थांना लाभ देण्यात येणार असून त्यापैकी किमान ३०० महिला संस्था असतील.

प्रकल्पात सहभागी होणाऱ्या उपरोक्त नमूद समुदाय आधारित संस्थांमध्ये शेतकरी वर्गातील विविध घटकांचा खालीलप्रमाणे सहभाग असणार आहे.

अल्प आणि अत्यल्प भूधारक शेतकरी ८० %
अनुसूचित जाती व जमाती शेतकरी १३ %
महिला उत्पादक/महिला शेतकरी ५० %

सद्यस्थितीमध्ये या उपघटकांतर्गत ६०१ समुदाय आधारित संस्थांची निवड झाली असून या उपप्रकल्पाद्वारे जवळपास . ४.३९ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. ही भागीदारी उपप्रकल्प व बाजार संपर्क वाढ उपप्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पीआययू | सीबीओ निवडीचे लक्षांक (संख्या) | प्राथमिक मान्यता दिलेल्या सीबीओ (संख्या) | मंजूर FPP (संख्या) | मंजूर उपप्रकल्पांची किंमत (रु.कोटी) | स्मार्ट अनुदान (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषी | ९०० | ८४७ | ४८५ | १०९०.२३ | ६५३.३३ |
| २ | पशुसंवर्धन | ५० | २२ | ११ | १६.२८ | ९.७७ |
| ३ | माविम | १०० | १०२ | ४९ | २९.५४ | १७.६८ |
| ४ | MSRLM | २०० | १८७ | २८ | १७.५१ | १०.७८ |
| ५ | VSTF | ७२ | ५७ | २८ | ६७.८३ | ३८.८८ |
| | **एकूण** | **१३२२** | **१२१५** | **६०१** | **१२२१.४१** | **७३०.४६** |

६०१ निवड झालेल्या समुदाय आधारित संस्थांचा पीकनिहाय व घटकनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

## पीकनिहाय मंजूर उपप्रकल्प

| अ.क्र. | पिके | सीबिओ संख्या |
|---|---|---|
| १ | तृणधान्य | १५४ |
| २ | कडधान्य | ९३ |
| ३ | तृणधान्य व कडधान्य | ५७ |
| ४ | तेलवर्गीय पिके | ८० |
| ५ | कापूस | ५ |
| ६ | फळे व भाजीपाला | १४७ |
| ७ | मसाला पिके | २० |
| ८ | शेळी व परसबागेतील कुक्कुटपालन | ३५ |
| ९ | इतर | १० |

| अ.क्र. | पिके | सीबिओ संख्या |
|---|---|---|
| १ | गोदाम (३३७६१३ MT) | ३०७ |
| २ | प्राथमिक प्रक्रिया | ३०४ |
| ३ | डाळ मिल | ७५ |
| ४ | फ्लोअर मिल | ३१ |
| ५ | ऑइल मिल | ३० |
| ६ | भात गिरणी | ४३ |
| ७ | कांदा चाळ (68386 MT) | ५२ |
| ८ | औजार बँक | २६० |
| ९ | Cattle feed unit | २२ |
| १० | Animal Holding Area | १० |
| ११ | Cold Chain Components (12383 MT) | ५६ |

मंजूर एकूण ६०१ संस्थांमध्ये ७३% अल्प आणि अत्यल्प भूधारक, ५०% महिला, १०% अनुसूचित जाती व ६% अनुसूचित जमाती सदस्यांचा समावेश आहे.

## सर्वसमावेशक प्रशिक्षण:

मंजूर एकूण ६०१ संस्थांमध्ये ७३% अल्प आणि अत्यल्प भूधारक, ५०% महिला, १०% अनुसूचित जाती व ६% अनुसूचित जमाती सदस्यांचा समावेश आहे.

मंजूरी मिळालेल्या एकूण ४९४ समुदाय आधारित संस्थांतील १,९८८ संचालकांचे सर्वसमावेशक प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये २०% महिला संचालकांनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षणामध्ये स्मार्ट प्रकल्पाची ओळख, व्यवसाय आराखडा तयार करणे, मूल्यसाखळी विकास, बाजारपेठेशी जोडणी, वित्तिय व्यवस्थापन, प्रापण प्रक्रिया, सामाजिक व पर्यावरण व्यवस्थापन इ. बाबींचा समावेश करण्यात आला.

## मूल्य साखळी विकास शाळा:

कृषी विस्तारासाठी साहाय्य म्हणून मूल्यसाखळी विकास शाळा हा घटक सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झालेल्या ६०१ शेतकऱ्यांच्या समुदाय आधारित संस्थांकडे राबविण्यात येत आहे. या घटकांतर्गत सन २०२२-२३ मध्ये बाजाराभिमुख पीक प्रात्यक्षिके, शेतकरी शेतीशाळा, प्रशिक्षणासह अभ्यास दौरे घटकांचा समावेश आहे.

## महिला आधारित संस्थांची स्पर्धात्मक मूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याच्या अनुषंगाने महिला शेतकरी संस्था तयार करुन त्यांची क्षमता बांधणी करणे

प्रकल्पाच्या या घटकांतर्गत महिलांच्या शेतकरी उत्पादक संस्था तयार करणे, काढणी पश्चात व्यवस्थापन व विपणन प्रक्रियेमध्ये सहभाग वाढविण्याच्या अनुषंगाने त्यांची क्षमता बांधणी करणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या स्पर्धात्मक मूल्यसाखळीमध्ये सहभागी होण्याकरिता माविम व एमएसआरएलएम अंतर्गत स्थापित लोकसंचलित साधन केंद्र व प्रभाग संघ यांच्या सदस्यातून शेती असणाऱ्या सदस्यांना एकत्रित करुन प्रकल्पामार्फत ४०० महिला शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट असून त्यापैकी सद्यस्थितीमध्ये ३६७ शेतकरी उत्पादक संस्थांची स्थापना झालेली आहे. या स्थापन झालेल्या संस्थांचे प्रभावीपणे कामकाज करण्याच्या अनुषंगाने त्यांच्या प्रशिक्षण गरजा ओळखून त्याआधारे त्यांची विविध विषयांवर क्षमता बांधणी केली जात आहे.

## स्मार्ट कॉटन उपप्रकल्प:

स्वच्छ व एकजिनसी कापूस उत्पादन करणे, त्याचे गाठीत मूल्यवर्धन करुन इलेक्ट्रानिक प्लॅटफार्मवर विक्री करण्याच्या उद्देशाने "स्मार्ट कॉटन" हा उपप्रकल्प सन २०२२-२३ मध्ये राज्यातील कापूस उत्पादक १२ जिल्ह्यातील ४७५ गावांमध्ये ५८,२६८ शेतकऱ्यांकडे राबविण्यात आलेला आहे. या अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये २९६९ कापसाच्या गाठी (BALES) "स्मार्ट कॉटन" या ब्रॅन्ड खाली तयार केलेल्या आहेत.

### प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणारी गोदाम क्षमता :

| अ.क्र. | घटकनिहाय गोदाम | सिबिओ संख्या | गोदाम क्षमता (मे.टन) |
|---|---|---|---|
| १ | उत्पादक भागीदारी (PP/MAP) उपप्रकल्पांतर्गत गोदाम | ३०७ | ३३७६१३ |
| २ | MCDC - गोदाम पावती उपप्रकल्प-जुने गोदाम दुरुस्ती | १६१ | ४०२५० |
| ३ | MCDC - नवीन गोदाम | ३३ | ३३००० |
| ४ | MSRLM, MAVIM - नवीन गोदाम प्रत्येकी २५० मे.टन | ५० | १२५०० |
| ५ | MSRLM, MAVIM - नवीन गोदाम प्रत्येकी १००० मे.टन | ५ | ५००० |
| ६ | MSWC - विकेंद्रित सीबीओ गोदाम-प्रत्येकी ३००० मे टन | ४ | १२००० |
| ७ | MSWC - सायलो-प्रत्येकी ५००० मे टन | २ | १०००० |
| | **एकूण** | **५६२** | **४५०३६३** |

### जोखीम निवारण कक्ष:

जोखीम निवारण कक्षाची स्थापना प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी अंतर्गत करण्यात आली आहे. समुदाय आधारित संस्था / शेतकरी आणि राज्य अधिकारी यांना वेळोवेळी बाजार-आधारित जोखीम व्यवस्थापन साधने प्रस्तावित करणे हा मुख्य हेतू आहे. राज्यातील प्रमुख पिकांसाठी संकट व्यवस्थापन योजना (सीएमपी) तयार करण्यात येत आहे. या योजना किमतींच्या अंदाजावर आधारित शेतकऱ्यांनी केव्हा साठा करावा व केव्हा विक्री करावी याचा शेतकऱ्यांना सल्ला देण्यासाठी करण्यात येतील. त्याशिवाय फ्युचर्स मधील व्यवहार व हेजिंग करण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येईल. यासाठी आवश्यक असलेली माहिती प्रकल्पात स्थापित बाजार माहिती विश्लेषण कक्ष प्रदान करेल.

## मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना (१००% राज्य पुरस्कृत)

### योजनेचा उद्देश :

शेतीमालाचे मूल्यवर्धन करण्याकरिता शेतकरी सहभागाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापित करण्यास तसेच प्रकल्पांच्या आधुनिकीकरणास प्रोत्साहन देणे, उत्पादित मालास ग्राहकांची पसंती, बाजारपेठ निर्माण करणे व निर्यातीस प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागात लघु व मध्यम अन्न प्रक्रिया उद्योगांना प्राधान्य देऊन रोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देणे यासाठी मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना लागू करण्यात आली आहे.

### योजनेचे घटक :

- कृषी व अन्न प्रक्रिया प्रस्थापना (नवीन प्रकल्प उभारणी) व कार्यरत असलेल्या कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाचे स्तरवृद्धी, विस्तारीकरण व आधुनिकीकरण.
- नवीन अन्न प्रक्रिया उद्योग स्थापन करणे, तसेच कार्यरत असलेल्या अन्न प्रक्रिया उद्योगांचे स्तरवृद्धी, विस्तारीकरण व आधुनिकीकरण या बाबींचा समावेश राहील.

- कृषी व अन्न प्रक्रिया प्रस्थापना (नवीन प्रकल्प उभारणी) व कार्यरत असलेल्या कृषी व अन्न प्रक्रिया उद्योगाचे स्तरवृद्धी, विस्तारीकरण व आधुनिकीकरण.
- नवीन अन्न प्रक्रिया उद्योग स्थापन करणे, तसेच कार्यरत असलेल्या अन्न प्रक्रिया उद्योगांचे स्तरवृद्धी, विस्तारीकरण व आधुनिकीकरण या बाबींचा समावेश राहील.
- मुल्यवर्धन, शीतसाखळी आणि साठवणुकीच्या पायाभूत सुविधा :- पीक आधारित अन्न प्रक्रिया उद्योगाशी निगडीत काढणीपश्चात पूर्व प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी स्थापित करणे,

**अ) पात्र उद्योग- अन्नधान्य, कडधान्य, फळे, भाजीपाला, तेलबिया, मसाला,नगदी पिके,**

मुल्यवर्धन, शीतसाखळी आणि साठवणुकीच्या पायाभूत सुविधा :- पीक आधारित अन्न प्रक्रिया उद्योगाशी निगडीत काढणीपश्चात पूर्व प्रक्रिया केंद्र व एकात्मिक शीतसाखळी स्थापित करणे,

**आ) पात्र लाभार्थी/संस्था :**

वैयक्तिक लाभार्थी :- वैयक्तिक उद्योजक, सक्षम शेतकरी, बेरोजगार युवक, महिला, नवउद्योजक, अॅग्रीगेटर, भागीदारी प्रकल्प, भागीदारी संस्था इ.

**गट लाभार्थी :**

शेतकरी उत्पादक गट/ संस्था/ कंपनी, स्वयंसहाय्यता गट, उत्पादक सहकारी संस्था, शासकीय संस्था, खासगी संस्था.

**अनुदानाचे स्वरुप :**

कारखाना, सयंत्रे आणि प्रक्रिया प्रकल्पांसाठी आवश्यक असणारी दालने यांच्या बांधकाम खर्चाच्या ३० टक्के अनुदान, कमाल मर्यादा रु. ५०.०० लाख

**अर्ज करावयाची पद्धत :**

सन २०२३-२४ मध्ये योजनेतील संबंधित घटकांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांनी बँकेची कर्ज मंजूरी घेऊन विहित नमुन्यात अर्ज, सविस्तर प्रकल्प अहवाल व इतर आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावा.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना :

सध्या अस्तित्वात असलेल्या सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांचा विस्तार वाढवण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि नवे सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करण्यासाठी पाठबळ पुरवणे यासाठी केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (PMFME) योजना सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षांसाठी संपूर्ण राज्यभर लागू.

सर्व प्रकारच्या नवीन, कार्यरत व आजारी अन्न प्रक्रिया उद्योगांना बँक कर्जाशी निगडीत लाभ.

पारंपारीक /स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन

**वैयक्तिक :**

उद्योजक, शेतकरी, बेरोजगार युवक, महिला, भागीदारी संस्था.

**गट लाभार्थी :**

शेतकरी उत्पादक गट/कंपनी/संस्था, स्वयंसहाय्यता गट, सहकारी/शासकीय संस्था.

योजनेतंर्गत एक जिल्हा एक उत्पादन प्रस्तावांना प्राधान्य.

योजनेमध्ये मध्ये नाशवंत फळपिके, कोरडवाहू फळे, भाजीपाला, अन्नधान्ये, तृणधान्ये, कडधान्ये, तेलबिया, मसाला पिके इत्यादींवर आधारित उत्पादने, दुग्ध व पशुउत्पादने, सागरी उत्पादने, मांस उत्पादने, वन उत्पादने इत्यादी सर्व प्रकारच्या नवीन/कार्यरत.

## सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना साहाय्य

योजनेची सर्व प्रक्रिया आनलाईन, त्यासाठी www.pmfme.mofpi.gov.in आणि www.krishi.maharashtra.gov.in तसेच बीज भांडवलाचा लाभ घेण्यास इच्छुक असणाऱ्यांनी ग्रामीण भागासाठी www.nrlm.gov.in या संकेतस्थळावरील NRLM PORTAL वर आणि शहरी भागासाठी www.nulm.gov.in या संकेतस्थळावरील NULM PORTAL वर आनलाईन अर्ज करावा

संगणक तसेच मोबाईल वरून देखील अर्ज सादर करता येईल. एकाच लाभार्थ्याला योजनेंतर्गत सर्व घटकांचा लाभ घेता येईल.

### योजनेंतर्गत घटक, लाभार्थी आणि आर्थिक मापदंड

**१. प्रशिक्षण -** संबंधित लाभार्थ्यांना मोफत प्रशिक्षण.

**२. बीज भांडवल**

ग्रामीण व शहरी भागातील सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगातील स्वयंसहाय्यता गटातील सदस्य.

लहान मशिनरी खरेदी करण्यासाठी व खेळते भांडवल यासाठी प्रति सदस्य कमाल रक्कम रु. ४०,०००/- व प्रति स्वयंसहाय्यता गट कमाल रक्कम रु. ४,००,०००/-

**३. वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग**

वैयक्तिक मालकी / भागीदारी,शेतकरी उत्पादक संस्था, स्वयं सहायता गट, गैर सरकारी संस्था, सहकारी संस्था, खासगी कंपनी.

प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के व जास्तीत जास्त १० लाख.

**४. सूक्ष्म अन्न प्रक्रिया गट उद्योगांना लाभ (सामाईक पायाभूत सुविधा)**

शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, स्वयं सहायता गट आणि त्यांचे फेडरेशन (उदा. एमएसआरएल-सीएलएफ, माविम,-व्हीएलएफ, सीएमआरसी/ एनयुएलएम-एएलएफ) शासकीय संस्था.
प्रकल्प किंमतीच्या ३५ टक्के व जास्तीत जास्त ०३ कोटी

**५. मार्केटींग व ब्रॅन्डींग -**

शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, उत्पादक सहकारी, स्वयंसहाय्यता गट यांचे समूह अथवा एसपीव्ही.

पात्र प्रकल्प खर्चाच्या ५०%, कमाल आर्थिक मर्यादा केंद्र शासनाकडून विहित करण्यात येईल.

**६. सूक्ष्म अन्न प्रक्रिया गट उद्योगांना लाभ (इन्क्युबेशन केंद्र/मुल्यसाखळी )**

शेतकरी उत्पादक संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, सहकारी संस्था, स्वयं सहायता गट आणि त्यांचे फेडरेशन (उदा. एमएसआरएल-सीएलएफ, माविम,-व्हीएलएफ, सीएमआरसी/ एनयुएलएम-एएलएफ), शासकीय संस्था.

प्रकल्प किमतीच्या ३५ टक्के व जास्तीत जास्त ०३ कोटी

**संपर्क :**

नजिकचे कृषी कार्यालये, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत निवड झालेले जिल्हा संसाधन व्यक्ती.

## कृषी यांत्रिकीकरण

कृषी अवजारे शेतकऱ्यांना उपलब्ध होऊन किफायतशीर व उत्पन्न वाढवणारी शेती होण्यासाठी व कृषीशी संबंधित कामे यंत्राच्या साह्याने सुसह्य पद्धतीने होण्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या कृषी संबंधित अभियानांमध्ये कृषी अवजारे अनुदान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

### ट्रॅक्टर

कृषी यांत्रिकीकरण उपअभियान, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण कार्यक्रम, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या अंतर्गत ट्रॅक्टरसाठी खालील प्रमाणे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे.

### ट्रॅक्टर ८ ते २० पीटीओ एचपी (एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान)

अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये एक लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.

इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७५ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### ट्रॅक्टर ८ एचपी पेक्षा जास्त ते ७० पीटीओ एचपी
### ( कृषी यांत्रिकीकरण उप अभियान, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण कार्यक्रम)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये सव्वा लाख अनुदानाची टक्केवारी ५०%.

इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये एक लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

### पॉवर टिलर आठ बीएचपी पेक्षा जास्त

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ८५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### भात लावणी यंत्र
### स्वयंचलित पॅडी ट्रान्सप्लांटर (चार रांगा/ ओळी)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.५० लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.२० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

### स्वयंचलित पॅडी ट्रान्सप्लांटर (चार पेक्षा जास्त ते आठ रांगा)
### लँड डेव्हलपमेंट, टिलेज व सीड बेड तयार करण्यासाठी लागणारी अवजारे उपकरणे
### कल्टीव्हेटर, रीजर, तव्याचा नांगर, केज व्हील, फरो ओपनर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १६ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### रोटो कल्टीव्हेटर, रोटो पडलर, क्रष्ट ब्रेकर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३२ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**सोईंग, प्लांटिंग, रिपिंग व डिगिंग इक्विपमेंट**

**बटाटा प्लांटर/ डिगर, ट्रॅक्टर ड्रॉन रिपर, झिरो टिल सीड कम फर्टीलायझर ड्रिल, रेज्ड बेड प्लांटर (बी बी एफ), प्लांटर, सीड ड्रिल, मल्टी क्रॉप प्लांटर, झिरो टिल मल्टी क्रॉप प्लांटर, रिज फरो प्लांटर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २४ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**न्यूमॅटिक प्लांटर, न्यूमॅटिक व्हेजिटेबल ट्रान्सप्लांटर, न्यूमॅटिक वेजिटेबल सीडर, हॅपी सीडर, सिड कम फर्टीलायझर ड्रिल, अक्वा फर्टी सीड ड्रिल, रेज्ड बेड प्लांटर इन्काईन्ड प्लेट प्लांटर व शेपर अटॅचमेंटसह, प्लास्टिक मल्च लेईंग मशीन/ मल्चर (ऊस पिकाकरिता )**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ५० .
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ४० %

**इंटर कल्टिवेशन इक्विपमेंट**

पॉवर विडर इंजिन ऑपरेटेड २ बीएचपी पेक्षा कमी

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २० हजार अनुदानाची टक्केवारी ४०% .

**इक्विपमेंट फोर रेसिड्यु मॅनेजमेंट / हे अँड फोरेज इक्विपमेंट**

ऊस पाचट कुट्टी यंत्र, स्ट्रॉ रिपर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २० हजार अनुदानाची टक्केवारी ४० %.

**हार्वेस्टिंग अँड थ्रेशिंग इक्विपमेंट(इंजिन/इलेक्ट्रिक मोटर चलित ३ एचपी पेक्षा कमी व पॉवर टिलर आणि ट्रॅक्टरचलित २० बी एच पी पेक्षा कमी)**

थ्रेशर, मल्टीक्रॉप थ्रेशर, ब्रश कटर, रियर, मोवर श्रेडर( कॉटन श्रेडर), पॅडी थ्रेशर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २५ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**२० बी एच पी पेक्षा जास्त ते ३५ बी एच पी पर्यंत चलित अवजारे / उपकरणे**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २५ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**लँड डेव्हलपमेंट, टिलेज व सीड बेड तयार करण्यासाठी लागणारी अवजारे उपकरणे**
**कल्टीव्हेटर, रीजर, तव्याचा नांगर, केज व्हील, हॅरो, फरो ओपनर, पलटी नांगर (सिंगल बॉटम)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २५ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**रोटो कल्टीव्हेटर, रोटो पडलर, पॉवर हॅरो, बंड फॉर्मर आणि क्रष्ट ब्रेकर**

जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%

**रोटाव्हेटर (५ फुट पर्यंत)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २८ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%

**चीजल प्लो**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १६ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%

**मेकॅनिकल पलटी नांगर ( २ बॉटम)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३२ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**हायड्रोलिक पलटी नांगर ( २ बॉटम)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५६ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**लेजर लॅण्ड लेव्हलर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.६० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

**सोईंग, प्लांटिंग, रिपिंग व डिगिंग इक्विपमेंट**

**बटाटा प्लांटर/ डिगर, ट्रॅक्टर ड्रॉन रिपर, झिरो ट्रिल सीड कम फर्टीलायझर ड्रिल, रेज्ड बेड प्लांटर प्लांटर, रिज फरो प्लांटर, मल्टी क्रॉप प्लांटर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३२ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**सीड ड्रिल (७ टाईन), सीड कम फर्टीलायझर ड्रिल(७ टाईन), झिरो टिल मल्टी क्रॉप प्लांटर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १८ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १६ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**राईस सीडर (डीएसआर)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १६ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**न्यूमॅटिक प्लांटर, न्यूमॅटिक व्हेजिटेबल ट्रान्सप्लांटर, न्यूमॅटिक वेजिटेबल सीडर, अक्वा फर्टी सीड ड्रिल, रेज्ड बेड प्लांटर इन्काइन्ड प्लेट प्लांटर व शेपर अटॅचमेंटसह, प्लास्टिक मल्च लेईंग मशीन / मल्चर (ऊस पिकाकरिता)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**इंटर कल्टिवेशन इक्विपमेंट**

**पॉवर विडर इंजिन ऑपरेटेड २ बीएचपी पेक्षा जास्त**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**इक्विपमेंट फोर रेसिड्यु मॅनेजमेंट / हे अँड फोरेज इक्विपमेंट**
**ऊस पाचट कुट्टी यंत्र, स्ट्रॉ रिपर, हे रेक**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**हे रेक**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**बेलर ( राउंड, १४ किलो पेक्षा कमी)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.५० लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.२० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%

**थ्रेशर, मल्टी क्रॉप थ्रेशर, ब्रश कटर, रिपर, मोवर श्रेडर(सर्व पिकांसाठी), पॅडी थ्रेशर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**३५ बीएचपी पेक्षा जास्त चलीत अवजारे/ उपकरणे**

लँड डेव्हलपमेंट, टिलेज व सीड बेड तयार करण्यासाठी लागणारी अवजारे उपकरणे
कल्टीव्हेटर, रीजर, तव्याचा नांगर, केज व्हील, हॅरो, फरो ओपनर,

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**लेजर लॅण्ड लेव्हलर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**लँड डेव्हलपमेंट, टिलेज व सीड बेड तयार करण्यासाठी लागणारी अवजारे उपकरणे**
**कल्टीव्हेटर, रीजर, तव्याचा नांगर, केज व्हील, हॅरो, फरो ओपनर,**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.६० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

**रोटो पड्लर, रोटो कल्टीव्हेटर, पॉवर हॅरो**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ८० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%

**सब सॉईलर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६३ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%

**रोटाव्हेटर (५ फुट)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थीसाठी कमाल अनुदान रुपये ४२ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थीसाठी कमाल अनुदान रुपये ३४ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**रोटाव्हेटर (६ फुट)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४४ हजार ८०० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३५ हजार ८०० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### रोटाव्हेटर (७ फुट)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४७ हजार ६०० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३८ हजार १०० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### रोटाव्हेटर (८ फुट)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार ४०० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार ३०० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### मेकॅनिकल पलटी नांगर (२ बॉटम)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३२ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### हायड्रोलिक पलटी नांगर (२ बॉटम)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५६ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### मेकॅनिकल पलटी नांगर (३ बॉटम)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### हायड्रोलिक पलटी नांगर (३ बॉटम)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ८९ हजार ५०० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७१ हजार ६०० अनुदानाची टक्केवारी ४०%

### फरो ओपनर, बंड फॉर्मर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २५ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### बॅक हो लोडर डोजर ( ट्रॅक्टर चलित)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थीसाठी कमाल अनुदान रुपये ३.५० लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थीसाठी कमाल अनुदान रुपये २.८० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%

**रेज्ड बेड प्लांटर ईन्काईन्ड प्लेट प्लांटर व शेपर अटॅचमेंटसह,**

अनुसूचित जाती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ९० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**न्यूमॅटिक प्लांटर, न्यूमॅटिक व्हेजिटेबल ट्रान्सप्लांटर, न्यूमॅटिक वेजिटेबल सीडर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २.२५ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.८० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

**मल्टी क्रॉप प्लांटर, बटाटा प्लांटर, शुगर केन कटर / स्ट्रिपर / प्लांटर प्लास्टिक मल्च लेईंग मशीन / मल्चर (ऊस पिकाकरिता), झिरो टिल मल्टी क्रॉप प्लांटर, रिज फरो प्लांटर**

अनुसूचित जाती अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**इंटर कल्टिवेशन इक्विपमेंट**

**पॉवर विडर इंजिन ऑपरेटेड ५ बीएचपी पेक्षा जास्त**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६३ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**विडर पी टी ओ ऑपरेटेड**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७५ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**इक्विपमेंट फोर रेसिड्यु मॅनेजमेंट / हे अँड फोरेज इक्विपमेंट**

ऊस पाचट कुट्टी यंत्र

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.२५ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १ लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

**हार्वेस्टिंग अँड थ्रेशिंग इक्विपमेंट ( इंजिन / इलेक्ट्रिक मोटर चलित ५ एचपी पेक्षा जास्त व पॉवर टिलर आणि ट्रॅक्टरचलित ३५ बी एच पी पेक्षा जास्त)**

**मल्टी क्रॉप थ्रेशर ( ४ टन पर्यंत प्रतितास ), मोवर श्रेडर ( सर्व पिकांसाठी), पॅडी थ्रेशर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ८० हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

**मल्टी क्रॉप थ्रेशर (४ टन पेक्षा जास्त प्रतितास)**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २.५० लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २ लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

### कम्बाईन हार्वेस्टर (स्वयंचलित १४ फुट पर्यंत कटरबार)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २.४० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%

### कम्बाईन हार्वेस्टर (ट्रॅक्टरचलित १० फुट पर्यंत कटरबार) ट्रॅक्टरशिवाय

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ८ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६.४० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

### कम्बाईन हार्वेस्टर ( ट्रॅक टाईप ६ ते ८ फुट कटरबार )

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ११ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ८.८० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

### कम्बाईन हार्वेस्टर ( ट्रॅक टाईप ६फुट पेक्षा कमी कटरबार )

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थींसाठी कमाल अनुदान रुपये ७ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थींसाठी कमाल अनुदान रुपये ५.६० लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

### मनुष्य चलीत /बैलचलित सोईंग व प्लांटिंग इक्विपमेंट

मोल्ड बोर्ड नांगर, तव्याचा नांगर, कल्टीव्हेटर (मोगडा), वखर, लेव्हलर ब्लेड, फरो ओपनर, रीजर, पड लर, भात लावणी यंत्र, सीड कम फर्टिलायझर ड्रील, रेज्ड बेड प्लांटर, प्लांटर, डिबलर, भात रोपवाटिकेसाठी औजारे, श्री पद्धतीसाठी मार्कर, बीज प्रक्रिया ड्रम, राईस व्हीट सीडर, भुईमुग शेंगा तोडणी यंत्र, थ्रेशर, उफणणी पंखा, ट्री क्लायंबर, बागेसाठी हँड टूल, मका सोलणी यंत्र, स्पायरल ग्रेडर, फीड ब्लॉक मशीन, हळद /आले खांदनी यंत्र, मल्च लेयिंग मशीन

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदानं रुपये ८ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### ड्रम सीडर (चार ओळी पेक्षा कमी)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदानं रुपये २५०० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### ड्रम सीडर (चार ओळी पेक्षा जास्त)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ४ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदानं रुपये ३ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### पीक संरक्षण उपकरणे

### मॅन्युअल स्प्रेअर नॅपसॅक / फुट/ बॅटरी ऑपरेटेड स्प्रेअर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ७५० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६०० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### सोलर चलित नॅपसॅक स्प्रेअर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १८०० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १४४० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/ पॉवर ऑपरेटेड स्प्रेअर ( ८-१२ लि.) ( ०.७५ एच पी पेक्षा कमी इंजिन )

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३१०० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २५०० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/ पॉवर ऑपरेटेड स्प्रेअर(१२ ते १६ लि.): (०.७५ ते १.०० एचपी इंजिन)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३८०० अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३००० अनुदानाची टक्केवारी ४०%.

### पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/ पॉवर ऑपरेटेड स्प्रेअर (१६ पेक्षा जास्त लि .): (१.०० एचपी पेक्षा जास्त इंजिन ), पॉवर नॅपसॅक मिस्ट ब्लोअर स्प्रेअर कम डस्टर (१.०० एच पी पेक्षा कमी इंजिन)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १० हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ८ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### ट्रॅक्टर ऑपरेटेड स्प्रेयर (एयर कॅरीयर/असीस्टेड)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.२५ लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १ लाख अनुदानाची टक्केवारी ४०%

### ट्रॅक्टर ऑपरेटेड स्प्रेयर (बूम टाईप)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३७ हजार अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २८ हजार अनुदानाची टक्केवारी ४०%.

### ट्रॅक्टर ऑपरेटेड इलेक्ट्रोस्टॅटिक स्प्रेअर

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २.५० लाख अनुदानाची टक्केवारी ५० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २ लाख अनुदानाची टक्केवारी ४०%.

## काढणी पश्चात तंत्रज्ञान उपकरणे

### मिनी राईस मिल

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २.४० लाख अनुदानाची टक्केवारी ६० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २ लाख अनुदानाची टक्केवारी ५०%.

### पॅकिंग मशीन (सर्व प्रकारच्या फलोत्पादन / अन्नधान्य / गळीत धान्य पिकांसाठी)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ३ लाख अनुदानाची टक्केवारी ६० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये २.४० लाख अनुदानाची टक्केवारी ५०%.

### सर्व प्रकारचे ग्राइंडर, पल्वराईजर, पॉलिशर (सर्व प्रकारच्या फलोत्पादन, अन्नधान्य / गळीत धान्य पिकांसाठी)

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ६० हजार अनुदानाची टक्केवारी ६० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये ५० हजार अनुदानाची टक्केवारी ५०%.

### मिनी डाळ मिल

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व महिला लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.५० लाख अनुदानाची टक्केवारी ६० %.
इतर लाभार्थ्यांसाठी कमाल अनुदान रुपये १.२५ लाख अनुदानाची टक्केवारी ५०%.

### कृषी अवजारे बँक स्थापन करणे

रुपये १० लाख पर्यंत- अनुदान मर्यादा ४ लाख (४० टक्के).
रुपये २५ लाख पर्यंत- अनुदान मर्यादा १० लाख (४० टक्के).

### किसान ड्रोन

शेतकरी सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था व ग्रामीण उद्योजक यांनी स्थापित केलेले सेवा सुविधा केंद्रे.

अनुदान दर : ४० टक्के, अनुदान रक्कम रु.४.०० लाख किंवा किसान ड्रोन व त्याचे सलग्न जोडणी साहित्य याची जी मूळ / वास्तविक किंमत असेल त्या पैकी जे कमी असेल ते.

कृषी आणि तत्सम पदवी धारकांना सेवा सुविधा केंद्र/हाय-टेक हब ची स्थापना करण्यासाठी अर्थसाहाय्य.

अनुदान दर : ५० टक्के, अनुदान रक्कम रु.५.०० लाख किंवा किसान ड्रोन व त्याचे सलग्न जोडणी साहित्य याची जी मूळ/वास्तविक किंमत असेल त्या पैकी जे कमी असेल ते.

## सिंचन सुविधा

### ठिबक सिंचन व तुषार सिंचन

### केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना सन २०२१ नुसार राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत तुषार व ठिबक सिंचनाकरीता अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना अनुज्ञेय खर्चाच्या ५५ % अथवा प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या ५५ % यापैकी कमी असेल ते आणि इतर शेतकऱ्यांना अनुज्ञेय खर्चाच्या ४५ % अथवा प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या ४५ % यापैकी कमी असेल ते अनुदान देण्यात येते.

### सूक्ष्म सिंचनासाठी पूरक अनुदानासाठीच्या योजना

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना आणि केंद्र शासनाच्या अटल भूजल योजनेंतर्गत केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजना-प्रति थेंब अधिक पीक योजनेमध्ये देय अनुदानाव्यतिरिक्त अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५% व इतर शेतकऱ्यांना ३०% पूरक अनुदान देऊन सूक्ष्म सिंचनासाठी एकूण अनुक्रमे ८० % व ७५ % अनुदान देण्यात येत आहे.

| अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी | राष्ट्री कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक | मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना/ अटल भुजल योजना पुरक अनुदान | एकूण अनुज्ञेय अनुदान |
|---|---|---|---|
| अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी | ५५ % | २५ % | ८० % |
| इतर शेतकरी | ४५ % | ३० % | ७५ % |

तसेच अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रती थेंब अधिक योजना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना / बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या योजनाच्या माध्यमातून पुरक अनुदानासह (ठिबक सिंचन ५००००/- व तुषार सिंचन -२५०००/- पर्यंत) ९० % च्या मर्यादेत अनुदान देण्यात येत आहे.

| शेतकरी वर्गवारी | राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रती थेंब अधिक पीक | बिरसा मुंडा कृषि क्रांति योजना/ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना | एकूण |
|---|---|---|---|
| अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी | ५५ % | ३५ % | ९० % |
| इतर शेतकरी | ४५% | ४५ % | ९० % |

### नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प ( पोकरा)

ही राज्यातील ५,१४२ गावांमध्ये केंद्र शासन व जागतिक बँक यांच्या अर्थसाहाय्याने राबविण्यात येत आहे. या योजनेमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ८०% आणि बहुभूधारक शेतकऱ्यांना ७५% अनुदान देण्यात येते.

### मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे

राज्यात पर्जन्याधारीत शेतीसाठी पाणलोटावर आधारित जलसंधारणाच्या उपाययोजनांद्वारे पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी यापूर्वी शासनाने शेततळे योजना अनुदानावर राबविलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. शेतकऱ्यांनाआर्थिक परिस्थितीमुळे शेततळे खोदकामासाठी येणारा खर्च करणे शक्य होत नाही. सद्यस्थितीत राज्यातील शेतकऱ्यांना शेततळे खोदकामासाठी शासनाची कोणतीही योजना कार्यान्वित नसल्याने महाराष्ट्र शासनाने २९ जून, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेचा विस्तार करून या योजनेत वैयक्तिक शेततळे या बाबीचा समावेश केलेला आहे.

**पात्रता निकष:**

अर्जदार शेतकऱ्यांकडे स्वत: च्या नावावर किमान ०.६० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. तर कोकण विभागासाठी क्षेत्राची अट ०.२० हेक्टर इतकी आहे. क्षेत्र धारणेस कमाल मर्यादा नाही.

अर्जदार शेतकऱ्यांची जमीन शेततळे खोदण्यास तांत्रिकदृष्ट्या योग्य असणे आवश्यक राहील. जेणेकरून वाहून जाणारे पावसाचे पाणी नैसर्गिक प्रवाहाद्वारे शेततळ्यात साठविणे करीता पुनर्भरण करणे शक्य होईल.

अर्जदार शेतकऱ्यांनी यापूर्वी मागेल त्याला शेततळे, सामूहिक शेततळे अथवा भात खाचरातील बोडी किंवा इतर कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे या घटकाकरिता शासनाच्या अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

**अर्ज करण्याची कार्यपद्धती**

महा-डीबीटी पोर्टलचे https://mahadbt.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ.

**आवश्यक कागदपत्रे:**

जमिनीचा ७/१२, ८-अ उतारा, आधारकार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स, हमीपत्र, जातीचा दाखला.

**अनुदान स्वरुप :**

शेततळ्यासाठी आकारमान निहाय अनुज्ञेय अनुदान:

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेंतर्गत विविध आकारमानाच्या शेततळ्यासाठी कमाल रक्कम रुपये ७५०००/- (रुपये पंच्याहत्तर हजार मात्र) रकमेच्या मर्यादेत अनुदान देय राहील. वैयक्तिक शेततळे खोदकामासाठी आकारमान निहाय रुपये ७५०००/- (रुपये पंच्याहत्तर हजार मात्र) रक्कमेच्या मर्यादेत अनुज्ञेय आहे.

**भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना**

महत्त्व :

राज्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून राबविण्यासाठी शासन निर्णय क्रमांक राफयो-२०१८/प्र.क्र.४७/९-अ दिनांक ६ जुलै २०१८ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

स्वरुप/घटक :

- लाभार्थीस १०० टक्के अनुदान देय आहे.
- योजनेचा लाभ कोकण विभागासाठी कमाल १० हेक्टर तर उर्वरीत महाराष्ट्रासाठी कमाल 6 हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंत अनुज्ञेय आहे.
- कोकण विभाग वगळता ठिबक सिंचन संच बसविणे बंधनकारक आहे.
- आंबा व पेरु या फळपिकांच्या घन लागवडीस मान्यता.
- संत्रा पिकाच्या इंडो इस्त्राईल पद्धतीने लागवडीस मान्यता.

**लाभार्थी पात्रता निकष :**

- वैयक्तिक शेतकऱ्यांनाच लाभ घेता येईल. संस्थात्मक लाभार्थ्यांना लाभ घेता येणार नाही.
- शेतकऱ्यांच्या स्वत:च्या नावे ७/१२ असणे आवश्यक आहे.
- जर ७/१२ उताऱ्यावर लाभार्थी संयुक्त खातेदार असेल तर सर्व खातेदारांचे फळबाग लागवडी साठी संमतीपत्र आवश्यक आहे.
- जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर योजना राबविण्यासाठी कुळाचे संमतीपत्र आवश्यक आहे.
- परंपरागत वननिवासी (वन अधिकार मान्यता) अधिनियम, २००६ नुसार वनपट्टेधारक शेतकरी योजनेत लाभ घेण्यासाठी पात्र आहेत.

**योजनेची व्याप्ती :**

राज्यातील सर्व जिल्हे (३४ जिल्हे)

**समाविष्ट फळपिके :**

योजनेंतर्गत आंबा, काजु, पेरु, चिक्कू, डाळींब, सिताफळ, कागदी लिंबू, नारळ, चिंच, अंजिर, आवळा, कोकम, फणस, जांभूळ, संत्रा, मोसंबी या १६ बहूवार्षिक फळपीकांची आवश्यकतेनुसार कलमे /रोपांद्वारे लागवड करण्यास मान्यता आहे.

## राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कोरडवाहु क्षेत्र विकास

**योजनेचा उद्देश :**

- शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत शाश्वत वाढ करून नवीन उपजिविकेच्या साधनांची उपलब्धता करणे व त्याआधारे त्यांचे जीवनमान उंचावणे.
- निरनिराळ्या एकात्मिक शेती पद्धतींचा अवलंब करून दुष्काळ, पूर व हवामानातील अनपेक्षित बदलामुळे होणारे नुकसान टाळणे.
- अद्ययावत कृषी तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी उत्पादन वाढविणे व शाश्वत रोजगार उपलब्ध करणे.
- कोरडवाहू क्षेत्रातील कृषी उत्पादनातील जोखीम कमी करून शेतकऱ्यांचा कोरडवाहू शेतीबाबत आत्मविश्वास वाढविणे.

**योजनेची व्याप्ती :** राज्यातील सर्व जिल्हे

**लाभार्थी पात्रतेचे निकष :**

- अल्प व अत्यल्प भूधारक व महिला शेतकऱ्यांना प्राधान्य द्यावे.
- कोरडवाहू क्षेत्र विकास योजनेंतर्गत किमान ५०% निधी वर नमूद लाभधारकांवर खर्च करण्यात यावा.
- प्रस्तावित निधीच्या १६% व ८% किंवा अनु.जाती / जमाती यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुक्रमे अनु.जाती व अनु. जमाती या प्रवर्गासाठी तरतूद करण्यात यावी.
- लाभार्थी हा सध्याच्या प्रचलित पीक पद्धतीमध्ये बदल करुन एकात्मिक शेती पद्धतीतील बाबी राबविण्यास इच्छुक असला पाहीजे.

**अर्ज करण्याची कार्यपद्धती**

सदर योजना ही समूह आधारित असल्याने निवड झालेल्या गावातील कृषी सहाय्यक यांचेशी संपर्क साधून अर्ज सादर करावा.

**अनुदान स्वरूप :**

- फळपीक आधारित शेती पद्धती - रु. २५,००० प्रती हे.
- दुग्धोत्पादक पशुधन आधारित शेती पद्धती - रु. ४०,००० प्रती हे.
- इतर पशुधन आधारित शेती पद्धती - रु. २५,००० प्रती हे.
- वनिकी आधारित शेती पद्धती - रु. १५,००० प्रती हे.
- ग्रीन हाऊस - रु. ४६८ प्रती चौ.मी.
- शेडनेट हाऊस - रु. ३५५ प्रती चौ.मी.
- मूरघास युनिट - रु. १,२५,००० प्रती यूनिट.
- मधुमक्षिका पालन - रु. ८०० प्रती कॉलनी.
- काढणी पश्चात तंत्रज्ञान - रु. ४००० प्रती चौ.मी.
- गांडूळ खत युनिट (कायमस्वरूपी) - रु. ५०,००० प्रती यूनिट.
- हिरवळीचे खत - रु. २००० प्रती हे.

**संपर्क :**

तालुका कृषी अधिकारी कार्यालय व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय.

## अन्न आणि पोषण सुरक्षा-अन्नधान्य पिके (पूर्वीचे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान)

**काढणी पश्चात तंत्रज्ञान उपकरणे -**

**शेतकरी उत्पादक संघ/ कंपनी करिता बीज प्रक्रिया युनिट उभारणी -**

- प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% किंवा रु. १०.०० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय आहे.

**शेतकरी उत्पादक संघ/ कंपनी करिता गोदाम बांधकाम -**

- २५० मे. टन साठवणूक क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० % किंवा रु.१२.५० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय आहे.

**बियाणे व रोपवाटिका**

**बियाणे उत्पादनास अर्थसाहाय्य :**

**(अ) अन्न आणि पोषण सुरक्षा ( कडधान्य ) अंतर्गत :**

१० वर्षाआतील सुधारित वाणाचे प्रमाणित बियाणे उत्पादनास रुपये ५००० प्रती क्विंटल.

**(ब) अन्न आणि पोषण सुरक्षा (पौष्टिक तृणधान्य) अंतर्गत :**

१० वर्षाआतील सुधारित वाणाचे प्रमाणित बियाणे उत्पादनास रुपये ३००० प्रती क्विंटल.

**राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळीतधान्य) अंतर्गत :**

दहा वर्षाआतील अधिसुचित वाणांच्या उत्पादीत पायाभूत / प्रमाणित बियाणासाठी उच्चतम मर्यादा रु.२५००/क्वि.तसेच, ५ वर्षातील वाणांच्या बियाणे उत्पादनासाठी रु.१००/क्वि. पूरक अनुदान.

**प्रमाणित बियाणे वितरण :**

**(अ) अन्न आणि पोषण सुरक्षा ( मका ) अंतर्गत :**

राज्यासाठी अधिसूचित १० वर्षाआतील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये ३००० प्रती क्विंटल, १० वर्षावरील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये १५०० प्रती क्विंटल व संकरित वाणाचे बियाण्यास किंमतीच्या ५० टक्के किंवा १०००० प्रती क्विंटल या पैकी जे कमी असेल ते.

**(ब) अन्न आणि पोषण सुरक्षा ( पौष्टिक तृणधान्य ) अंतर्गत :**

राज्यासाठी अधिसूचित १० वर्षाआतील वाणाचे बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये ३००० प्रती क्विंटल, १० वर्षावरील वाणाचे बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये १५०० प्रती क्विंटल व संकरित वाणाचे बियाण्यास किंमतीच्या ५० टक्के किंवा १०००० प्रती क्विंटल या पैकी जे कमी असेल ते.

**(क) अन्न आणि पोषण सुरक्षा ( भात ) अंतर्गत :**

राज्यासाठी अधिसूचित १० वर्षाआतील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये २००० प्रती क्विंटल व दहा वर्षावरील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये १००० प्रती क्विंटल या पैकी जे कमी असेल ते.

**(ड) अन्न आणि पोषण सुरक्षा (कडधान्य) अंतर्गत :**

राज्यासाठी अधिसूचित १० वर्षाआतील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा ५००० प्रती क्विंटल व १० वर्षावरील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये २५०० प्रती क्विंटल या पैकी जे कमी असेल ते.

**(इ) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान ( गहू ) अंतर्गत :**

राज्यासाठी अधिसूचित १० वर्षाआतील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये २००० प्रती क्विंटल व दहा वर्षावरील वाणाचे सुधारित बियाण्यास किंमतीच्या ५०% किंवा रुपये १००० प्रती क्विंटल या पैकी जे कमी असेल ते.

**सिंचन सुविधा**

**पंप संच**

- अन्न आणि पोषण सुरक्षा ( भात, गहू व कडधान्य ) अंतर्गत - रुपये १०,००० किंवा किंमतीच्या ५०% यापैकी जे कमी असेल ते (कृषी यांत्रिकीकरण उप अभियानाच्या मार्गदर्शक सूचनानुसार)
- अन्न आणि पोषण सुरक्षा ( भात, गहू व कडधान्य ) अंतर्गत : किंमतीच्या ५० % किंवा रु. ५०/-, रु. ३५/- व रु. २०/- प्रती मीटर याप्रमाणे पाईपच्या प्रकारानुसार अनुदान अनुज्ञेय ( कमाल लाभ मर्यादा रुपये रु. १५,००० प्रति शेतकरी )

**अन्न आणि पोषण सुरक्षा (भात, गहू व कडधान्य) अंतर्गत :**

**(अ) अन्न आणि पोषण सुरक्षा ( मका ) अंतर्गत :**

शेतकरी उत्पादक संघ / कंपनी (FPO/FPC) यांना २५० मे. टन साठवणूक क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० % किंवा रु.१२.५० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय आहे.

**प्रशिक्षण व अभ्यासदौरे -**

**शेतकरी प्रशिक्षण**

**अन्न आणि पोषण सुरक्षा ( भात, गहू, कडधान्य, पौष्टिक तृणधान्य व कडधान्य ) अंतर्गत :**

पीक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम क्रॉपसॅपच्या मार्गदर्शक सूचनानुसार शेतकरी शेतीशाळा धर्तीवर राबविण्यात येतो. यासाठी रु. १४०००/- प्रति प्रशिक्षण अनुदान अनुज्ञेय आहे.

**प्रात्यक्षिके -**

पीक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम क्रॉपसॅपच्या मार्गदर्शक सूचनानुसार शेतकरी शेतीशाळा धर्तीवर राबविण्यात येतो. यासाठी रु. १४०००/- प्रति प्रशिक्षण अनुदान अनुज्ञेय आहे.

**अन्न आणि पोषण सुरक्षा ( भात, गहू, कडधान्य व TRFA कडधान्य ) अंतर्गत :**

अ) सलग पीक प्रात्यक्षिके (भात,गहू, तूर, मुग, उडीद, हरभरा) -
प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी -उच्चतम रु ९००० प्रती हेक्टर

आ) आंतरपिक प्रात्यक्षिक : सोयाबीन + तूर -
प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी- उच्चतम रु. ९००० प्रती हेक्टर

**इ) पीक पद्धतीवर आधारित प्रात्यक्षिके**

- भात पिकानंतर कडधान्य (हरभरा/चवळी/राजमा/वाल) प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी- उच्चतम रु. १५,००० प्रती हेक्टर.
- खरीप सोयाबीन/मुग/उडीद पिकानंतर गहू : प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी -उच्चतम रु. १५,००० प्रती हेक्टर .
- मुग/ उडीद पिकानंतर रब्बी ज्वारी/ गहू : प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी- उच्चतम रु. १५,००० प्रती हेक्टर.
- भात/ बाजरी पिकानंतर हरभरा : प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी- उच्चतम रु. १५,००० प्रती हेक्टर.

ई) स्थानिक पुढाकाराच्या बाबी अंतर्गत पीक प्रात्यक्षिक - भात पिकाचे स्थानिक वाणांची लागवड ५० % मर्यादेत उच्चतम रु. ४५०० प्रती हेक्टर (प्रात्यक्षिक पॅकेजनुसार).

उ) स्थानिक पुढाकाराच्या बाबी अंतर्गत पीक प्रात्यक्षिक -कडधान्य पिकाचे स्थानिक वाणांची लागवड ५० % मर्यादेत उच्चतम रु. ७५०० प्रती हेक्टर (प्रात्यक्षिक पॅकेजनुसार).

**अन्न आणि पोषण सुरक्षा ( भरडधान्य मका व पौष्टिक तृणधान्य ) अंतर्गत :**

अ) सलग पीक प्रात्यक्षिके (मका, खरीप/रब्बी ज्वारी, खरीप/रब्बी बाजरी, नाचणी, वरई)
प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी- उच्चतम रु. ६००० प्रती हेक्टर.

आ) आंतरपिक प्रात्यक्षिक : मका + तूर/सोयाबीन -
प्रात्यक्षिक निविष्ठा पॅकेजनुसार अंमलबजावणी -उच्चतम रु. ६००० प्रती हेक्टर
निविष्ठा -

**एकात्मिक अन्नद्रव्ये/ कीड व्यवस्थापन प्रोत्साहन -**

अन्न आणि पोषण सुरक्षा अन्नधान्य पिके ( भात, गहू, कडधान्य, पौष्टिक तृणधान्य व TRFA कडधान्य ) -

**अ) एकात्मिक अन्नद्रव्ये व्यवस्थापन अंतर्गत :**

सूक्ष्म मूलद्रव्ये- रु. ५०० प्रती हेक्टर किंवा किंमतीच्या ५० % जे कमी असेल ते.
जैविक खते - रु. ३०० प्रती हेक्टर किंवा किंमतीच्या ५० % जे कमी असेल ते

**आ) एकात्मिक कीड व्यवस्थापन अंतर्गत :**

तणनाशके- रु. ५०० प्रती हेक्टर किंवा किंमतीच्या ५० % जे कमी असेल ते
पीक संरक्षण औषधे - रु. ५०० प्रती हेक्टर किंवा किंमतीच्या ५० % जे कमी असेल ते

## राज्याच्या कृषि विस्तार कार्यक्रमांना विस्तारविषयक सुधारणा करिता सहाय्य (आत्मा)

**योजनेचा उद्देश :**

शेतकरी गट संघटन व शेतकरी उत्पादक समूह यांचे निर्मितीद्वारे शेतकऱ्याचे तंत्रज्ञान व शेती व्यवस्थापन विषयक प्रश्न सोडवणे.
संशोधन, कृषी व संलग्न विस्तार विभाग आणि शेतकऱ्यांमध्ये कार्यक्षम समन्वय प्रस्थापित करणे.
विस्तार कार्यक्रमामधील लिंग समभाव आणण्याच्या दृष्टीने महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढवणे.
विस्तार कार्यक्रमांची परिणाम कारकता वाढवणे.

**समाविष्ट जिल्हे :** मुंबई व मुंबई उपनगर वगळता उर्वरित 34 जिल्हे

**योजनेचे स्वरूप :**

कृषी विस्ताराला प्रसार माध्यमे व तंत्रज्ञानाचे साहाय्य देणे.
शेतकऱ्यांचे व विस्तार कर्माचाऱ्यांचे कौशल्य व क्षमता वाढवणे.
जिल्हास्तरावरील आत्मा यंत्रणेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना केंद्रीभूतमानून कृषी विस्तारातील सुधारणा विषयक तंत्रज्ञान प्रसारित करणे.
जिल्हास्तरावर संलग्न यंत्रणांमध्ये समन्वय साधून विस्तार कार्यक्रम प्रभाविपणे राबविणे

**योजनेची अंमलबजावणी :**
प्रकल्प संचालक आत्मा सर्व जिल्हे

# जिल्हा कृषी महोत्सव

**योजनेचे महत्त्व :**

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना / उपक्रमांची माहिती संशोधित कृषी तंत्रज्ञान व प्रयोगशील शेतकऱ्यांचे अनुभव इतर शेतकऱ्यां पर्यंत पोहोचविणे धान्य व खाद्य महोत्सवाद्वारे थेट विक्रीला चालना देणे.

**योजनेचा उद्देश:**

1) कृषी विषयक तंत्रज्ञान व शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे.
2) शेतकरी शास्त्रज्ञ आणि संशोधन - विस्तार विपणन साखळी सक्षम करणे.
3) समूह/गट स्थापित करून शेतकरी उत्पादन कंपन्यांचे सक्षमीकरण करणे.
4) शेतकरी ते ग्राहक थेट विक्री साखळी विकसित करणे.
5) कृषी विषयक परिसंवाद आयोजित करून शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करणे.
6) विक्रेता ते खरेदीदार संमेलन आयोजित करून बाजाराभिमुख कृषी उत्पादनास चालना देणे.

**योजनेची व्याप्ती:**

मुंबई व मुंबई उपनगर वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यात दर वर्षी ५ दिवसाचा जिल्हा कृषी महोत्सव आयोजित करण्यात येतो.

**योजनेचे स्वरूप :**

१) कृषी प्रदर्शन:- शासकीय दालने, विविध कंपन्या, खाद्यपदार्थ व प्रात्याक्षिके यांचा समावेश.
२) परिसंवाद:- कृषी, कृषी प्रक्रिया व पूरक व्यवसाय आधारित चर्चासत्र आयोजन.
३) उत्पादक ते ग्राहक थेट विक्री करणे/धान्य महोत्सवाचे आयोजन.
४) विक्रेता - खरेदीदार संमेलनाचे आयोजन.
५) जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त तसेच उल्लेखनीय काम केलेले शेतकरी, गट/संस्था यांचा सन्मान.

मुंबई व मुंबई उपनगर वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यात दर वर्षी ५ दिवसाचा जिल्हा कृषी महोत्सव आयोजित करण्यात येतो.

**लाभार्थी पात्रतेचे निकष :**

जिल्हा कृषी महोत्सवात सहभागी होण्याची इच्छा असणारी व्यक्ती/शेतकरी

**कार्यान्वयीन यंत्रणा**

प्रकल्प संचालक आत्मा

# कृषि पायाभूत सुविधा निधी योजना

## योजनेची व्याप्ती-

कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभाग, नवी दिल्ली यांचेमार्फत सन २०२०-२१ ते २०३२-३३ या कालावधीत कृषी पायाभूत सुविधा निधी योजना (एआयएफ) राबविण्यात येत असून केंद्र शासनामार्फत सदर योजनेंतर्गत कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांना वित्तपुरवठा करणेकरीता १ लक्ष कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत २ कोटी मर्यादेपर्यंतच्या सर्व एआयएफ कर्जावर वार्षिक ३ टक्के व्याज सूट असेल, ही सवलत जास्तीत जास्त ७ वर्षांपर्यंत उपलब्ध आहे. तसेच पात्र कर्जधारकांसाठी सूक्ष्म व लघु उद्योजक योजनेच्या पत हमी निधी ट्रस्ट अंतर्गत २ कोटी पर्यंतच्या कर्जासाठी या वित्त पुरवठा सुविधेतून पत हमी संरक्षण उपलब्ध आहे, या संरक्षणाकरीता लागणारे शुल्क शासनामार्फत भरण्यात येईल. शेतकरी उत्पादक संस्थेकरीता कृषी सहकार आणि शेतकरी कल्याण विभागाच्या अधिनस्त असलेल्या लघु कृषक कृषी व्यापार संघामार्फत राबविण्यात येणाऱ्या पत हमी योजनेचा लाभ घेता येईल.

**पात्र प्रकल्प-**

ई-मार्केटिंग प्लॅटफॉर्मसह पुरवठा साखळी सेवा, गोदाम आणि सायलोस, कोल्ड स्टोअर्स आणि कोल्ड चेन, पॅकेजिंग युनिट्स, असेयिंग युनिट्स, वर्गीकरण आणि वर्गीकरण युनिट, लॉजिस्टिक सुविधा- रीफर व्हॅन आणि इन्सुलेटेड वाहने, राईपनिंग चेंबर्स, शेतातील अवशेष/कचरा व्यवस्थापन पायाभूत सुविधा, प्राथमिक प्रक्रिया उपक्रम,

**सामुदायिक शेती मालमत्ता**

सेंद्रिय निविष्ठा उत्पादन - गांडूळ खत इ, कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्लांट, जैव उत्तेजक उत्पादन युनिट, स्मार्ट आणि अचूक शेतीसाठी पायाभूत सुविधा, ड्रोनची खरेदी, फील्डवर विशेष सेन्सर्स लावणे, ब्लॉकचेन इ, रिमोट सेन्सिंग आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज जसे की स्वयंचलित हवामान केंद्र, जीआयएस अनुप्रयोगांद्वारे सल्लागार सेवा, नर्सरी, टिश्यू कल्चर, बीज प्रक्रिया, कस्टम हायरिंग सेंटर - फार्म मशिनरी/ अवजारे (किमान ४ प्रमाणात), फार्म/हार्वेस्ट ऑटोमेशन (कम्बाइन हार्वेस्टर, ऊस तोडणी यंत्र, बूम स्प्रेअर इ.), स्टँडअलोन सोलर पंपिंग सिस्टम (पीएम-कुसुम घटक बी), (PM-KUSUM घटक C) अंतर्गत ग्रीड जोडलेल्या कृषी पंपाचे सौरीकरण, एकात्मिक स्पिरुलिना उत्पादन आणि प्रक्रिया युनिट, रेशीम प्रक्रिया युनिट, मध प्रक्रिया, प्लांट क्वारंटाइन युनिट्स,

**पिकांच्या क्लस्टर्ससाठी पुरवठा साखळी पायाभूत सुविधा प्रदान करण्यासाठी ओळखण्यात आलेले प्रकल्प निर्यात क्लस्टर्ससह.**

पीपीपी अंतर्गत केंद्र/राज्य/स्थानिक सरकार किंवा त्यांच्या एजन्सीद्वारे प्रोत्साहन दिलेले प्रकल्प सामुदायिक शेती मालमत्ता तयार करण्यासाठी किंवा काढणीनंतरचे व्यवस्थापन प्रकल्प.

**खालील प्रकल्प केवळ FPO, PACS, SHGs, JLGs सारख्या गटांसाठी पात्र आहेत.**

सहकारी, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय सहकारी महासंघ, एफपीओ फेडरेशन,
SHGs च्या फेडरेशन्स, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय एजन्सी समुदाय म्हणून पात्र आहेत.
हायड्रोपोनिक शेती, मशरूम शेती, उभी शेती, एरोपोनिक शेती, पॉली हाऊस/ग्रीन हाऊस,
लॉजिस्टिक सुविधा (नॉन-फ्रिजरेटेड/इन्सुलेटेड वाहनांसह).

**पात्र लाभार्थी-**

सदर योजनेतंर्गत प्राथमिक कृषी पत संस्था विपणन सहकारी संस्था,शेतकरी उत्पादक संस्था, स्वंयसाहाय्यता गट,शेतकरी,संयुक्त उत्तरदायित्व गट,बहुउद्देशीय सहकारी संस्था,कृषी उधोजक, स्टॉटअप आणि केंद्र/राज्य संस्था किंवा स्थानिक संस्था पुरस्कृत सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्प यांना लाभ घेता येईल.

**सहभागी वित्त संस्था'**

सर्व अनुसुचित व्यावसायिक बँका,अनुसुचित सहकारी बँका,प्रादेशिक ग्रामीण बँका, लघु वित्त बँका,बिगर बँकिंग वित्तीय कंपन्या आणि राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ या वित्त पुरवठा करण्यासाठीचा फायदा घेणेसाठी राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेबरोबर/कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभाग यांचेबरोबर सांमजस्य करार स्वाक्षरी करुन भाग घेऊ शकतात.

## फळे ,फुले व वृक्ष लागवड

### राष्ट्रीय औषधी वनस्पती अभियान अंतर्गत औषधी वनस्पती लागवड

नष्टप्राय होण्याचा धोका असणाऱ्या व आयुष उद्योगाकडून मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या प्रजाती- प्रती हेक्टर लागवड खर्चाच्या ७५ टक्के.

नष्ट प्राय होण्याच्या मार्गावर व ज्यांचा पुरवठ्याचा स्त्रोत खालावत आहे अशा प्रजाती- प्रती हेक्टर लागवड खर्चाच्या ५०%.

### राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (वृक्षजन्य तेलबिया) अंतर्गत वृक्षजन्य तेलबिया लागवड

करंज, २००००/हे.
मोह. १५०००/ हे.
कोकम ५०००/ हे.

### राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (वृक्षजन्य तेलबिया) अंतर्गत वृक्षजन्य तेलबिया लागवड

करंज रु.२०००/ हे. (४ वर्षापर्यंत)
मोह रु. २०००/ हे. (८ वर्षापर्यंत)
कोकम रु.२०००) (६ वर्षापर्यंत)

## पुष्पोत्पादन विकास कार्यक्रम

### एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत

कटफ्लॉवर्स (लांब दांड्याची फुल पिके) गुलाब, अॅस्टर, बर्ड ऑफ पॅराडाईज, हेलिकोनियास, गोल्डन रॉड, शेवंती, स्टॅटीस, लेडिस लेस, जरबेरा, कार्नेशन, अँथुरियम इ.
कटफ्लॉवर्स साठी अल्प भूधारक शेतकऱ्यांना खर्चाच्या ४० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ४०,००० प्रति हेक्टरी आणि इतर शेतकऱ्यांना २५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु.२५,००० प्रति हेक्टरी अनुदान (जास्तीत जास्त २ हे. प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा राहिल.)

कंदवर्गीय फुले (निशिगंध, ग्लैडीओलस, लिलिज, लिलियम, कॅलालिली, डेलिया इ.)
कंदवर्गीय फुलांसाठी अल्प भूधारक शेतकऱ्यांना खर्चाच्या ४० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ६०,००० प्रति हेक्टरी आणि इतर शेतकऱ्यांना खर्चाच्या २५ टक्के या जास्तीत जास्त रु. ३७५०० प्रति हेक्टरी अनुदान (जास्तीत जास्त २ हे. प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा राहिल.)

सुटी फुले (झेंडू, अॅस्टर, गेलार्डिया, हेलिकायसम शेवंती, मोगरा, जाई, जुई, झिनिया, बिजली, इ.)
सुट्या फुलांसाठी अल्प भूधारक शेतकऱ्यांना खर्चाच्या ४० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. १६,००० प्रति हेक्टरी आणि इतर शेतकऱ्यांना २५ टक्के किंवा जास्तीत जास्त रु. १०,००० प्रति हेक्टरी अनुदान (जास्तीत जास्त २ हे. प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा राहिल.)

### पक्षीरोधक जाळी / गारपीट रोधक जाळी
### एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत

खर्चाच्या ५०% अनुदान ५००० चौ.मी.जास्तीत जास्त प्रती लाभार्थी देय राहील. रु. ३५ प्रतीचौ.मी. खर्चाचा मापदंड

### प्लास्टिक मल्चिंग
### एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत

प्रती लाभार्थी जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रासाठी खर्चाच्या ५० टक्के सर्वसाधारण क्षेत्रासाठी जास्तीत जास्त रु.१६०००/- प्रती हेक्टर व डोंगराळ क्षेत्रासाठी रु.१८४००/- प्रती हेक्टर अनुदान

### प्लॅस्टिक टनेल
### एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

प्रती लाभार्थी जास्तीत जास्त १००० चौ. मी. खर्चाच्या ५० टक्के सर्वसाधारण क्षेत्रासाठी रु. ६० प्रती चौ.मी.व डोंगराळ क्षेत्रासाठी रु. ७५ प्रती चौ. मी.

### परपरागीकरणासाठी मधुमक्षिका पालन
### एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत

न्यूक्लिअस स्टॉकचे उत्पादन करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रासाठी खर्चाच्या १०० टक्के व जास्तीतजास्त रु.२०.०० लाख (प्रकल्प आधारित)

बी - ब्रीडरकडून मधुमक्षिका वसाहतीचे उत्पादनकरणे - खर्चाच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु.४.०० लाख.

मधुमक्षिका वसाहती - खर्चाच्या ४० टक्के रू. ८०० प्रति, मधुमक्षिका वसाहत जास्तीत जास्त ५० वसाहतीकरीता अनुदान देय. मधुमक्षिका संच - खर्चाच्या ४० टक्के रू. ८०० प्रति, मधुमक्षिका संच जास्तीत जास्त् ५० संचाकरीता अनुदान देय.

मध काढणीयंत्र व साठवणे करिता भांडे - खर्चाच्या ४० टक्के जास्तीत जास्त रु. ८००० प्रती संच.
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पातील १५ जिल्हे (प्रकल्पगावे) अंतर्गत मधपेट्या, मधकाढणी व साठवण सुविधा बँक कर्जाशी निगडीत प्रकल्क ५० टक्के

**उच्च तंत्र शेती**

**नियंत्रित शेती - हरितगृह**

**अ)एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान**

उच्च तंत्रज्ञान आधारित हरितगृह उभारणीसाठी प्रती लाभार्थी किमान १००० चौ.मी. जास्तीत जास्त ४००० चौ.मी.
मॉडेलनिहाय खर्चाचा मापदंड - रु.१४०० ते १४६५ प्रती चौ.मी.
अनुदान मर्यादा - खर्च मापदंडाच्या ५० % देय अनुदान.

**आ) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान**

सर्वसाधारण हरितगृह उभारणीसाठी कमीत कमी ५०० चौ.मी. व जास्तीत जास्त ४००० चौ.मी.
मॉडेलनिहाय खर्चाचा मापदंड - रु.८४४ ते ९३५ प्रती चौ.मी.
अनुदान मर्यादा - खर्च मापदंडाच्या ५० % देय अनुदान.

**आ) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान**

अ)एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान
राऊंड टाईप

प्रती लाभार्थी कमीत कमी १००० चौ.मी. व जास्तीत जास्त ४००० चौ.मी.
मॉडेलनिहाय खर्चाचा मापदंड - रु.६३९ ते ७१० प्रती चौ.मी.
अनुदान मर्यादा - खर्च मापदंडाच्या ५० % देय अनुदान.

**आ) फ्लॅट टाईप**

प्रती लाभार्थी कमीत कमी १००० चौ.मी. व जास्तीत जास्त ४००० चौ.मी.
मॉडेलनिहाय खर्चाचा मापदंड - रु.४५६ ते ७१० प्रती चौ.मी.
अनुदान मर्यादा - खर्च मापदंडाच्या ५० % देय अनुदान.

**पक्षीरोधक जाळी / गारपीट रोधक जाळी**

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत**

खर्चाच्या ५० % अनुदान ५००० मी. जास्तीत जास्त प्रती लाभार्थी देय राहील. रु.३५ प्रती चौ.मी. खर्चाचा मापदंड

**प्लास्टिक मल्चिंग**

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत**

प्रती लाभार्थी जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रासाठी खर्चाच्या ५० टक्के सर्वसाधारण क्षेत्रासाठी जास्तीत जास्त रु.१६,०००/- प्रती हेक्टर व डोंगराळ क्षेत्रासाठी रु.१८,४००/- प्रती हेक्टर अनुदान

**प्लॅस्टिक टनेल**

**एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान**

प्रती लाभार्थी जास्तीत जास्त १०००चौ.मी. खर्चाच्या ५० टक्के सर्वसाधारण क्षेत्रासाठी रु. ६० प्रती चौ.मी. व डोंगराळ क्षेत्रासाठी रु. ७५ प्रती चौ.मी.

# प्रधानमंत्री पीक विमा योजना

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०१६ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. ही योजना खरीप हंगाम २०२३ ते रब्बी हंगाम २०२५-२६ हंगामासाठी तीन वर्षांकरीता राज्यात Cup & Cap Model (८०:११०) नुसार राबविण्यात येत आहे.

कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. प्रपीवियो-२०२३/प्र.क्र.३४/११-अे, दि.२३/०६/२०२३ अन्वये प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत शेतकऱ्यांना रु.१/- भरुन पीक विमा योजनेचा लाभ देण्याकरीता सर्वसमावेशक पीक विमा योजना ही खरीप २०२३-२४ पासून राबविण्यास मान्यता देण्यात आली असून खरीप हंगाम सन २०२३-२४ पासून शेतकऱ्यांना रु.१/- भरुन पीक विमा योजनेचा लाभ घेता येईल. शेतकऱ्यांना केवळ १/- रुपया भरून प्रधानमंत्री पीक विमा योजना पोर्टल https://pmfby.gov.in वर स्वत: शेतकरी यांना तसेच बँक, विमा कंपनी प्रतिनिधी व सामुहिक सेवा केंद्र यांचे मार्फत योजनेतील सहभागाची नोंदणी करता येते. कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.प्रपीवियो-२०२३/प्र.क्र.५२/११-अे, दि.२३/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

**1. योजनेची उद्दीष्ट्ये :**

नैसर्गिक आपत्ती, किड आणि रोगासारख्या अकल्पित प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यां ना विमा संरक्षण देणे.
पिकांच्या नूकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यां चे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे.
शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देणे.
कृषी क्षेत्रासाठीच्या पत पुरवठ्यात सातत्य राखणे, जेणेकरुन उत्पादनातील जोखमींपासून शेतकऱ्यांच्या संरक्षणाबरोबरच अन्नसुरक्षा, पिकांचे विविधीकरण आणि कृषिक्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकतेत वाढ हे हेतू साध्य होण्यास मदत होईल.

**योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये :**

सदरची योजना ही या आदेशान्वये अधिसूचित केलेल्या क्षेत्रातील केवळ अधिसूचित पिकांसाठी असेल.
प्रधानमंत्री पीक विमा योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.
अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकासाठी खातेदारांचे व्यतिरिक्त कुळाने अगर भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे.
या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता खरीप हंगामासाठी २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के तसेच खरीप व रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी ५ टक्के असा मर्यादित ठेवण्यात आला आहे. तथापि सन २०२३-२४ पासून सर्वसमावेशक पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून शेतकऱ्यांना प्रती अर्ज केवळ १/- रुपया भरून पीक विमा पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे. या योजनेंतर्गत निश्चित करण्यात आलेला पिकनिहाय प्रति हेक्टरी विमा हप्ता दर व शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात भरावयाचा विमा हप्ता रक्कम रु.१/- वजा जाता उर्वरित फरक हा सर्वसाधारण विमा हप्ता अनुदान समजून राज्य शासनामार्फत अदा करण्यात येईल.
या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२३ व रब्बी हंगाम २०२३-२४ या एका वर्षाकरिता जोखिमस्तर सर्व अधिसूचित पिकांसाठी ७० टक्के असा निश्चित करण्यात आला आहे.

अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांचे उंबरठा उत्पादन हे मागील ७ वर्षांपैकी सर्वाधिक उत्पादनाच्या ५ वर्षांचे सरासरी उत्पादन गुणिले त्या पिकाचा जोखीमस्तर विचारात घेऊन निश्चित केले जाते. उंबरठा उत्पादन हे एक वर्ष कालावधी करिता असेल तसेच विमा कंपनीने सादर केलेला विमा हप्ता दरही या एक वर्ष कालावधीकरिता असेल. सदरची योजना ही एकूण १२ जिल्हा समुहासाठी निवडलेल्या पिक विमा कंपन्यांमार्फत एका वर्षाकरिता राबविण्यात येईल. विमा कंपन्या एका वर्षामध्ये जिल्हा समूहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्के पर्यंतचे दायित्व स्वीकारतील. तथापि, एका वर्षातील देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम, जमा विमा हप्ता रक्कमेच्या ११० टक्के पेक्षा जास्त असल्यास ११० टक्के पेक्षा जास्तीचा भार राज्य शासन स्वीकारेल आणि जर देय पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम जिल्हा समुहामध्ये एकूण जमा विमा हप्ता रकमेपेक्षा कमी असेल तर विमा कंपनी विमा हप्ता रक्कमेच्या जास्तीत जास्त २० टक्के रक्कम स्वत:कडे ठेवेल व उर्वरित विमा हप्ता रक्कम राज्य शासनाला परत करेल. या योजनेत मृत शेतकऱ्यांच्या नावे विमा काढला गेल्यास तो प्रस्ताव रद्द करण्यात येईल.

**जोखमीच्या बाबी -**

योजनेंतर्गत जोखमींची व्याप्ती वाढविण्यात आली असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

**खरीप व रब्बी हंगामाकरिता :**

हवामान घटकांच्या प्रतिकूल परिस्थिती मुळे पिकांची पेरणी किंवा लावणी न झाल्यामुळे होणारे नुकसान.
स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान.
हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान.
नैसर्गिक कारणांमुळे पिकांचे होणारे काढणीपश्चात नुकसान.
पीक पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आग,वीज कोसळणे, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, पूर, क्षेत्र जलमय होणे, भूस्खलन, दुष्काळ, पावसातील खंड, कीड व रोग इत्यादी बाबींमुळे उत्पन्नात येणारी घट.

**समाविष्ट पिके : (१४ पिके) (खरीप हंगाम)**

तृणधान्य : भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका.
कडधान्य : तूर, मूग, उडीद.
गळित धान्य : भुईमूग, सोयाबीन, तीळ, कारळे.
नगदी पिके : कापूस व कांदा.

**समाविष्ट पिके : (०६ पिके) (रबी हंगाम)**

तृणधान्य व कडधान्य : उन्हाळी भात, गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा.
गळित धान्य : उन्हाळी भुईमूग,
नगदी पिके : रब्बी कांदा.

**सहभागी शेतकरी :**

अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेणारे सर्व शेतकरी या योजनेत भाग घेण्यास पात्र आहेत. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजना ऐच्छिक राहील.

**विमा संरक्षणाच्या बाबी :**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुढील कारणामुळे म्हणजेच शेतकऱ्यांस टाळता न येण्याजोग्या कारणामुळे झालेल्या नुकसानीस विमा संरक्षण मिळेल.

**प्रतिकूल हवामान घटकांमुळे पेरणी / लावणी / उगवण न होणे :**

अपुरा पाऊस, हवामानातील इतर घटकांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे केवळ अधिसूचित मुख्य पिकांची अधिसूचित क्षेत्रात व्यापक प्रमाणावर पेरणी / लावणी होऊ न शकलेल्या क्षेत्रासाठी पेरणी / लावणी न झालेले क्षेत्र हे सर्वसाधारण क्षेत्राच्या ७५ टक्के पेक्षा जास्त असल्यास एकुण विमा संरक्षित रकमेच्या २५ टक्के विमा संरक्षण देय राहील.

**पीक पेरणीपासून काढणी पर्यंतच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट:**

दुष्काळ, पावसातील खंड, पूर, क्षेत्र जलमय होणे, कीड व रोगांचा व्यापक प्रादुर्भाव, भूस्खलन, नैसर्गिक आग, वीज कोसळणे, वादळ, गारपीट आणि चक्रीवादळ या टाळता न येण्याजोग्या जोखमींमुळे पिकांच्या उत्पन्नात येणाऱ्या घटीपासून व्यापक विमा संरक्षण दिले जाईल.

**हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान :**

हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत, मात्र सर्वसाधारण काढणीच्या १५ दिवस आधीपर्यंत पूर, पावसातील खंड, दुष्काळ इ. बाबींमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पादनामध्ये गत ७ वर्षांच्या सरासरी उत्पादनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर विमा संरक्षण देय राहील.

**काढणी पश्चात नुकसान :**

ज्या पिकांची काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंढ्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते अशा कापणी / काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकाचे काढणीनंतर दोन आठवड्यांच्या आत ( १४ दिवस ) गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगरमोसमी पावसामुळे नुकसान झाल्यास वैयक्तिकस्तरावर पंचनामे करून निकषांचे अधीन राहून नुकसान भरपाई निश्चित केली जाईल.

**काढणी पश्चात नुकसान :**

या बाबीअंतर्गत गारपीट, भूस्खलन, विमासंरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, ढगफुटी अथवा वीज कोसळल्यामुळे लागणारी नैसर्गिक आग या स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त झाल्यामुळे होणारे अधिसुचित पिकाचे ठरावीक क्षेत्रातील नुकसान हे वैयक्तिकस्तरावर पंचनामे करून निश्चित करण्यात येईल.

**सर्वसाधारण अपवाद -**

वरील सर्व विमा संरक्षणाच्या बाबी युद्ध आणि अणू युद्धाचे चे दुष्परिणाम, हेतूपुरस्सर केलेल्या नुकसानीस व इतर टाळता येण्याजोग्या धोक्यास लागू असणार नाहीत त्यामुळे अशा परिस्थितीत विमा संरक्षण मिळणार नाही.

**जोखीमस्तर**

सर्व पिकांसाठी ७० टक्के जोखीमस्तर आहे.

### विमा हप्ता व अनुदान :

शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, रब्बी हंगामासाठी १.५ टक्के व नगदी पिकांसाठी ५ टक्के असा किंवा वास्तवदर्शी दर यापैकी जो कमी असेल तो राहील. केंद्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनेनूसार केंद्र शासन कोरडवाहु जिल्ह्यातील पिकांना ३० टक्के व बागायती जिल्ह्यातील पिकांना २५ टक्केच्या मर्यादेत त्यांचा समप्रमाणातील हिस्सा अदा करणार आहे.

| जिल्हा समूह क्रमांक | समाविष्ट जिल्हे | नियुक्त केलेली विमा कंपनी |
|---|---|---|
| १ | अहमदनगर, नाशिक, चंद्रपूर | ओरिएन्टल इंन्शुरन्स कं.लि. |
| २ | सोलापूर, जळगाव, सातारा | |
| ३ | परभणी, वर्धा, नागपूर | आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंन्शुरन्स कं. लि. |
| ४ | जालना, गोंदिया, कोल्हापूर | युनिव्हर्सल सोम्पो जनरल इंन्शुरन्स कं. लि. |
| ५ | नांदेड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि. |
| ६ | औरंगाबाद, भंडारा, पालघर, रायगड | चोलामंडलम एम एस जनरल इंन्शुरन्स कं. लि. |
| ७ | वाशिम, बुलडाणा, सांगली, नंदुरबार | भारतीय कृषी विमा कंपनी |
| ८ | हिंगोली, अकोला, धुळे, पुणे | एचडीएफसी जनरल इर्गो इंन्शुरन्स कं.लि. |
| ९ | यवतमाळ, अमरावती, गडचिरोली | रिलायन्स जनरल इंन्शुरन्स कं. लि |
| १० | उस्मानाबाद | एचडीएफसी इर्गो जनरल इंन्शुरन्स कं.लि. |
| ११ | लातूर | एसबीआय जनरल इंन्शुरन्स कं.लि. |
| १२ | बीड | भारतीय कृषी विमा कंपनी |

### विमा संरक्षित रक्कम :

कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी पिकनिहाय विमा संरक्षण हे पीकनिहाय प्रति हेक्टरी मंजूर कर्ज मर्यादेपर्यंत देय राहील.

### राज्यात खरीप हंगाम २०२३ ते रब्बी हंगाम २०२५-२६ या ३ वर्षांकरिता

सदरची योजना खाली नमूद केलेल्या विमा कंपनीकडून संबंधित जिल्हा समूहामध्ये राबविण्यात येईल.

## प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना

- शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) निश्चित उत्पन्न मिळण्याकरिता प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना १ फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे.
- पात्र शेतकरी कुटुंबास रु. २०००/- प्रतिहप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात रु. ६०००/- प्रति वर्षी लाभ देण्यात येतो.
- १ फेब्रुवारी, २०१९ रोजी लागवडीयोग्य क्षेत्र असलेले सर्व शेतकरी कुटुंबास (अपात्रतेचे निकष वगळता) योजनेच्या लाभासाठी नोंदणी करून लाभ घेऊ शकतात.
- राज्यात या योजनेअंतर्गत एकूण नोंदणीकृत लाभार्थी - ११७.६१ लाख
- पोर्टलवरील पात्र लाभार्थी संख्या - ९७९९ लाख
- योजनेच्या १४ व्या हप्त्याअखेर एकुण रु. २५५९८.२१ कोटी रक्कम ११०.५३ लाख शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरण द्वारे जमा करण्यात आलेली आहे.
- आज अखेर वितरित झालेले हप्ते - १४
- पी.एम. किसान योजनेच्या १३ व्या हप्त्याचा लाभ अदा करण्यात आलेले लाभार्थी - ८१.१३ लाख.
- केंद्र शासनाने १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी बंधनकारक केलेल्या बाबींची पूर्तता खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

  १. पात्र लाभार्थींची भूमी अभिलेख नोंदीप्रमाणे पोर्टलवर माहिती अद्ययावत करणे - ९५.७५ लाख
  २. ई-केवायसी प्रमाणिकरण करणे - ८५.९४ लाख
  ३. बँक खाती आधार संलग्न करणे - ८८.९२ लाख

- या तीनही बंधनकारक बाबींची पूर्तता केलेले व १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी पात्र लाभार्थी - ७७.५५ लाख
- केंद्र शासनाने ई-केवायसी प्रमाणिकरण शिथिल केल्याने पात्र ठरत असलेले लाभार्थी - ८५.६० लाख.
- राज्यात ई-केवायसी प्रमाणीकरण व बँक खाती आधार संलग्न करणे, प्रलंबित लाभार्थींची कार्यपूर्तता करणेसाठी सामाईक सुविधा केंद्र व इंडिया पोस्टल पेमेंट्स बँक यांचे सहकार्याने कृषी विभागामार्फत गावपातळीवर कॅम्प आयोजित करण्यात आले.
- १ मे २०२३ पासून आयोजित गावपातळीवरील कॅम्पमध्ये राज्यातील ५.१८ लाख लाभार्थींचे ई-केवायसी प्रमाणीकरण व ५.२० लाख लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करण्यात आली आहेत.

## नमो शेतकरी महासन्मान निधी योजना

मा. उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी मा. प्रधानमंत्री यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी 'नमो शेतकरी महासन्मान निधी' ही योजना जाहीर केलेली आहे.

- या योजनेत केंद्र सरकारच्या प्रति वर्ष, प्रति शेतकरी दिल्या जाणा-या ६ हजार रुपयांच्या लाभात राज्य सरकार कडून आणखी ६ हजार रुपयांची भर पडणार आहे
- यामुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना १२ हजार रुपये प्रतिवर्षी मिळणार आहेत.
पी.एम.किसान योजनेच्या पुढील प्रत्येक हप्त्याचा लाभ मिळणा-या लाभार्थींना राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ अदा दिला जाणार आहे.
- केंद्र शासनाप्रमाणेच रक्कम रु. १८६६.४० कोटीचा लाभ राज्यातील ८५.६० लाख शेतकऱ्यांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजने मधून पहिला हप्ता अदा केला जाईल.

## अनुसुचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांसाठी विशेष योजना

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेंतर्गत नवीन विहीरीसाठी २ लाख ५० हजार, जुनी विहीर दुरुस्तीसाठी ५० हजार, इनवेल बोअरींगसाठी रुपये २००००, पंप संचासाठी २००००, वीज जोडणी आकारासाठी १०,०००, शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरणसाठी 1 लाख, ठिबक सिंचन संचासाठी ५० हजार किंवा तुषार सिंचनासाठी २५ हजार चा लाभ देय आहे.

### नवीन विहीर पॅकेज

नवीन विहीर,पंप संच, वीज जोडणी आकार, ठिबक किंवा तुषार असे एकूण ३.०५ ते ३.३० लाख.

### जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज

जुनी विहीर दुरुस्ती,पंप संच, वीज जोडणी आकार, ठिबक किंवा तुषार असे एकूण १.०५ ते १.३० लाख.

### शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज

शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, पंप संच, वीज जोडणी आकार, ठिबक किंवा तुषार असे एकूण १.५५ ते १.८० लाख

लाभार्थ्याकडे जर काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकाचा लाभ विहीत मर्यादेत देण्यात येईल.

नवीन विहीर/जुनी विहीर दुरुस्तीचा घटकांचा लाभ घेतल्यानंतरही लाभार्थ्याने इनवेल बोअरींग या घटकाची मागणी केल्यास सदर घटकाचा अतिरिक्त लाभ देण्यात येईल. सदर योजनांसाठी लाभार्थींची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये १,५०,०००/- आहे.

**या योजना कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत राबविण्यात येतात.**

## कापूस विकास कार्यक्रम

१२ व्या पंचवार्षिक योजनेत अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांचीही गरज भागवण्यासाठी कापूस पिकाचा समावेश करण्यात आलेला आहे. कापूस आधारित पीक पद्धतीस चालना देणे. कापूस पिकात एकात्मिक कीड व्यवस्थापनास चालना देणे, कापसाच्या सरळ वाणांची अतीघन लागवड पद्धतीचा अवलंब करून, अधिक लांब धाग्याच्या कापसाच्या वाणांची प्रात्यक्षिके आयोजित करून कापूस उत्पादनास चालना देणे ही या कार्यक्रमाची वैशिष्ट्ये आहेत.

**पात्रता निकष :**

या योजनेंतर्गत जिल्ह्यातील संबंधित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या लोकसंख्येच्या टक्केवारीच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गाच्या मंजूर कार्यक्रमापैकी पाच टक्के लाभ दिव्यांग प्रवर्गास देण्यात येतो. तसेच सर्व प्रवर्गातील लाभार्थींच्या  टक्के महिलांची निवड करण्यात येते. जिल्ह्यासाठी प्राप्त होणारा आर्थिक कार्यक्रम राबवताना प्रवर्गनिहाय असलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात कार्यक्रम राबवण्यात येतो. शेतकऱ्याचे स्वतःच्या नावे ७/१२ व ८-अ उतारा असणे बंधनकारक आहे. विहित प्रमाणानुसार अनु.जाती/जमाती प्रवर्गाचे लाभार्थी, ३० टक्के महिला व पाच टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. अल्प/अत्यल्पभूधारक यांचा प्राधान्याने समावेश करण्यात येतो. शेतकऱ्याचे कापूस पिकाखालील क्षेत्र किमान १ एकर असणे बंधनकारक आहे.

**एकात्मिक पीक व्यवस्थापन आधारेषीय प्रात्यक्षिके :**

यासाठी प्रतिहेक्टर ८ हजार रुपये इतके अर्थसाहाय्य आहे. आंतरपीक पद्धतीची आधारेषीय प्रात्यक्षिके (कापूस पिकात मूग, उडीद) यासाठी प्रतिहेक्टर ८ हजार रुपये इतके अर्थसाहाय्य आहे. कपाशीच्या सरळ वाणांच्या अतीघन लागवडीच्या चाचण्या यासाठी १० हजार रुपये प्रतिहेक्टर इतके अर्थसाहाय्य आहे. पीक संरक्षण औषधी व बायो एजंट्सचे वितरण : खर्चाच्या ५० टक्के, कमाल रुपये ५०० प्रतिहेक्टर इतके अर्थसाहाय्य देय आहे. आद्यरेषीय प्रात्यक्षिके (देशी आणि अती लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन) : यासाठी प्रतिहेक्टर ९ हजार रुपये इतके अर्थसाहाय्य आहे.

**कॉटन श्रेडरचे वाटप :**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला यांच्यासाठी श्रेडर यंत्राच्या किमतीच्या ५० टक्के कमाल रुपये एक लाख प्रती युनिटच्या मर्यादेत, तर इतर लाभार्थ्यांसाठी श्रेडर यंत्राच्या किमतीच्या ४० टक्के कमाल रुपये ८० हजार प्रती युनिटच्या मर्यादेत अर्थसाहाय्य देय आहे.

**अधिक माहितीसाठी :**

नजीकचे तालुका कृषी अधिकारी कार्यालय.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना

राज्यात यापूर्वी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना कार्यान्वित होती. मात्र विमा कंपन्यांच्या असमाधानकारक अनुभवामुळे आता नवीन सानुग्रह योजना राज्य शासनाने मंजूर केली आहे.

**वैशिष्ट्ये :**

पूर्वी राज्य शासन राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा विमा हप्ता विमा कंपन्यांकडे भरायचे आणि विमा कंपनी मग प्रस्ताव तपासून ते मान्य करायची. हा विलंब टाळण्यासाठी आणि अपघातग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ दिलासा देण्याच्या उद्देशाने आता प्रस्ताव मंजुरीचे अधिकारी तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीला दिले आहेत. अपघात घडल्यानंतर ३० दिवसांच्या आत परिपूर्ण प्रस्ताव संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे. अपघातात आता बाळंतपणातील मृत्यूचादेखील समावेश करण्यात आला आहे. वारसाच्या खात्यात डीबीटीद्वारे रक्कम जमा होणार आहे.

**योजनेचे स्वरूप :**

राज्यात शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, रस्ता/ रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळताना अथवा अन्य कारणांमुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरून पडून झालेला अपघात, सर्पदंश आणि विंचूदंश, नक्षलवाद्यांकडून झालेल्या हत्या, जनावरांच्या खाल्ल्यामुळे / चावण्यामुळे जखमी/ मृत्यू, दंगल, अन्य कोणतेही अपघात तसेच अपघाताच्या व्याख्येनुसार कोणत्याही अनपेक्षित, आकस्मिक दुर्दैवी अपघातामुळे होणारे मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास या योजनेतून लाभ देण्यात येईल. योजनेंतर्गत मिळणारे लाभ खालीलप्रमाणे राहतील : अपघाती मृत्यू, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे - रुपये दोन लाख, अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे - रुपये एक लाख.

**लाभार्थी पात्रता :**

राज्यातील १० ते ७० वयोगटातील वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्यांच्या कुटुंबातील वहितीधारक खातेदार म्हणून नोंद नसलेला कोणताही एक सदस्य.
अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे : सातबारा उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गावकामगार तलाठी यांच्याकडील गाव नमुना क्र. 6-क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद, शेतकऱ्यांच्या वयाची पडताळणीकरिता शाळा सोडल्याचा दाखला/ आधारकार्ड/ निवडणूक ओळखपत्र. ज्या कागदपत्राआधारे ओळख, वयाची खात्री होईल असे कोणतेही कागदपत्रे, प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, पोलीस पाटील माहिती अहवाल, अपघात स्वरूपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे.

**अधिक माहितीसाठी :**

आपल्या संबंधित नजीकचे तालूका कृषी अधिकारी कार्यालय.

## कृषी पुरस्कार

राज्यात दरवर्षी शेती व संलग्न क्षेत्रात अतिउल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या वतीने खालील पुरस्कार दिले जातात.

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार - (संख्या १) :**

कृषी क्षेत्रातील कृषी विस्तार, कृषी प्रक्रिया, निर्यात, कृषी उत्पादन, पीक फेरबदल, कृषी उत्पादनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी मध्ये अति उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील कोणत्याही एका शेतकऱ्यास अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सन्मानित करण्यात येते.

**वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार (संख्या ८) :**

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास व फलोत्पादन, ग्रामीण विकास, ज्यामध्ये बायोगॅसचा वापर, शेतकऱ्यांचा विकास इत्यादी संलग्नक्षेत्रात अद्वितीय कार्य करणाऱ्यांना राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत दरवर्षी एकूण (८) शेतकरी अथवा संस्थाना कृषिभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. रुपये ५० हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**जिजामाता कृषिभूषण पुरस्कार (संख्या ८ ) :**

राज्यातील शेतीक्षेत्राची सातत्याने होत असलेली प्रगती व या प्रगतीत, उत्पादन वाढीमध्ये महिलांचाही फार मोठा वाटा आहे व तो सातत्याने वाढत असून, शेती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळीत महिला सातत्याने पुढे येत आहेत. शेतीविकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्त्वाची बाब, तसेच शेतीक्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा व अशा महिलांच्या कार्याने प्रभावित होऊन इतर महिलांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत पुरस्काराची सुरुवात केली आहे. ५० हजार रुपये रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार- (संख्या-८) :**

सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सेंद्रिय निविष्ठा वापरण्यात प्रोत्साहन देऊन शेती करणाऱ्या तसेच उत्पादित सेंद्रिय मालाची विक्रीव्यवस्था करणे, या मुख्य हेतूने राज्यातील जे शेतकरी या संकल्पनेचा अवलंब करत आहेत, अशा शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये ५० हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार- (संख्या ८) :**

जे शेतकरी त्यांच्या कृषी ज्ञानाचा फायदा त्यांच्या परिसरातील इतर शेतकऱ्यांना देतील आणि शेती उत्पादन वाढवण्यास शेतकऱ्यांना मार्गदर्शन किंवा प्रोत्साहित करतील, तसेच इतर व्यक्ती / संस्था ज्या स्वतः शेती करत नाहीत किंवा ज्यांची स्वतःची शेती नाही; परंतु पत्रकारितेद्वारे किंवा इतर अन्य मार्गाने या क्षेत्रात बहुमोल कामगिरी करतात अशा शेतकऱ्यांना / व्यक्तींना / संस्थांना, त्याचप्रमाणे कृषी क्षेत्राशी संलग्न घरगुती उद्योग (उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, गांडुळ शेती इत्यादीमधील) वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्ती तसेच खेड्यांमधून परसबाग वृद्धिंगत करणाऱ्या महिला, कृषी विकास मंडळ ज्या गावात सक्रिय आहे, अशा शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये ३० हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**उद्यान पंडित पुरस्कार (संख्या-८) :**

महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, जमिनीची प्रत व हवामानातील विविधता यामुळे फलोत्पादनास मोठा वाव आहे. भाजीपाला पिके, फळ पिके, फूल पिके, मसाला पिके, औषधी व सुंगधी वनस्पती पिके यांपासून शेतकऱ्यांना मोठ्याप्रमाणात लाभ होत आहे. तसेच राज्यात फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या पुरस्कारांने शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये २५ हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार- (संख्या-४०) :**

शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान, शेतीमध्ये सुधारित शेती अवजारांचा वापर, जमिनीच्या प्रतवारी प्रमाणे पिकांची लागवड, जमिनीचे सपाटीकरण, कंदुर पद्धतीने पेरणी, रासायनिक खतांचा सुयोग्य वापर, विहीर / नाला इत्यादीमधील पाणी अडवून शेतीतील नालाबडिंग इत्यादीद्वारे तसेच तुषार व ठिबक सिंचन पद्धतीद्वारे पाण्याचा सुयोग्य वापर, पीक संरक्षक औषधांची वेळेवर फवारणी, शेतीपूरक व्यवसाय, हलक्या व कोरडवाहू जमिनीत फळझाड, इत्यादींची लागवड करणे, स्वत:च्या कल्पनेने नवनवीन पद्धतीने पीक लागवड, शेतकऱ्यांना शेती मशागतीचा उपयोग करण्यास मार्गदर्शन करणे, राज्य शासनाच्या कृषी विभागाकडून आदिवासी गटासह एकूण ४० शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते. रुपये ११ हजार रोख, पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार - (संख्या-१):**

राज्यातील शेतीविषयक उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे व मोलाचे कार्य करणाऱ्या विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील एका अतिउत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यास राज्य शासनाद्वारे सन्मानित करण्यात येते.

**युवा शेतकरी पुरस्कार - (संख्या-८) :**

वय वर्ष १८ ते ४० वयोगटातील शेतकऱ्यांसाठी हा पुरस्कार देण्यात येतो. रु. ३० हजार रोख रक्कम, पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्निक सत्कार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

- या योजनेत केंद्र सरकारच्या प्रति वर्ष, प्रति शेतकरी दिल्या जाणा-या ६ हजार रुपयांच्या लाभात राज्य सरकार कडून आणखी ६ हजार रुपयांची भर पडणार आहे
- यामुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना १२ हजार रुपये प्रतिवर्षी मिळणार आहेत.
पी.एम.किसान योजनेच्या पुढील प्रत्येक हप्त्याचा लाभ मिळणा-या लाभार्थींना राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ अदा दिला जाणार आहे.

- केंद्र शासनाप्रमाणेच रक्कम रू. १८६६.४० कोटीचा लाभ राज्यातील ८५.६० लाख शेतकऱ्यांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजने मधून पहिला हप्ता अदा केला जाईल.

**अनुसुचित जाती/जमातीच्या लाभार्थ्यांसाठी विशेष योजना**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत व क्षेत्राबाहेरील) या योजनेंतर्गत नवीन विहीरीसाठी २ लाख ५० हजार, जुनी विहीर दुरुस्तीसाठी ५० हजार, इनवेल बोअरींगसाठी रुपये २००००, पंप संचासाठी २००००, वीज जोडणी आकारासाठी १०,०००, शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरणसाठी 1 लाख, ठिबक सिंचन संचासाठी ५० हजार किंवा तुषार सिंचनासाठी २५ हजार चा लाभ देय आहे.

**नवीन विहीर पॅकेज**

नवीन विहीर,पंप संच, वीज जोडणी आकार, ठिबक किंवा तुषार असे एकूण ३.०५ ते ३.३० लाख.

**जुनी विहीर दुरुस्ती पॅकेज**

जुनी विहीर दुरुस्ती,पंप संच, वीज जोडणी आकार, ठिबक किंवा तुषार असे एकूण १.०५ ते १.३० लाख.

**शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण पॅकेज**

शेततळ्यांचे प्लॅस्टीक अस्तरीकरण, पंप संच, वीज जोडणी आकार, ठिबक किंवा तुषार असे एकूण १.५५ ते १.८० लाख

लाभार्थ्याकडे जर काही घटक उपलब्ध असतील तर उर्वरित आवश्यक घटकाचा लाभ विहीत मर्यादेत देण्यात येईल.

नवीन विहीर/जुनी विहीर दुरुस्तीचा घटकांचा लाभ घेतल्यानंतरही लाभार्थ्याने इनवेल बोअरींग या घटकाची मागणी केल्यास सदर घटकाचा अतिरिक्त लाभ देण्यात येईल. सदर योजनांसाठी लाभार्थीची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये १,५०,०००/- आहे.

**या योजना कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत राबविण्यात येतात.**

# पशुसंवर्धन विभाग



## मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना

मा. मंत्री, वित्त यांनी २०१७ रोजीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पशुपालकांच्या दारापर्यंत पशुआरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात ३४९ फिरत्या पशुवैद्यकीय चिकित्सालयाची स्थापना करण्याची घोषणा केली होती. त्यास अनुसरून मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेंतर्गत राज्यातील ३४९ ग्रामीण तालुक्यांमध्ये स्थापन करावयाच्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांपैकी प्रथम टप्प्यात ८१ तालुक्यांमध्ये नवीन ८१ फिरते पशुचिकित्सा पथके स्थापन करण्यास मान्यता दिली. उपलब्ध तरतुदीस अधीन राहून ७३ वाहने खरेदी करण्यात आलेली आहेत. वाहन चालक तथा मदतनीस बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच मानधन पध्दतीने कंत्राटी पद्धतीने ५१ सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात आलेल्या आहेत. १५ जानेवारी २०२१ व २९ एप्रिल २०२१ रोजीच्या शासन निर्णयाने स्थाननिश्चिती झालेल्या ठिकाणी सदरची ७३ फिरती पशुचिकित्सा पथके कार्यरत आहेत.

ही योजना कार्यान्वित करण्यासाठी १९६२ या टोल फ्री क्रमांकासह कॉल सेंटर उभारणीसाठी इंडसइंड बँकेची उपकंपनी भारत फायनान्स इन्क्लुजन लिमिटेड या कंपनीबरोबर सामंजस्य करार करून पशुसंवर्धन आयुक्तालय औंध, पुणे-६७ येथे स्थापन करण्यात आलेले कॉल सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहे.

## राज्यातील शेतकऱ्यांकडील गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमासाठी लिंगनिदान केलेल्या वीर्यमात्रांचा वापर करून उच्च वंशावळीच्या कालवडी / पारड्यांची निर्मिती करणे

- महाराष्ट्र राज्यात ४ मार्च, २०१५ पासून संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आलेला आहे. तसेच, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व यांत्रिकीकरण यामध्ये वाढ झाल्याने, शेतीकामाकरिता उपयोगी असलेल्या बैलांची आवश्यकता कमी झालेली आहे.

- या पार्श्वभूमीवर नर वासरांची पैदास न्यूनतम पातळीवर ठेवण्याच्या लिंगनिदान वीर्यमात्रा या नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादित केलेल्या वीर्यमात्रांचा क्षेत्रीय स्तरावर गाई-म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमांतर्गत वापर केल्यास, त्यापासून जवळपास ९०% मादी वासरांची निर्मिती करणे शक्य होणार आहे.

- पशुसंवर्धन विभागाच्या महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाने लिंगनिदान केलेल्या वीर्यमात्रा रु. ५७५ /- प्रति वीर्यमात्रा या दराने जेन्स इंडिया प्रा.लि. यांच्याकडून खरेदी करून ५ वर्षात एकूण ६.८० लक्ष वीर्यमात्रांचा वापर राज्यातील शेतकरी / पशुपालकाच्या दारात गाई-म्हशींना कृत्रिम रेतनासाठी करण्यात येणार आहे. ज्यामधील एकूण २.०० लक्ष वीर्यमात्रा सन २०२१-२२ मध्ये खरेदी करण्यात आल्या.

- एका लिंगनिदान केलेल्या वीर्यमात्रेची किंमत रु.५७५/- असून, त्यापैकी रु.२६१/- केंद्र शासनाचा हिस्सा, रु.१७४/- राज्य शासनाचा हिस्सा असून, उर्वरित रू.१४०/- पैकी रु.१००/- दूध संघामार्फत व जेथे दूध संघ कार्यरत नाही, अशा ठिकाणी हा खर्च महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ करणार आहे. या कार्यक्रमांतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या गाय / म्हशीमध्ये लिंगनिदान केलेल्या वीर्यमात्रा वापरून कृत्रिम रेतन केलेले आहे, अशा शेतकऱ्यास उर्वरित रु.४०/- अधिक कृत्रिम रेतनासाठीचे शासनास देय असलेले सेवाशुल्क रु.४१/- असे फक्त रु. ८१/- अदा करावे लागणार आहेत.

- राज्यातील सहकारी / खासगी दूध संघाच्या सभासदांकडील गाई / म्हशींमध्ये कृत्रिम रेतन कार्यक्रमांतर्गत वापर करण्यासाठी संबंधित दूध संघांना लिंगनिदान वीर्यमात्रा मागणीप्रमाणे रु.१८१/- प्रति वीर्यमात्रा या दराने उपलब्ध करून देण्यात येतील. गाई-म्हशींमधील कृत्रिम रेतनापोटी शेतकरी/पशुपालकांकडून कोणत्याही परिस्थितीत प्रति वीर्यमात्रा रु.८१/- पेक्षा जास्त सेवाशुल्क आकारणी दूध संघांना करता येणार नाही.

## राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण व जिल्हास्तरीय योजना :

**राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत राज्यात दूध उत्पादनास चालना देण्यासाठी ०२ दुधाळ देशी /०२ दुधाळ संकरित गायी/०२ म्हशींचे गट वाटप करणे:**

राज्याच्या दूध उत्पादनामध्ये वाढ करण्याबरोबरच ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अर्थार्जनाचे व स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करुन देण्यासाठी लाभार्थींना ०२ दुधाळ देशी /०२ दुधाळ संकरीत गायी /०२ म्हशींचे गट वाटप करण्यात येते . सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गटाच्या किमतीच्या ५०% आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थींना गटाच्या किमतीच्या ७५% अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती / जमातींच्या लाभार्थींना अनुक्रमे ५०% व २५% एवढा निधी स्वत: /अथवा बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेऊन उपलब्ध करून घ्यावयाचा आहे. दुधाळ जनावरांची खरेदी जनावरांच्या बाजारातून करण्यात येते. गट किंमत: ०२ दुधाळ देशी / ०२ दुधाळ संकरित गायी-रु. १५६८५०/- 02 म्हशींचा गट रु. १७१२५८/- दि.३१ जानेवारी २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत

**दुधाळ जनावरांच्या किमतीत सुधारणा:**

**पूर्वी प्रति देशी /संकरित गाय /म्हैस दर रु.४०,०००/- नवीन दर प्रति देशी / संकरित गाय रु. ७०,०००/- व म्हैस रु. ८०,०००/-) करण्यात आलेली आहे**

राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत अंशत: ठाणबद्ध पद्धतीने शेळी/मेंढी पालनाद्वारे शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न मिळवून देणे: या योजनेंतर्गत १० शेळ्या/मेंढ्या व 1 बोकड /नर मेंढा यांचे गट वाटप करण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गट किमतीच्या ५०% आणि अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थींना प्रकल्प किमतीच्या ७५% अनुदान देण्यात येते. सर्वसाधारण प्रवर्गातील व अनुसूचित जाती/ जमातींच्या लाभार्थींना अनुक्रमे ५% एवढा निधी स्वत: उभारणे व उर्वरित रक्कम अनुक्रमे ४५% व २०% बँकेकडून कर्जरूपाने/ स्वत: उपलब्ध करून घ्यावयाची आहे. या योजनेंतर्गत उस्मानाबादी/संगमनेरी या जातीच्या शेळ्या व बोकड तसेच मडग्याळ किंवा दख्खनी मेंढ्या अथवा अन्य स्थानिक यांचे गटांचे वाटप करण्यात येते. गट किंमत: उस्मानाबादी/संगमनेरी शेळी रु. १०३५४५ /-, स्थानिक शेळी रु.७८२३१/-, मडग्याळ मेंढ्या रु.१२८८५०/-, दख्खनी व स्थानिक मेंढ्या रु.१०३५४५/-

**राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत सर्वसाधारण / अनुसूचित जाती उपयोजना,आदिवासी क्षेत्र उपयोजना/ १००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन व्यवसाय सुरू करणे**

या योजनेंतर्गत पक्षी संगोपनासाठी पक्षीगृह व इतर मुलभूत सुविधा उभारण्याकरिता (जसे स्टोअर रूम,पाण्याची टाकी,निवासाची सोय,विद्युतीकरण इ.) वि.घ.यो.मधून ७५% खर्चाच्या म्हणजे रु. १,६८,७५०/-मर्यादेपर्यंत शासकीय अनुदान देय राहील. (एकूण प्रकल्पाची किंमत रु. २,२५,०००/-) सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५०% मर्यादेपर्यंत शासकीय अनुदान रु. १,१२,५००/ - अनुदेय राहील. सन २०२३-२४ करिता ही योजना सर्वसाधारण प्रवर्गासाठी मनरेगा अंतर्गत राबविणे बाबत शासन निर्देश आहेत.

## मराठवाडा पॅकेज -

**मराठवाडा पॅकेजअंतर्गत जालना जिल्ह्यात २ देशी / संकरित गायी / २ म्हशींचा गट वाटप करणे**

ही योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यास १५ ऑक्टोबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान केलेली आहे. सुधारित शासन निर्णय २७ एप्रिल २०२३ नुसार योजना व मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. ही योजना सर्व प्रवर्गासाठी असून लाभार्थींना ५० % अनुदान देय आहे. सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहिल्या वर्षी पहिल्या ६ महिन्यात २५% व उर्वरित २५ % अनुदान दुसऱ्या ६ महिन्यात थेट बँक खात्यात जमा करावयाचे आहे. अनुदान ५० % दुधाळ गाय गटाची किंमत रु.१,६६,८५0/- (वाहतूक,पशु खरेदी व विमा) दुधाळ म्हैस गटाची किंमत रु.१,८९,२५८/-(वाहतूक,पशु खरेदी व विमा)

**मराठवाडा पॅकेजअंतर्गत जालना जिल्ह्यात २० शेळ्या + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे**

ही योजना सन २०१६-१७ मध्ये राबविण्यास १५ ऑक्टोबर२०१६ च्या शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान केलेली आहे. सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी २८ नोव्हेंबर २०१६ रोजी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या योजना सर्व प्रवर्गासाठी असून लाभार्थींना ५० % अनुदान देय आहे. सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहिल्या वर्षी पहिल्या ६ महिन्यात २५ % व उर्वरित २५ % अनुदान दुसऱ्या ६ महिन्यात थेट बँक खात्यात जमा करावयाचे आहे. अनुदान ५० % (शेळी गटाची किंमत रु.२२९४००)

**मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुसऱ्या टप्प्यात बीड व भंडारा या जिल्ह्यांमध्ये २ देशी / संकरित गाई आणि २ म्हशींचा गट वाटप करणे:**

जालना जिल्ह्याच्या धर्तीवर राज्यातील इतर सहा जिल्ह्यांमध्ये २ दुधाळ जनावरे (गाई व म्हशी) यांचे १००० गट वाटप करण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा हे चार जिल्हे असून दुसऱ्या टप्प्यात बीड व भंडारा या उर्वरित दोन जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येणार आहे. अनुदान 50 टक्के. दुधाळ गाय गटाची किंमत रु.१,६६,८५0/- (वाहतूक,पशु खरेदी व विमा). दुधाळ म्हैस गटाची किंमत रु.१,८९,२५८/-(वाहतूक,पशु खरेदी व विमा)

**मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुसऱ्या टप्प्यात बीड व भंडारा या जिल्ह्यांमध्ये २० शेळ्या + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे:**

मराठवाडा पॅकेजच्या धर्तीवर पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा आणि दुसऱ्या टप्प्यात बीड व भंडारा या जिल्ह्यांमध्ये २० शेळ्या + २ बोकड असा शेळी गट वाटप करणे: सदरच्या योजना सर्व प्रवर्गासाठी असून लाभार्थींना ५० % अनुदान देय आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, यवतमाळ, गोंदिया व सातारा हे चार जिल्हे असून दुसऱ्या टप्प्यात बीड व भंडारा या उर्वरित दोन जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येणार आहे. सदरचे अनुदान गट स्थापनेच्या पहिल्या वर्षी पहिल्या ६ महिन्यात २५ % व उर्वरित २५ % अनुदान दुसऱ्या ६ महिन्यात थेट बँक खात्यात जमा करावयाचे आहे. अनुदान ५० % (शेळी गटाची किंमत रु.२२९४००)

**जिल्हास्तरीय कुक्कुट विकास योजना:**

तलंग गट वाटप योजना: या योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना ८-१० आठवड्याचे २५ तलंग पक्षी व ३ नर कोंबडे वाटप करण्यात येते. गट किंमत १०८४०/-
एक दिवसीय पिल्ले वाटप योजना: या योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांना १०० एक दिवसीय पिल्लांचे वाटप करण्यात येते. गट किंमत २९५००/-

## गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना

राज्यात गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीवर ४ मार्च, २०१५ पासून महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ कायद्यानुसार प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्यामुळे शेतकामासाठी, ओझी वाहण्यासाठी व पैदाशीसाठी उपयुक्त नसलेले गोवंशीय बैल व वळू यांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच, गाय, बैल, वळू यांच्या कत्तलीसाठी परराज्यात करावयाची वाहतूक व तदनुषंगिक खरेदी / विक्री करण्यासदेखील प्रतिबंध करण्यात आलेला आहे. परिणामी, कालांतराने शेती व दूध यासाठी अनुत्पादक असलेल्या गोवंशीय पशुधनाच्या संख्येत वाढ होणार असून, या सर्व पशुधनाचा विचार करता राज्यातील गोवंशाचे रक्षण करणे, त्यांचा सांभाळ करणे तसेच गोवंशावर संशोधन करणे यासाठी राज्यात गोवर्धन गोवंश सेवा केंद्र ही नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता उर्वरीत 34 ग्रामीण जिल्ह्यात राबविण्यासाठी शासनाने मान्यता प्रदान केली आहे. गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेंतर्गत अनुदान देण्यात आलेल्या /येणाऱ्या सर्व गोशाळांना संबंधित जिल्ह्यासाठी पशु आश्रय स्थळे / रुग्णनिवास इन्फमरींज व ॲनिमल शेल्टर म्हणून ४ मार्च २०२० च्या शासन निर्णयान्वये घोषित केले आहे. १७ मे २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे जुनी योजना रद्द करून सन २०२३-२४ पासून नवीन सुधारित योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सुधारित योजनेंतर्गत ३४ जिल्ह्यांतील ३२४ तालुक्यांसाठी प्रति तालुका एक गोशाळा याप्रमाणे अर्ज मागवण्याची प्रक्रिया चालू आहे.

## राजे यशवंतराव होळकर महामेष योजना

राज्यातील मेंढी पालनाच्या व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजनेंतर्गत "राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" २०१७-१८ या वर्षापासून राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ३४ ग्रामीण जिल्ह्यात राबविण्यात येत आहे.

**ही योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असून, या योजनेमध्ये खालील ६ मुख्य घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.**

- स्थायी आणि स्थलांतरित मेंढीपालन करणाऱ्या मेंढीपालकांना पायाभूत सोयी सुविधेसह २० मेंढ्या + १ नर मेंढा अशा मेंढीगटाचे ७५% अनुदान वाटप करणे.
- सुधारित प्रजातींच्या नर मेंढ्यांचे ७५% अनुदानावर वाटप करणे.
- मेंढीपालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान.
- मेंढीपालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान.

## वैरण विकास योजना :

**जिल्हा वार्षिक योजना :** या योजनेंतर्गत १०० % अनुदानावर वैरण पिकांच्या सुधारित प्रजातींच्या बियाणांचे व बहुवार्षिक वैरण पिकांच्या ठोबंचे वितरण करण्यात येते.

- शासन निर्णय क्र. एफडीआर-२०२३ /प्र.क्र. ३९ /पदुम-४, मुंबई-३२, २१ जून २०२३ अन्वये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत खालील वैरण विकास योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.
- ५०० किलो क्षमतेच्या १० बॅग सायलेज बॅग खरेदीस ५० % अनुदान, अनुदान रक्कम रु.३,००० /-
- मुरघास वापरासाठी ३३ % अनुदान - दोन दुधाळ पशुधनासाठी (५ किलो प्रति पशुधन प्रतिदिन) अनुदान रक्कम रु.७,३००/-
- टोटल मिक्स रॅशन (टीएमआर) करिता ३३ % अनुदान - दोन दुधाळ पशुधनासाठी (१०किलो प्रति पशुधन प्रतिदिन) अनुदान रक्कम रु. ३८,५४४ /-
- खनिज मिश्रण वापरासाठी ३३ % अनुदान-दोन दुधाळ पशुधनासाठी (५० ग्रॅम प्रति पशुधन प्रतिदिन) अनुदान रक्कम रु. १,२००/-

**केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियान**

केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागामार्फत सन २०२१-२२ पासून राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकास या कार्यक्रमाची सुधारित पुनर्रचना करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या सुधारित योजनेचा उद्देश रोजगारनिर्मिती, उद्योजकता विकास, प्रति पशुची उत्पादकता वाढवणे आणि अशा प्रकारे विकास कार्यक्रमांतर्गत एका छत्राखाली मांस, बकरीचे दूध, लोकर, अंडी उत्पादन वाढवणे, वैरणीची उपलब्धता वाढविणे, प्रति पशुधन उत्पादनक्षमतेत वाढ करणे, पशुधनाच्या वंशावळीत सुधारणा करणे, नावीन्यपूर्ण उपक्रमांस प्रोत्साहन देणे असा आहे. राष्ट्रीय पशुधन अभियान योजनेची संकल्पना म्हणजे असंघटित क्षेत्रामध्ये होणाऱ्या उत्पादनांसाठी विक्रीकरिता आणि त्यांना चांगल्या दर्जाचा कच्चा माल उपलब्ध होण्याकरिता संघटित क्षेत्राशी जोडून उद्योजकता विकास साधणे ही आहे. राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत खालीलप्रमाणे योजनांचा समावेश आहे. या योजनेकरिता www.nlm.udyamimitra.in या संकेतस्थळावर अर्ज करावयाचा आहे.

**ग्रामीण कुक्कुटपालनातून प्रजाती विकासाद्वारे उद्योजगता विकास:**

एक वेळ ५० % भांडवली अनुदान अधिकतम मर्यादा रु. २५ लक्ष प्रती युनिट (दोन समान हप्त्यांमध्ये) कमीत कमी १,००० अंड्यावरील (लो इनपुट तंत्रज्ञान) कुक्कुट पक्ष्यांचे संगोपन व अंडी उबवणी केंद्राची स्थापना (उर्वरित ५० % बँकेचे कर्ज अथवा लाभार्थी स्वहिस्सा)

**ग्रामीण शेळी-मेंढी पालनातून प्रजाती विकासाद्वारे उद्योजकता विकास:**

५० % भांडवली अनुदान रु.५० लक्ष (दोन समान हप्त्यांमध्ये) गटाची संख्या कमी केल्यास ४० लाख, ३० लाख,२०लाख आणि १० लाख यानुसार अनुदान उपलब्ध आहे. ५०० शेळ्या / मेंढ्या आणी 25 बोकड / नर मेंढे गटाची स्थापना करणे (उर्वरित 50 टक्के बँकेचे कर्ज अथवा लाभार्थी स्वहिस्सा) (४००+२०, ३००+१५, २००+१०, १००+५) अशी गट संख्या देखील करता येते.

**वराहपालनाद्वारे उद्योजकता विकास:**

एक वेळ ५० % भांडवली अनुदान रु. ३० लक्ष. गटाची संख्या ५०+ ५ केल्यास १५ लाख अनुदान उपलब्ध आहे. १०० मादी अधिक १० नर किंवा ५० मादी अधिक ५ नर वराह गटाची स्थापना करणे (उर्वरित ५० % बँकेचे कर्ज अथवा लाभार्थी स्वहिस्सा )

**पशुखाद्य व वैरण उद्योजकता विकास:**

प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के रु. ५०.०० लक्ष पर्यंत मुरघास बेलर, वैरणीच्या विटा आणि टी.एम.आर निर्मितीकरिता दोन टप्प्यांमध्ये अनुदान.

# मत्स्यव्यवसाय विभाग



## प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी.

राज्य शासनाने केंद्रीय क्षेत्रीय योजना व लाभार्थीभिमुख योजना व लाभार्थी हिस्सा नसलेल्या योजना राज्यामध्ये राबविण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या सर्व ९५ योजना राज्यामध्ये राबविण्यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत लाभार्थीभिमुख उपक्रमांमध्ये हॅचरीचा विकास, ग्रो-आउट आणि तलावाचे संगोपन, इनपुट कॉस्ट, री- सर्कुलेटरी एक्वाकल्चर सिस्टम जलाशयांमध्ये पिंजरा उभारणे, खुल्या समुद्रामध्ये पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन, सिवीड कलचर, बायव्हल्स कल्चर, ट्राउट शेतीसाठी रेसवे बांधणे, शोभीवंत व करमणुकीचे मत्स्य पालन, खोल समुद्रातील मासेमारी जहाजांना अर्थसाहाय्य, सध्याच्या मासेमारी जहाजाचे अपग्रेडेशन, पारंपरिक व मोटार चालवणारे मासेमारी जहाजांच्या सुरक्षेसाठी किट पुरविणे, बोटी व जाळे पुरविणे, पारंपरिक मच्छीमारांसाठी, संभाषण किंवा ट्रॅकिंग डिव्हाइस आणि पीएफझेड डिव्हाइस खरेदीसाठी समर्थन. प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत शीतगृह बांधकाम, बर्फ कारखाना, खाद्य कारखाना/ किरकोळ मत्स्य विक्री केंद्र बांधकाम, कियोस्क, मत्स्यमूल्यवर्धित उद्योग, ई. ट्रेडिंग आणि ई- मार्केटिंगसाठी ई-प्लॅटफॉर्म पुरवणे, रोगनिदान चाचणीकरिता दर्जेदार प्रयोगशाळा उभारणी, मच्छीमारांना आणि मासेमारी करणाऱ्या जहाजांना विमा, सामाजिक आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या सक्रिय पारंपरिक मच्छीमारांसाठी जीवन निर्वाह पौष्टिक आधार इ. गोष्टींकरिता सहकार्य करण्यात येणार आहे.

**मार्गदर्शक सूचना व शासन निर्णय मराठी व इंग्रजीमध्ये खालील वेबसाईटवर उपलब्ध केले आहेत.**

(i) www.dof.gov.in

(ii) www.nfdb.gov.in

(iii) www.fisheries.maharashtra.gov.in

**लाभार्थी :**

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा लाभ खालील व्यक्ती घेऊ शकतात

**प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा लाभ खालील व्यक्ती घेऊ शकतात**

१. मच्छीमार / मत्स्यशेतकरी / बेरोजगार युवक / उद्योजक.

२. मत्स्य उत्पादक.

३. मत्स्य कामगार आणि मत्स्य विक्रेते.

४. मत्स्यव्यवसाय विकास महामंडळ.

५. मत्स्यव्यवसाय क्षेत्रात महिला स्वयंसाहाय्यता गट/मच्छीमार स्वयंसाहाय्यता गट ( SHGS ) / संयुक्त दाईत्व गट .

६. मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था / अनुसूचित जाती/जमाती सहकारी संस्था.

७. मत्स्यव्यवसाय फेडरेशन.

८. उद्योजक आणि खासगी कंपन्या.

९. मत्स्य उत्पादक संघटना / कंपन्या (एफएफपीओ/सीएस).

१०. अनुसूचित जाती / जमाती/महिला/वेगळ्या सक्षम व्यक्ती.

११. राज्य सरकार / केंद्रशासित प्रदेश आणि त्यांची संस्था इत्यादी

१२. राज्य मत्स्यव्यवसाय विकास मंडळ (एसएफडीबी).

१३. केंद्र सरकार आणि त्यातील घटक.

**(१) मत्स्यबीज उत्पादन केंद्र-**

आदिवासी क्षेत्रातील तलावामध्ये जलद वाढणाऱ्या प्रमुख कार्य आणि सायप्रिनस या जातीच्या मत्स्यबीजांचे उत्पादन करण्याकरिता आणि मत्स्यबीज संवर्धनाकरिता मत्स्यबीज उत्पादन केंद्रे व मत्स्यबीज संवर्धन केंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत. तसेच आदिवासी क्षेत्रामध्ये ४ ठिकाणी पोर्टेबल हॅचरीज राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत उभारण्यात आल्या आहेत. इटियाडोह, अमनाला आणि चारगांव मत्स्यबीज केंद्रावर वर्तुळाकार हॅचरी बांधण्यात आल्या असून मत्स्यबीज मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्यात येत आहे.

**(२) अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन-**

जनजाती क्षेत्रामध्ये ३७,००० हेक्टर जलविस्तार क्षेत्र उपलब्ध असून या क्षेत्राकरिता मत्स्यबीजांची पुरेशा प्रमाणात साठवणूक करण्याकरिता सुमारे १० कोटी बीजांची आवश्यकता आहे.

**(४) मासेमारी साधनांवर अर्थसाहाय्य-**

मत्स्यव्यवसायासाठी लागणारी जाळी तयार करण्याकरिता बरेच मच्छीमार नायलॉन सूत, मोनोफिलामेंट, शेनसूत वापरतात. तसेच काही मच्छीमार तयार जाळीही खरेदी करतात. तथापि, या साधनांच्या किमतीत बरीच वाढ होत असल्यामुळे मासेमारीसाठी तो आवश्यक असूनही त्याचा वापर करणे मच्छीमारांना अशक्य होते. यास्तव मच्छीमारांना साधनांच्या खरेदीवर अनुदान रूपाने अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.

## मच्छीमार व त्यांच्या सहकारी संस्थांच्या विकासासाठी योजना

**(१) मासेमारी संकट निवारण निधी (इतर कार्यक्रम) :**

मच्छीमार समुद्र, खाडी, तलाव, नदी, डोह इत्यादी ठिकाणी मासेमारी करीत असतांना मृत बेपत्ता झाल्यास त्यांच्या वारसाना रु. ५०,००० चे अर्थसहाय्य देण्यात येते. सदर अर्थसाहाय्यता रु. ५०,०००/- वरून रु. १,००,०००/- अशी वाढ करण्यात आली आहे.

## प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (अपघात गट विमा योजना) :-

या योजनेंतर्गत मासेमारी करतांना नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव होणाऱ्या अपघातामुळे मृत्यू/पूर्णत: कायमचे अपंगत्व आल्यास रु. २,००,०००/- चे विमा संरक्षण व अंशत: अपंगत्व आल्यास रु. १००,०००/- चे विमा संरक्षण देण्यात येते. या व्यतिरीक्त मच्छीमारांना रु. १०,०००/- पर्यंत वैद्यकीय उपचारार्थ खर्च भागविण्यासाठी स्पेशल कॉंटीजन्सी पॉलीसी ही योजना कार्यान्वीत करण्यात येते. या योजनेअंतर्गत रु. १०,०००/- पर्यंत वैद्यकीय खर्च अनुज्ञेय असेल. याकरिता मच्छीमार सभासदास विमा हप्त्यापोटी रक्कम भरण्याची आवश्यकता नाही.

## क्रियाशील मच्छीमारांकरिता राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना :-

मत्स्यव्यवसाय विभागातील सहकारी संस्थेच्या दारिद्र्यरेषेखालील क्रियाशील मच्छिमार सभासदांसाठी मासेमारी बंदीच्या कालावधीत उदरनिर्वाह होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार मच्छीमारांसाठी राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना देण्याबाबतची राज्य शासनाच्या समभागासह नवीन योजना सुरू करण्यात आली आहे.

लाभार्थी मच्छीमार हा पूर्ण वेळ मासेमारी व्यवसाय करणारा क्रियाशील मच्छीमार असावा. सदर योजनेंतर्गत मच्छीमार सहकारी संस्थेच्या मच्छीमाराने नऊ महिन्याच्या मासेमारी कालावधीत किमान तीन हप्त्यात एकूण रु. १५००/- प्रति वर्ष लाभार्थी समभाग जमा करणे आवश्यक आहे. या योजनेत राज्याचे ५०% व केंद्र शासनाचे ५०% म्हणजे प्रत्येकी रु. १५००/- प्रति लाभार्थी प्रति वर्ष अर्थसाहाय्य देय राहील. लाभार्थ्यास DBT द्वारे रक्कम अनुज्ञेय राहील

## (५) मच्छीमार सहकारी संस्थांचा विकास :

मच्छीमारी सहकारी संस्थांच्या विकासासाठी मच्छीमारी सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय अनुदान व भागभांडवलाचे अर्थसाहाय्य देण्यात येते.

**(५) राज्यात निमखारे पाणी मत्स्यशेतीचा विकास-**

राज्यातील निमखारे पाणी मत्स्यशेतीचा विकास करण्याच्या दृष्टीने ठाणे जिल्ह्यात आसनगाव येथे केंद्रीय अर्थसाहाय्याने व संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या तांत्रिक साहाय्याने निमखारे पाणी कोळंबी पथदर्शक उभारण्यात आला आहे. या प्रकल्पात एकूण ३४ तळी बांधण्यात आलेली आहेत.

**केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कल्याण निधीअंतर्गत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना ( अपघात गट विमा योजना) :-**

या योजनेंतर्गत मासेमारी करतांना नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव होणाऱ्या अपघातामुळे मृत्यू/पूर्णत: कायमचे अपंगत्व आल्यास रु.२,००,०००/- चे विमा संरक्षण.

अंशत: अपंगत्व आल्यास रु. १,००,०००/- चे विमा संरक्षण.

मच्छीमारांना रु. १०,०००/- पर्यंत वैद्यकीय उपचारार्थ खर्च भागविण्यासाठी कार्यक्रम स्पेशल कॉंटीजन्सी पॉलिसी ही योजना कार्यान्वित करण्यात येते. या योजनेंतर्गत रु. १०,०००/- पर्यंत वैद्यकीय खर्च अनुज्ञेय असेल. याकरिता मच्छीमार सभासदास विमा हप्त्यापोटी रक्कम भरण्याची आवश्यकता नाही.

**क्रियाशील मच्छीमारांकरिता राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना**

लाभार्थी मच्छीमार हा पूर्ण वेळ मासेमारी व्यवसाय करणारा क्रियाशील मच्छीमार असावा. सदर योजनेंतर्गत मच्छीमार सहकारी संस्थेच्या मच्छीमाराने नऊ महिन्याच्या मासेमारी कालावधीत किमान तीन हप्त्यात एकूण रु. १५००/- प्रति वर्ष लाभार्थी समभाग जमा करणे आवश्यक आहे. या योजनेत राज्याचे ५०% व केंद्र शासनाचे ५०% म्हणजे प्रत्येकी रु. १५००/- प्रति लाभार्थी प्रति वर्ष अर्थसाहाय्य देय राहील. लाभार्थ्यास डीबीटी द्वारे रक्कम अनुज्ञेय राहील.

# सामाजिक
# न्याय व विशेष
# साहाय्य विभाग

## आर्थिक विकासाच्या योजना

- मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना.
- अत्याचारात बळी पडलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक साहाय्याची योजना.
- आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक साहाय्य.
- गटई कामगारांना स्टॉल देणे.
- कन्यादान योजनेखाली नव दांम्पत्यांना अर्थसाहाय्य.
- अनु. जाती व नवबौद्ध युवकांना सैनिक पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देणे.
- अ. जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसाहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने याचा पुरवठा करणे.
- कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना अनु. जाती व नवबौद्ध भूमिहीन शेतमजुरांना जमिनीचे वाटप करणे व जमीन खरेदीसाठी प्रत्येकी १००% अनुदान देणे.

## सामाजिक व इतर सामूहिक योजना

- अस्पृश्यता निवारण कार्यक्रम.
- राज्यातील समाजसेवकांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण" म्हणून सन्मान.
- सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील उत्कृष्ट संस्थांना पारितोषिक देणे.
- जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करणे.
- मागासवर्गीय घर बांधणी योजना.
- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे.
- सामाजिक न्यायनिर्देशांक निर्मिती आणि उपाययोजना.
- अनुसूचित जाती नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना.
- प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन बांधणे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

## विशेष साहाय्य योजना

## (अ) राज्य पुरस्कृत योजना

**संजय गांधी निराधार अनुदान योजना :**

- या योजनेंतर्गत किमान १८ ते ६५ वर्षांखालील निराधार पुरुष व महिला अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग, सिकलसेलग्रस्त यांसारख्या आजारामुळे स्वतः चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा (आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांसह), घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या; परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्याव्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षांवरील अविवाहित स्त्री, तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी या सर्वांना तसेच १८ वर्षांखालील अनाथ, दिव्यांग, सिकलसेलग्रस्त व अन्य दुर्धर आजाराने मुले/मुली असतील तर त्यांना पालकामार्फत देण्यात येतो. या योजनेमध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१,०००/- पर्यंत वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. या योजनेखाली पात्र लाभार्थ्यांना रुपये १५००/- दरमहा इतके अर्थसाहाय्य दिले जाते.

**श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजना :**

- श्रवणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेमधून दारिद्र्यरेषेखालील यादीच्या कुटुंबात नाव असलेल्या अथवा रु.२१,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या ६५ व ६५ वर्षांवरील पात्र लाभार्थ्यास दरमहा रु. १५००/- अर्थसाहाय्य देण्यात येते.
- दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ६५ व ६५ वर्षांवरील (६५ से ७९ वर्ष) व्यक्तींना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतून रु. १३०० व याच लाभार्थ्याला केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधून रु.२००/- असे एकूण रु. १५०० दरमहा अर्थसाहाय्य देण्यात येते. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असलेल्या ८० वर्षे व त्यावरील व्यक्तींना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतून रु. १०००/ आणि याच लाभार्थ्याला केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजनेमधून रु. ५००/- असे एकूण रु. १५००/- दरमहा अर्थसाहाय्य देण्यात येते.
- संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. ५०,०००/- इतकी आहे.

## ब) केंद्र पुरस्कृत योजना

**इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना :**

दारिद्र्यरेषेखालील ६५ वर्ष व त्यावरील वृद्ध व्यक्ती पात्र होतील, या लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजनेतील ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रु. २००/- व याच लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतून रु. १३००/- तर ८० वर्ष व त्यावरील व्यक्तींना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधून रु. ५००/- व याच लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतून रु. १०००/- असे एकूण रु. १५००/- दरमहा अर्थसाहाय्य देण्यात येते.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ

**१) महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना**

**विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य योजनाः**

**अ) अनुदान योजना :**

- विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून अनुदान योजना राबविण्यात येते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये १,००,०००/- लाखांपर्यंत आहे, अशा कुटुंबातील अर्जदारांना रु. ५०,०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायासाठी बँकेच्या साहाय्याने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. एकूण प्रकल्प रकमेमध्ये ५०% किंवा रु. १०,०००/- यापैकी जी कमी असेल ती रक्कम महामंडळामार्फत लाभार्थीस अनुदान म्हणून दिली जाते. उर्वरित रक्कम बँकेकडून वितरित करण्यात येते.

**ब) प्रशिक्षण योजना :**

विशेष केंद्रीय अर्थसाहाय्य योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण निधीच्या १० % रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येतो. मातंग समाजातील इयत्ता ४ थी पासून पुढे शिक्षण घेतलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवक/युवतींना वाहन चालक, वेल्डिंग , मोटर मॅकनिकल, शिवणकाम, ब्युटीपार्लर, फिटर, रेडीओ/टीव्ही दुरुस्ती, सुतार काम इ. व्यवसायिक प्रशिक्षण शासनमान्य संस्थांमार्फत दिले जाते. ज्यामुळे युवक/युवतींना स्वयंरोजगार मिळण्यास सोईस्कर होते.

**२) बीजभांडवल योजना (महामंडळाचे भागभांडवल अंशदान निधीतून राबविण्यात येते)**

**अ) बीजभांडवल योजना:**

महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलातून भांडवली अंशदानाच्या स्वरूपात शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा वापर बीज भांडवल योजना राबविण्यासाठी करण्यात येतो. शहरी व ग्रामीण भागासाठी उत्पन्न मर्यादा रक्कम रुपये ३,००,०००/- असणाऱ्या कुटुंबांना
रुपये ५०,००१/-ते ७,००,०००/- पर्यंतच्या गुंतवणूक असलेल्या वैयक्तिक प्रकल्पास मंजुरी देण्यात येते. मंजूर कर्ज प्रकरणात गुंतवणुकीच्या प्रमाणात महामंडळाकडून ४५ % सहभाग (रू.१०,०००/-अनुदानासह) बीजभांडवल कर्जरुपात ४ % व्याजदराने मंजूर करण्यात येते आणि ५० % भाग हा बँकेचा व उर्वरित ५% सहभाग लाभार्थ्यांचा असतो.

**ब) थेट कर्ज योजना**

शासन निर्णय क्र.एलएएस २०२२ प्र.क्र१४ /महामंडळे दि. ४ नोव्हेंबर २०२२ अन्वये रु. २५,०००/- वरून रु.१,००,०००/- पर्यंतच्या प्रकल्प मर्यादा असलेल्या कर्ज प्रकरणांना बीज भांडवल योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजनांमध्ये ४ % व्याजदराने लाभार्थ्यांना कर्ज निधी वितरित केला जातो.

**क) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती योजना :**

प्रतिवर्षी इयत्ता 10 वी, 12 वी, पदवी, पदविका व पदव्युत्तर परीक्षेत कमीत कमी 60 टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना जिल्हानिहाय प्राप्त गुणांच्या टक्केवारीनुसार निवड केली जाते व उपलब्ध निधीच्या मर्यादेत आणि शिष्यवृत्ती एकदा व पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहनपर दिली जाते.

### ३) राष्ट्रीय महामंडळाच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना

#### अ) मुदत कर्ज योजना

एनएसएफडीसी योजनेंतर्गत राबवण्यात येत असलेल्या मुदत कर्ज योजनेंतर्गत एकूण प्रकल्प रकमेपैकी एनएसएफडीसीचा सहभाग ७५ % असून २० % रक्कम ही महामंडळाचे बीजभांडवल योजनेच्या निधीतून अदा करण्यात येते. त्यामध्ये रु.१०,०००/- अनुदान रकमेचा समावेश असतो. उर्वरित ५ % लाभार्थीच्या सहभागाची रक्कम असते. सर्व योजनेकरिता शहरी व ग्रामीण भागाकरिता उत्पन्न मर्यादा रुपये तीन लाख आहे.

#### ब) लघुऋण वित्त योजना

एनएसएफडीसी योजनेंतर्गत लघुऋण वित्त योजना सन २०००-०१ पासून राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत प्रति लाभार्थी एनएसएफडीसीचे मुदत कर्ज रु. ४०,००० - व महामंडळाचे अनुदान रु. १०,०००/- असे एकूण रुपये ५०,०००/- च्या मर्यादेत लघु उद्योगांमध्ये लाभ देण्यात येतो.

#### क) महिला समृद्धी योजना

ही योजना सन २००४ पासून महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजना ही एनएसएफडीसी कडून प्राप्त होणाऱ्या निधीतून राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत प्रति लाभार्थी एनएसएफडीसीचे मुदत कर्ज रुपये ४०,०००/- व महामंडळाचे अनुदान रु.१०,०००/-असे एकूण ५०,०००/-च्या मर्यादेत लाभ देण्यात येतो.

#### ड) शैक्षणिक कर्ज योजना

एनएसएफडीसी योजनेंतर्गत देशात व परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरीता एनएसएफडीसी अंतर्गत शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. देशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या शिक्षणार्थींना रु.१०,००,०००/- व परदेशातंर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या शिक्षणार्थींना रु. २०,००,०००/- कर्ज मंजूर केले जाते. सदर कर्जाची परतफेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यांपासून अथवा नोकरी लागल्यापासून करावयाचे असते.

## लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ

- महामंडळाचे कामकाज पूर्ण क्षमतेने सुरु झाल्यानंतर महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांसाठी विद्युत संचलित कोयता, लहान ट्रॅक्टर, ट्रॉली पुरविण्याबाबत तसेच ज्या वैयक्तिक लाभधारकांना बँकेकडून कर्ज घेऊन यंत्र व अवजारांची खरेदी केली आहे अशा वैयक्तिक लाभार्थींच्या अनुदानाची रक्कम त्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्याबाबतची योजना राबविण्याबाबतचा मानस आहे.

- ऊसतोड कामगारांची नोंदणी करून ग्रामसेवकांमार्फत ओळखपत्र देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. ऊसतोड कामगारांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु  आहे. याबाबत दि.२१९.२०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

- कामगारांच्या नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लिकेशन माहिती व तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) मार्फत करण्यासाठी शासनस्तरावरून मान्यता देण्यात आली आहे.
  सदर वेब/मोबाईल अप्लिकेशनचे काम जवळपास पूर्णत्वास आले असून अंतिम टप्प्यात आहे.

- ऊसतोड कामगाराच्या मुला मुलीसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना दिनांक १५.६.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. शासनाने राज्यात बीड, जालना, अहमदपूर या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १०० क्षमतेची एकूण २० शासकीय वसतिगृहे मंजूर केली आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यातील राज्यात ११  ठिकाणी वसतिगृहे  सुरु करण्यात येत असून उर्वरित ठिकाणी वसतिगृह सुरु करण्याचे काम प्रगतीत आहे.

# शैक्षणिक योजनांमध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आला.

- भारत सरकारच्या शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या
- शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्यापासून सूट देणे व शिष्यवृत्ती देणे.
- मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह उघडणे व चालविणे.
- विभागीय स्तरावर १,००० मुलांच्या क्षमतेचे शासकीय वसतिगृहे सुरू करणे.
- मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविण्याकरिता स्वेच्छा संस्थांना साहाय्यक अनुदान देणे.
- सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विशेष निर्वाह भत्ता देणे.
- बालवाड्यांना साहाय्यक अनुदान देणे.
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देणे.
- विभागीय स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करणे.
- अस्वच्छ उद्योगधंद्यात असलेल्यांच्या मुलांना शालान्त परीक्षापूर्व शिष्यवृत्त्या.
- व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे.
- वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकरिता पुस्तक पेढ्या इत्यादी.
- माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना
- सफाई कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा.
- शिकवणी व संलग्न योजना.
- इ. १० वी, १२ वी परीक्षेला विशेष उल्लेखनीय यश संपादन करणारे अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे.
- राज्यातील १०० अनु. जाती विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.
- अनु. जातीच्या ७५ मुला - मुलींना परदेशातील शिक्षणासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती.
- इ. १० वीच्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवून इ. ११ वीत प्रवेश घेणाऱ्या मुला-मुलींना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे.
- मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला प्रशिक्षण)
- इयत्ता ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.
- अनु. जाती, बौद्ध उमेदवारांना व्यावसायिक (हॉर्टिकल्चर) प्रशिक्षण देणे.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना.



# भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना.

## प्रमुख अटी

विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अनुसूचित जातीकरिता २.५ लाख रुपये तर विजाभज, इमाव व विमाप्रवर्गाकरिता १ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असावे. इतर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेले विद्यार्थी या योजनेच्या लाभास पात्र नाही.

## अर्ज करण्याची पद्धत

या योजनेसाठी सन २०१८-१९ पासून ऑनलाइन अर्ज **https://mahadbtmahait.gov.in** **या** संकेतस्थळावर भरून महाविद्यालय सादर करावे.

## लाभाचे स्वरूप

- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी दरमहा रु. २३० ते रु. ५५० व विजाभज, इमाव व विमाप्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता दरमहा ९० ते ११० रुपये निर्वाह भत्ता.
- वसतिगृहातून शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी ३८० ते १२०० रुपये आणि विजाभज, इमाव व विमाप्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता दरमहा १५० ते ४२५ रुपये दराने निर्वाह भत्ता.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**



# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन कुटुंबांना दोन एकर ओलिताखालील किंवा चार एकर कोरडवाहू शेतजमीन उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक उन्नती व सामाजिक स्तर उंचवविणे हा या योजनेचा उद्देश आहे. सदर योजना १५ ऑगस्ट २०१८ पासून १०० टक्के अनुदानित करण्यात आली आहे.

## प्रमुख अटी

- लाभार्थी हा अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन असावा.
- लाभार्थ्यांचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ६० वर्षे असावे. भूमिहीन शेतमजूर परित्यक्ता स्त्रिया / विधवा स्त्रिया तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत अनुसूचित जातीचे अत्याचारग्रस्त यांना प्राधान्य देण्यात येते.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

इयत्ता १० वी नंतर आणि ११ वी, १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील सर्वच विद्यार्थ्यांना वसतिगृहातील मर्यादित संख्येमुळे शासकीय वसतिगृहात प्रवेश देणे शक्य होत नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट वितरित करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली आहे.

## लाभाचे स्वरूप

जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन भत्ता २५,००० रु निवास भत्ता १२,०००रु., निर्वाह भत्ता ६००० रु. या व्यतिरिक्त वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रति वर्ष ५००० रु. व अन्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्रति वर्ष २००० रु. इतकी रक्कम शैक्षणिक साहित्यासाठी रोख स्वरूपात देण्यात येईल.


**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**

# कन्यादान योजना

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील वेगवेगळ्या जाती, जमातीतील लोकांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेणाऱ्या मागासवर्गीय दाम्पत्यांसाठी कन्यादान योजना.

## प्रमुख अटी

वधू व वर हे महाराष्ट्राचे रहिवासी असावे.



- वधू व वर यांचे अधिवास प्रमाणपत्र प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले असावे.
- वराचे वय २१ वर्ष व वधू वय १८ वर्षापेक्षा कमी असू नये.
- जातीचे प्रमाणपत्र समकक्ष व प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेले असावे.
- नवदाम्पत्यातील वधू / वर यापैकी दोन्ही किंवा एक जण अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील असावा.

## लाभाचे स्वरूप

- या योजनेंतर्गत सामूहिक विवाहसोहळ्यामध्ये विवाह करणाऱ्या जोडप्यांना २० हजार रुपये इतके अर्थसाहाय्य.

- सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या स्वयंसेवी संस्था/संघटनांना प्रत्येक जोडप्यामागे ४ हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**

# अनुसूचित जाती / जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा

जातीयतेच्या कारणावरून अत्याचाराला बळी पडलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या कुटुंबातील सदस्यांना अर्थसाहाय्य देऊन अनुसूचित जाती / जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये त्यांचे पुनर्वसन करण्यात येते.

## प्रमुख अटी

- जातीयतेच्या कारणावरून अनुसूचित जाती, जमातीच्या कुटुंबावर, व्यक्तीवर अत्याचार झाल्यास सदर गुन्ह्याची नोंद
- नागरी हक्क संरक्षण अधिनियम अंतर्गत झाली असल्यास.
- गुन्ह्यात वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक.
- सर्व गुन्ह्यांमध्ये जातीचा दाखला आवश्यक.

## लाभाचे स्वरूप

- २५ हजार रुपये ते ८ लक्ष २५ हजार रुपयांपर्यंत (गुन्ह्याच्या प्रकारानुसार) अर्थसाहाय्य.
- घराचे नुकसान झाल्यास घर बांधून देणे.
- स्थावर मिळकतीचे नुकसान झाल्यास मदत.
- पाण्याची विहीर, इलेक्ट्रिक मोटार / फिटिंग यांचे नुकसान झाल्यास मदत.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**

# मुला मुलींसाठी शासकीय वसतिगृहे

मागासवर्गीय मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, त्यांना उच्च शिक्षण घेता यावे, त्याप्रमाणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, यासाठी शासकीय वसतिगृहे योजना.



## प्रमुख अटी

- गुणवत्तेनुसार प्रवेश.
- इयत्ता ८ वी ते पुढील शिक्षण घेणाऱ्यांना प्रवेश.
- पालकाचे उत्पन्न अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता रु. २.५ लक्ष तथा विजाभज, इमाव व विमा प्रवर्गाकरिता १.५ लाख रु. पेक्षा जास्त नसावे.
- शालेय विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निकाल लागल्यानंतर १५ दिवसापर्यंत प्रवेश मुदत.



## लाभाचे स्वरूप

- मोफत निवास व भोजन, ग्रंथालयीन सुविधा.
- शालेय विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी दोन गणवेश.
- अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके, वह्या व स्टेशनरी.

वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्टेथेस्कोप, ऍप्रॉन, ड्राइंग बोर्ड, ब्रश, कॅनव्हास इत्यादी. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दैनंदिन खर्चासाठी निर्वाह भत्ता. विभागीय पातळीवर दरमहा ८०० रु., जिल्हा पातळीवर ६०० रु. व तालुका पातळीवर ५०० रु. तथा मुलींकरिता १०० रु. अतिरिक्त स्वच्छता प्रसाधन भत्ता.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण**



# रमाई आवास योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या जागेत २६९ चौरस फुटाचे पक्के घर बांधून देण्यासाठी रमाई आवास योजना.

## प्रमुख अटी

- अर्जदार कुटुंब हे अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील असावे.
- लाभार्थ्यांचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षांपासून वास्तव्य असणे आवश्यक.
- अर्जदार कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण क्षेत्रासाठी १ लक्ष रुपये, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रासाठी ३ लक्ष रुपये.

- ग्रामीण क्षेत्रासाठी घरकुल बांधकाम (शौचालय बांधकामासह) सखल भागात १ लक्ष ३२ हजार व डोंगराळ भागात १ लक्ष ४२ हजार रुपये ऐवढे अनुदान
- नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्राकरिता घरकुल बांधकाम अनुदान २ लक्ष ५० हजार रुपये.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अथवा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत**

# अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचा पुरवठा करणे

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसाहाय्यता बचतगटांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध व्हावे व त्यांच्या राहणीमानात बदल होऊन सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी मिनी ट्रॅक्टर व उपसाधनांचा पुरवठा करण्यात येते.

## प्रमुख अटी

- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसाहाय्यता बचतगटाचे सदस्य हे महाराष्ट्राचे रहिवासी असावे.
- बचतगटाचे अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील असावेत.
- स्वयंसहाय्यता बचतगटाचे किमान ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत.
- मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या अनुदान कमाल मर्यादा ३ लक्ष १५ हजार रुपये इतकी आहे.

## लाभाचे स्वरूप

- स्वयंसाहाय्यता बचत गटाने वरील कमाल मर्यादा रकमेच्या १० टक्के हिस्सा भरल्यानंतर ९० टक्के शासकीय अनुदान देण्यात येईल.
- अनुदान मर्यादेच्या अधिकच्या रकमेचा/क्षमतेचा ट्रॅक्टर खरेदी करावयाचा असल्यास अधिक खर्च बचतगटास करावा लागेल

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**

# अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींसाठी निवासी शाळा

आर्थिक परिस्थितीमुळे अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेता येत नाही. शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी निवासी शाळेत प्रवेश देण्यात येतो. यामध्ये इयत्ता ६वी ते १० वी पर्यंत सेमी इंग्रजी शिक्षणासाठी मागासवर्गीय मुलामुलींना प्रवेश दिला जातो.

## प्रमुख अटी

- गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो. विद्यार्थी मागासवर्गीय असावा.
- तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २ लक्ष रुपयांपेक्षा जास्त नसावे.

## लाभाचे स्वरूप

- मोफत भोजन, निवास, नाश्ता, ग्रंथालयीन सुविधा व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा.
- अंथरूणपांघरूण, सुसज्ज संगणक कक्ष व इंटरनेट सुविधा.
- खेळाचे व संगीत साहित्य उपलब्ध.



**अर्ज करण्याची पद्धत**

अर्ज मुख्याध्यापकांकडून प्राप्त करून निवासी शाळेत सादर करावा.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अथवा मुख्याध्यापक, शासकीय निवासी शाळा.**

# अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. या विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागते. या घटकातील विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा, म्हणून परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पी. एचडी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश मिळाला आहे, अशा ५० विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

## प्रमुख अटी

- विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावा.
- विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- विद्यार्थ्याचे वय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे. पीएच. डी. अभ्यासक्रमाकरिता ४० वर्षांपेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थ्याने क्यूएस रँक ३०० मधील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतला असावा.

## लाभाचे स्वरूप

विद्यापीठाने प्रमाणित केलेली शिक्षण शुल्काची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजूर करण्यात येतो.

- विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाह भत्ता अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी १४,००० युएस डॉलर तर यु. के. साठी ९००० पौंड इतका अदा करण्यात येतो.
- विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी युएससाठी व इतर देशांसाठी १३७५ युएसए डॉलर तर यु. के. साठी १००० पौंड इतके अर्थसहाय्य देण्यात येतात. यामध्ये पुस्तक व अभ्यासदौरा इत्यादी खर्चांचा समावेश आहे.
- विद्यार्थ्याला परदेशात जाताना व अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च तिकीट सादर केल्यानंतर मंजूर करण्यात येतो.
- वृत्तपत्रातील जाहिरातीद्वारे दरवर्षी मे महिन्यात अर्ज मागविण्यात येतात.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,**

# सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी पब्लिक स्कूल

सफाई काम करणाऱ्या / अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत, त्यांचा शैक्षणिक, सामाजिक, शारीरिक आणि मानसिक विकास व्हावा, ही मुले विकासाच्या प्रवाहात यावीत, यासाठी पुणे आणि नागपूर येथे पब्लिक स्कूल सुरु करण्यात आली आहेत.

## सुविधा

- पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता १ ली ते ७ वीपर्यंत शिक्षण दिले जाते.
- निवास, भोजन, नाश्ता, शैक्षणिक साहित्य, अंथरूणपांघरूण आणि गणवेश इत्यादी सुविधा विनामुल्य पुरविण्यात येतात.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अथवा मुख्याध्यापक, प. स्कूल**

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार

इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत विशेष यश मिळविणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

## पुरस्काराचे स्वरूप

- सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून राज्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास २ लाख ५० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र.

- सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक बोर्डामधून प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास १ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.

- सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक विभागीय बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या प्रत्येक अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास ५० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.
- सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून जिल्ह्यांत प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.
- सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून तालुक्यात प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास १० हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.
- सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक माध्यमिक महाविद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयातून इयत्ता १० वी आणि इयत्ता १२ वीच्या परीक्षेत प्रथम आलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यास ५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र.

**संपर्क: साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अथवा मुख्याध्यापक, प. स्कूल**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना

अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांना शाश्वत सिंचन सुविधा उपलब्ध करून देवून त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी व त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

## प्रमुख अटी

- अर्जदार अनुसूचित जाती/नवबौद्ध प्रवर्गातील असावा.
- जातीचे प्रमाणपत्र आवश्यक. जमिनीचा सातबारा व आठ अ उतारा आवश्यक. वार्षिक उत्पन्न १.५० रु. लक्ष च्या मर्यादित असावे.
- लाभार्थीची जमीन धारणा ०.२० हेक्टर ते ६ हेक्टरपर्यंत असावी, नवीन विहिरीच्या लाभासाठी किमान क्षेत्र ०.४० हेक्टर असावे.
- सामूहिक शेतजमीन किमान ०.४० हेक्टर धारण करणारे एकत्रित कुटुंब नवीन विहीर या घटकाचा लाभ घेण्यासाठी पात्र असेल.

## लाभाचे स्वरूप

सिंचनाची सुविधा म्हणून नवीन विहीर खोदण्यासाठी रु. २.५ लक्ष अनुदान, जुन्या विहीर दुरुस्तीसाठी ५० हजार रु, इनवेल बोअरिंगसाठी २० हजार रु, पंप संचासाठी २० हजार रु., वीज जोडणीसाठी १० हजार रु.,शेततळ्यांचे प्लास्टिक अस्तरीकरणासाठी १ लाख रु. व ठिबक सिंचनासाठी ५० हजार रु. किंवा तुषार सिंचनासाठी २५ हजार रु. अनुदान स्वरूपात मदत देण्यात येते.

**संपर्क: संबंधित पंचायतसमिती किंवा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद.**

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

अनुसूचित जाती, नवबौद्ध व सफाई कर्मचारी यांकरिता प्रामुख्याने स्वयंरोजगाराच्या खालील योजना महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

## राज्य शासनाच्या योजना

- अनुदान योजना
- बीजभांडवल योजना
- थेट कर्ज योजना
- प्रशिक्षण योजना

## केंद्रीय महामंडळाच्या योजना

**(अ) रा.अ.जा.वि.वि.म.च्या योजना**

(१) मुदती कर्ज योजना
(२) सूक्ष्म पतपुरवठा योजना
(३) महिला समृद्धी योजना
(४) उच्च शैक्षणिक कर्ज योजना

**(ब) रा.रा.क.वि.वि.म.च्या योजना**

(१) मुदती कर्ज योजना
(२) सूक्ष्म पतपुरवठा योजना
(३) महिला समृद्धी योजना
(४) महिला अधिकारीता योजना
(५) उच्च शैक्षणिक कर्ज योजना



## राज्य शासनाच्या योजना

### (१) अनुदान योजना -

या योजनेंतर्गत रु. ५०,००० पर्यंत प्रकल्प गुंतवणूक व्यवसायांना आर्थिक साहाय्य दिले जाते. यामध्ये रु. १०,००० ते ५०,००० पर्यंत बँकेकडून कर्ज मंजूर केले जाते. यामध्ये रु. १०, ००० अनुदान महामंडळाकडून व उर्वरित रक्कम त्यांच्या व्याजदराने दिले जाते.

### (२) बीजभांडवल योजना

या योजनेंतर्गत रु. ५ लाखापर्यंत गुंतवणूक असणारे प्रकल्प विचारात घेतले जातात.
महामंडळाकडून २० टक्के बीजभांडवल रक्कम उपलब्ध करून दिली जाते.
प्रकल्प रकमेच्या ५ टक्के रक्कम स्वतःचा सहभाग म्हणून अर्जदाराने भरावयाची आहे.
उर्वरित ७५% रक्कम ही बँकेकडून मंजूर केली जाते.
महामंडळाकडून मंजूर केलेल्या बीज भांडवल रक्कमेवर चार टक्के व्याजाचा दर आकारला जातो तसेच महामंडळामार्फत रु.१० हजाराचे अनुदान देण्यात येते.
वसुलीचा कालावधी ५ वर्षांचा आहे.

### (३) महामंडळामार्फत राबविण्यात येणारी नवीन रु. १ लक्ष थेट कर्ज योजना -

थेट कर्ज योजनेच्या कर्जाची मर्यादा रु. १,००,००० पर्यंत

**योजनेचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.**

(१) प्रकल्प मर्यादा रु. १,००,०००
(२) महामंडळाचा सहभाग रु. ८५, ००० असून अनुदान रु. १०,००० आहे.
(३) अर्जदाराचा सहभाग रु.५,००० आहे.
(४) सदर कर्जाची परतफेड समान मासिक हप्त्यानुसार ३ वर्षात (३६ महिन्यांच्या) आत करावयाची आहे.
(५) सदर देण्यात येणाऱ्या कर्जावर ४ टक्के द.सा.द.शे . व्याजदर आहे.

### (४) प्रशिक्षण योजना

सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार करण्याचे दृष्टीने प्रशिक्षण दिले जाते. साधारणपणे प्रशिक्षण शुल्क प्रति उमेदवार व्यवसायाच्या स्वरूपानुसार ठरविण्यात येते.

प्रामुख्याने खालील व्यवसायाकरिता प्रशिक्षण देण्यात येते.

उदा. वाहनचालक, टीव्ही - व्हिडीओ, रेडीओ दुरुस्ती, टेलरिंग, वेल्डींग, फिटर, संगणक, ईमेल व विविध व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना दरमहा रुपये १ हजार विद्यावेतन देण्यात येते. तसेच महामंडळामार्फत प्रशिक्षण संस्थेला फी दिली जाते.



# महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ

## दिव्यांगजन स्वावलंबन योजना

- लघु उद्योगकरिता सेवा/व्यापार क्षेत्र - कर्जमर्यादा रक्कम रु. ५ लक्ष विक्री/व्यापार.
- लघु उद्योगाकरिता सेवा / व्यापार क्षेत्र - कर्जमर्यादा रक्कम रु. ७.५० लक्ष सेवा क्षेत्र.
- कृषी तत्सम व्यवसाय कर्जमर्यादा रक्कम रु. १० लक्ष.
- वाहन खरेदी व्यापारी उद्योगाकरिता भाडेतत्त्वावर - कर्जमर्यादा रक्कम रु. १० लक्ष (विशेष खरेदी प्रवर्ग उदा. जेसीबी, ट्रक व रोडरोलर इत्यादी कर्जमर्यादा रक्कम रु. २५ लक्ष) व्यापारी भाडे तत्त्वावर वाहन खरेदी.
- मतिमंद व्यक्तींच्या पालकांसाठी स्वयंरोजगार योजना - कर्जमर्यादा रक्कम रु. १० लक्ष.
- लघु उद्योग गट उभारणीकरिता कर्ज मर्यादा रक्कम रु. २५ लक्ष.
- उच्च तांत्रिक शिक्षण / प्रशिक्षण - भारतामधील शिक्षणाकरिता कर्जमर्यादा रक्कम रु. १० लक्ष व परदेशी शिक्षणाकरिता कर्जमर्यादा रक्कम रु. २० लक्ष.
- व्यावसायिक शिक्षणाकरिता योजना - कर्ज मर्यादा रक्कम रु. २ लक्ष पर्यंत दिव्यांग व्यक्तींकरिता व्यावसायिक / कुशल प्रशिक्षण.
- दिव्यांग युवा व्यक्तींकरिता व्यावसायिक योजना - कर्जमर्यादा रक्कम रु. २५ लक्ष पर्यंत उच्च शिक्षित / प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तींकरिता स्वयंरोजगार योजना.
- साहाय्यक साधनांकरिता वित्त योजना - दिव्यांग व्यक्तीकरिता / स्वयंरोजगारांतर्गत व संधी इत्यादी वाढ करण्याकरिता.
- व्यापारी जागेचा विकास योजना - कर्ज मर्यादा रक्कम रु. ३ लक्ष.
- वैयक्तिक थेट कर्ज योजना-या योजनेखालील कर्जाची कमाल मर्यादा ही रु. ५०,०००/- असून व्याज दर द. सा. द. शे. २% आहे व कर्ज व्याजासहित समान हप्त्यांत ३ वर्षात परत करावयाचे आहे.

## कर्जासाठी मुख्यतः आवश्यक पात्रता -

- या योजनेंतर्गत लाभार्थीचे दिव्यांगत्व ४०% अथवा त्यापेक्षा जास्त असावे. दिव्यांगत्वाचा दाखला जिल्हा वैद्यकीय मंडळ / यांचेकडून प्राप्त केलेला असावा.
- लाभार्थीचे वय किमान १८ वर्षे असावे.
- या योजनेंतर्गत लाभार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. त्याने महाराष्ट्र राज्यात कमीत कमी १५ वर्षे वास्तव्य केलेले असावे. तसे प्रमाणपत्र संबंधित तहसीलदार कार्यालयातून प्राप्त करून ते जोडावे.

# केंद्रीय महामंडळाच्या योजना

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ वाहिनीकृत यंत्रणा म्हणून राष्ट्रीय पातळीवरील खालील योजना राबवीत आहे.

१. राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली.

२. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली.

सध्या उपरोक्त दोन्हीही महामंडळांकडून अनुसूचित व नवबौद्ध जातीतील ज्या कुटुंबाचे ग्रामीण व शहरी भागामध्ये वार्षिक उत्पन्न रु. ३,००,०००/- च्या आत आहे अशांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाते. याकरिता व्याजदर ६ से ८% आकारला जातो.

राष्ट्रीय अनुसूचित जाती/जमाती वित्त विकास महामंडळ, नवी दिल्ली (एनएसकेएफडीसी) - सदर महामंडळाच्या योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची नियंत्रणा म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**अ )राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली.**

१. मुदत कर्ज योजना - सदर योजनेंतर्गत विविध व्यवसायाकरिता एन.एस.एफ. डी. सी. मार्फत रु.३० लक्ष पर्यंत गुंतवणूक असलेल्या योजना मुदती कर्ज दिले जाते. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**केंद्रीय महामंडळाच्या योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.**

| योजना | सहभाग | | | व्याजदर |
| --- | --- | --- | --- | --- |
| | एनएसएफडीसी | मफुमाविमं | अर्जदाराचा सहभाग | |
| (अ) रु.३ लाख | ७५% | २०% | ५% | ६% |
| (ब) रु.४ लाख | ७५% | २०% | ५% | ६% |
| (क) रु. ५ लाख | ७५% | २०% | ५% | ६% |
| (ड) रु.५ लाखाच्या वर | ७५% | २०% | ५% | ८% |

२. सूक्ष्म पतपुरवठा योजना

या योजनेंतर्गत प्रकल्प किंमत रु. ५०,००० प्रत्येक लाभार्थीला आर्थिक साहाय्य दिले जाते. व्याजाचा दर ५% आहे. वसुलीचा कालावधी तीन वर्षाचा आहे.

३. महिला समृद्धी योजना - या योजनेंतर्गत महिलांकरिता प्रकल्प किंमत रु. ५०,००० पर्यंतच्या प्रकल्पांना अर्थसाहाय्य दिले जाते. यात व्याजाचा दर ४% आकारण्यात येतो. वसुलीचा कालावधी ३ वर्षांचा राहतो.

४. उच्च शैक्षणिक कर्ज योजना - एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्यामार्फत व्यावसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता देशात तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजनेंतर्गत देशांतर्गत उच्च शिक्षण घेण्याकरिता रु. २०.०० लाखापर्यंत कर्जदेण्याचे प्रावधान आहे. तसेच देशाबाहेर रु. ३० लाखापर्यंत कर्ज देण्याचे प्रावधान आहे. व्याजदर द.सा.द.शे ५% आकारावयाचा आहे. तसेच महिला लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ४% व्याजदर आकारावयाचा आहे.

## ब ) राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ,नवी दिल्ली (एनएसकेएफडीसी)

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर अस्वच्छ काम करणाऱ्या सफाई कामगारांचे व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबीयांचे पुनर्वसन करण्याकरिता राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे. त्यात विविध व्यवसाय करण्यासाठी रु. १० लाख कमाल मर्यादेपर्यंत कर्ज देण्यात येते.

१. मुदती कर्ज योजना - सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरिता एन. एस. के. एफ. डी. सी. मार्फत रु. १० लक्षपर्यंत गुंतवणूक असलेल्या योजनांना मुदती कर्ज दिले जाते.

**केंद्रीय महामंडळाच्या योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.**

| योजना | सहभाग | | | |
|---|---|---|---|---|
| | एनएसकेएफडीसी | म.फु.मा.वि.म. | अर्जदाराचा सहभाग | |
| [illegible] | ९०% | — | १०% | व्याजदर |

६%

२. सूक्ष्म पत पुरवठा योजना - या योजनेंतर्गत प्रकल्प किंमत रु. ५०,०००/- पर्यंत प्रत्येक लाभार्थीला आर्थिक साहाय्य दिले जाते.
यामध्ये एनएसकेएफडीसीचा सहभाग ९०% तर लाभार्थ्यांचा सहभाग १०% एवढा आहे. व्याजाचा दर ५% आहे. वसुलीचा कालावधी तीन वर्षांचा आहे.

३. महिला समृद्धी योजना - या योजनेंतर्गत महिलांकरिता प्रकल्प किंमत रुपये ५०,०००/- पर्यंतच्या प्रकल्पांना अर्थसहाय्य दिले जाते. यामध्ये एनएसकेएफडीसीचा सहभाग ९०% तर लाभार्थ्यांचा सहभाग १०% एवढा आहे. कर्जावर व्याजाचा दर ४% आकारण्यात येतो. वसुलीचा कालावधी तीन वर्षांचा आहे.

४. महिला अधिकारिता योजना - या योजनेंतर्गत रुपये ७५,००० कर्ज मर्यादेपर्यंत विविध व्यवसायाकरिता महिला लाभार्थींना अर्थसाहाय्य करण्यात येते. यामध्ये एनएसकेएफडीसी कडून ९०% रक्कम तर १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणून घेण्यात येतो. कर्जावर व्याजदर ५% आकारण्यात येतो. कर्ज परतफेडीचा कालावधी ३ वर्षांचा आहे.

५. उच्च शैक्षणिक कर्ज योजना - शैक्षणिक कर्ज सफाई कर्मचारी व त्यांच्यावर आश्रित असलेल्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना व्यावसायिक किंवा तांत्रिक पदवी किंवा पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी दिले जाते. तसेच अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण, व्यवस्थापन, कायद्याचे उच्च शिक्षण घेण्यासाठी सुद्धा कर्ज दिले जाते. एकूण खर्चाच्या ९०% पर्यंत एनएसकेएफडीसी मार्फत कर्ज व १०% महामंडळाचा / प्रशिक्षणार्थीचा सहभाग असेल, कर्जाची मर्यादा रु. १०,००,००० देशांतर्गत व परदेशात रु. २०,००,००० पर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

**(१) बीज भांडवल योजना -**

रु.५०,००१ ते रु. ५ लक्ष  पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या कोणत्याही योजनेसाठी बीजभांडवल योजनेंतगर्त राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्जपुरवठा सवलतीच्या दराने उपलब्ध करण्यात येतो. या योजनेंतगर्त  रु. ५०,००१ पासून ते रु. ५ लक्ष  पर्यंतचा कर्जपुरवठा प्रचलित व्याजदराने बँकेमार्फत करण्यात येतो. या योजनेंतगर्त  बँकेने मंजूर केलेल्या कर्ज रकमेपैकी ७५ टक्के कर्ज रक्कम  ही राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते. ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्याने स्वतःचा सहभाग म्हणून बँकेकडे जमा करावयाची असते. उर्वरित २० टक्के रक्कम ही महामंडळ बीज कर्ज म्हणून देते. या रकमेपैकी रु. १०,००० अनुदान म्हणून देण्यात येतात, तर उर्वरित रक्कम ही ४ टक्के या व्याजदराने बीज कर्ज म्हणून देण्यात येते. या योजनेंतगर्त मिळणाऱ्या कर्जाची परतफेड ही राष्ट्रीयकृत बँकेस व महामंडळास ३६ ते ६० मासिक समान हप्त्यात एकाचवेळी करावयाची असते.

**(२) ५० टक्के अनुदान योजना-**

चर्मकार समाजाच्या कुटुंबातील व्यक्तींना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रु. ५०,००० पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायासाठी सवलतीच्या दराने अर्थ साहाय्य दिले जाते. या अर्थसाहाय्यापैकी रु. १०,००० कमाल मर्यादेपर्यंत ५० टक्के कर्जाची रक्कम महामंडळ अनुदान म्हणून देते. उर्वरित ५० टक्के कर्जाची परतफेड ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत अथवा बँकेने ठरवून दिलेल्या हप्त्यांत बँकेकडे करावी लागते. बँकेकडून या योजनेखाली मिळणाऱ्या कर्जावर प्रचलित दराने व्याज आकारले जाते.

**(३) प्रशिक्षण योजना**

चर्मकार समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण फी व विद्यावेतन हे महामंडळामार्फत देण्यात येते. शासनाकडून प्राप्त झालेल्या विशेष केंद्रीय साहाय्याच्या निधीपैकी १० टक्के खर्च हा प्रशिक्षणासाठी उपयोगात आणला जातो.

**(४) गटई स्टॉल योजना -**

चर्मकार समाजातील व्यक्ती ऊन, वारा आणि  पावसात रस्त्याच्या कडेला बसून गटईचे  काम करतो,.त्याला यापासून संरक्षण मिळवण्यासाठी शासनाने गटई कामगारांना स्टॉल पुरविण्याची योजना सुरू केली आहे. सदरची योजना ही  १०० टक्के अनुदान तत्त्वावर संचालक, समाज कल्याण, पुणे आणि लिडकॉम महामंडळ यांच्या संयुक्तरीत्या राबविली जाते.

## केंद्र शासनाच्या योजना-

**राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एन.एस.एफ.डी.सी. नवी दिल्ली) यांच्या योजना**

**१. मुदती कर्ज योजना -**

सदर योजनेंतगर्त विविध व्यवसायांकरीता एन.एस.एफ. डी.सी.,नवी दिल्ली यांचे मार्फत रु.1 ते २.५ लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना मुदती कर्ज दिले जाते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी.नवी दिल्ली यांचा सहभाग ७५ टक्के, महामंडळाचा सहभाग २० टक्के (रु. दहा हजार अनुदानासहित) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते.

**२. सूक्ष्म पत पुरवठा योजना**

या योजनेंतगर्त चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना ५ टक्के व्याज दराने रु. ४०,००० पर्यंत कर्ज व रु. १०,००० इतके असे एकूण रु. ५०,००० रक्कम दिली जाते.

**३. महिला समृद्धी योजना -**

चर्मकार समाजातील विधवा, परित्यक्ता निराधार अशा महिला लाभार्थीसाठी महिला समृद्धी योजने अंतर्गत ४ टक्के व्याज दराने रु. ४०,००० पर्यंत कर्ज व रु. १०,००० इतके अनुदान असे एकूण रु. ५०,००० रक्कम दिली जाते.

**४. महिला किसान योजना-**

या योजनेंतगर्त ज्या महिलांच्या नावांवर शेतजमिनीचा ७/१२ उतारा आहे किंवा पती-पत्नी या दोघांच्या नावावर ७/१२ उतारा आहे, अथवा पतीच्या नावांवर ७/१२ चा उतारा आहे व त्या महिला लाभार्थीचा पती प्रतिज्ञापत्राद्वारे आपल्या पत्नीस शेतीपूरक व्यवसायासाठी या शेतजमिनीच्या नांवे कर्ज करून घेण्यास तयार असेल अशा महिला लाभार्थीस रु. ४०,००० कर्ज स्वरुपात ५ टक्के व्याज दराने कर्ज देण्यात येते. त्यापैकी रु. १०,००० अनुदान म्हणून दिले जाते.

**५. शैक्षणिक कर्ज योजना -**

या योजनेंतर्गत चर्मकार समाजातील विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाकरिता भारतामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास रु. १० लाख व परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २० लाख पर्यंत कर्ज घेण्याची मर्यादा आहे. याकरिता लाभार्थ्याच्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला, लाभार्थीचा ज्या शिक्षणसंस्थेत शिक्षण घेत आहे त्यांच्याकडून शैक्षणिक खर्चाबाबतचे अंदाजपत्रक घेण्यात येते. यामध्ये २० टक्के लाभार्थी सहभाग म्हणून घेतला जातो. यामध्ये पुरुषांकरिता ४ टक्के व्याज दर असून ३५० टक्के महिलांकरिता व्याज दर आहे.

# आदिवासी विकास विभाग



# आदिवासी विकास विभागाच्या योजना

**शासकीय आश्रमशाळा समूह :-**

अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांच्या आर्थिक शैक्षणिक व सामाजिक विकास जलदगतीने घडवून आणण्यासाठी सन १९७२-७३ पासून शासनाने निवासी आश्रमशाळा समूह योजना कार्यान्वित केलेली आहे. ही योजना मुख्यत्वे अतिदुर्गम डोंगराळ व पाड्यातील आदिवासी मुला/मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करुन शैक्षणिकदृष्ट्या त्यांना सुशिक्षित करणे व त्यायोगे त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने राबविण्यात येते. शिक्षणाची ज्ञानगंगा दऱ्याखोऱ्यात, दुर्गम पाड्यात पोहचविण्याचे काम शासकीय आश्रमशाळांमार्फत होत आहे.सद्यस्थितीत आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त ४९९ शासकीय आश्रमशाळांमध्ये सुमारे १.९७ लाख इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**अनुदानित आश्रमशाळा :-**

राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण ५५६ अनुदानित आश्रमशाळा मंजूर असून त्यापैकी ५२ प्राथमिक अनुदानित आश्रमशाळा, ३२७ माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा व १७७ उच्च माध्यमिक अनुदानित आश्रमशाळा स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जातात. या आश्रमशाळांपैकी सद्यस्थितीत ५४१ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये एकूण२,४१,८९४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनुदानित आश्रमशाळांना वेतन अनुदान, परीरक्षण अनुदान, आकस्मिक खर्च अनुदान व इमारत भाडे अनुदान मंजूर करण्यात येते.

## अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह

आदिवासी विद्यार्थ्यांना गाव, तालुका, जिल्हा व विभागाच्या ठिकाणी माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून शासकीय वसतिगृह सुरू करण्यात आली आहेत. राज्यात ४८७ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यामध्ये एकूण ४८९३३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. या वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना मोफत भोजन, निवास व आवश्यक शैक्षणिक साहित्य पुरवण्यात येते. सन२०१७-१८पासून बेडींग साहित्य, वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य इत्यादी उपलब्ध करून घेण्याकरिता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट निधी जमा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून सन २०१८-१९ पासून महानगर, विभागीय आणि जिल्हास्तरावरील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आहाराकरिता थेट लाभ हस्तांतर योजनेद्वारे लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

## नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणे

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नामांकित शाळेमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली असून नामांकित शाळेमार्फत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येत असलेल्या शैक्षणिक व निवासी सुविधांचा खर्च शासनामार्फत करण्यात येतो. या योजनेंतर्गत आजतागायत एकूण १४८ नामांकित शाळांमध्ये ४६२२६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या योजनंतर्गत शाळांची निवड व त्यांचा दर्जा निश्चित करून दर्जानुसार थेट शाळांना निधी वितरित करण्याची ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

**पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना :-**

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी १५ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयं योजना" सुरु केली आहे. या योजनेंतर्गत वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेनुसार पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न असलेल्या बँक खात्यामध्ये रक्कम वितरित करण्यात येत आहे. सन २०१७-१८ पर्यंत या योजनेंतर्गत महानगर, विभाग व जिल्हास्तरावरील कार्यरत शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येत होता. शासन निर्णय २७ नोव्हेंबर २०१८ अन्वये सन २०१८-१९ पासून तालुकास्तरावरील कार्यरत शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांना देखील योजनेचा लाभ देण्याची सुरुवात करण्यात आलेली आहे.

**पेसा ५ टक्के अबंध निधी योजना**

मा. राज्यपाल महोदयांच्या ३०ऑक्टोबर २०१४ च्या अधिसुचनेनुसार आदिवासी घटक कार्यक्रमाच्या एकूण नियतव्ययाच्या ५% निधी हा दरवर्षी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना पायाभूत सुविधा, वन हक्क अधिनियम व पेसा कायद्याची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका इत्यादी कामांसाठी वितरित करण्यात येतो.

**शबरी घरकुल योजना :-**

राज्यातील ज्या अनुसूचित जमातीच्या कुटुंबाची घरे कुडा-मातीची आहेत किंवा अनुसूचित जमातीची जी कुटुंबे बेघर आहेत अशा अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी या विभागाच्या २८ मार्च २०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २०१२-१३ पासून शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्यात येत आहे.

शबरी आदिवासी घरकूल योजनेचा लाभ देण्यासाठी ग्रामीण क्षेत्राकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा १.२० लाख इतकी आहे. शबरी आदिवासी घरकूल योजनेंतर्गत ग्रामीण भागाकरिता प्रति घरकुल (शौचालय बांधकामासह) अनुदान सर्वसाधारण क्षेत्रासाठी रु.१,३२,०००/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ (शौचालय बांधकामासह) क्षेत्रासाठी रु.१,४२,०००/- देण्यात येते.मनरेगा अभिसरणाद्वारे साधारण क्षेत्रासाठी रु.१७,२८०/- व डोंगराळ व नक्षलग्रस्त क्षेत्रासाठी रु.१८,२४०/- एवढे अनुदान देण्यात येते. शबरी आदिवासी घरकूल योजनेंतर्गत 269 चौरस फुट (२५ चौरस मीटर) क्षेत्रफळाच्या घरकुलाचे बांधकाम करण्यात येते. या योजनेमध्ये विधवा, परित्यक्त्या, निराधार महिला, जातीय दंगलीमध्ये नुकसान झालेली व्यक्ती, अॅट्रासिटी अॅक्टनुसार पिडित व्यक्ती, पूरग्रस्त, आदिम जमाती, पारधी जमाती यांना प्राधान्याने लाभ देण्यात येतो. तसेच या योजनेंतर्गत दिव्यांग व्यक्तींकरिता ५% आरक्षण ठेवण्यात येते.

### ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जमाती घटकांच्या वस्त्यांना/गावांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना सन २००४-०५ या वर्षापासून राबविण्यात येत आहे. त्यामध्ये वेळोवेळी कालानुरुप आवश्यक बदल करण्यात आले आहेत. शासनाने सन २०२२-२३ पासून राज्यातील अनुसूचित जमाती घटकांच्या वस्ती/गावांचा विकास करण्याबाबत सूचविण्यात येणाऱ्या कामांना शासन स्तरावरुन व जिल्हास्तरावरुन मान्यता देऊन राज्य व जिल्हास्तरावरुन योजना राबविण्याचा व योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष सुधारित करण्याचा निर्णय ३ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

### न्युक्लिअस बजेट

ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्त्वाच्या योजना, तांत्रिक औपचारिकतेमुळे दीर्घ कालावधीकरिता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने आणि प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्यांचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा योजनेचा गाभा आहे. तथापि, या योजनेमध्ये लाभार्थींना कर्ज देणे अपेक्षित नाही. न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस/कुटुंबास लाभाची आर्थिक मर्यादा रु ५०,०००/- आहे. या योजनेंतर्गत २ किंवा ३ किंवा त्यापेक्षा अधिक आदिवासी लाभार्थी एकत्र आले तर सामूहिक प्रकल्प/कार्यक्रम सुद्धा मंजूर करता येतात व अशा प्रकल्पात एकूण कमाल मर्यादा रु.७,५०,०००/- आहे.

### एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल

अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणे, विद्यार्थी अष्टपैलू व्हावेत म्हणून शिक्षणाव्यतिरिक्त खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण व विशेष पाठ्येतर शिक्षण देणे यासाठी केंद्र शासनामार्फत नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरावरील महाराष्ट्र ट्रायबल पब्लिक स्कूल सोसायटी मार्फत एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु केले आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत वितरित होणाऱ्या अनुदानातून महाराष्ट्र राज्यात इंग्रजी माध्यमाच्या ) ३९ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल मंजूर झालेल्या आहेत. यापैकी ३७ एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कूल सुरु करण्यात आल्या आहेत. यामध्ये ८०४८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यासाठी केंद्र शासनाकडून प्रती विद्यार्थी प्रती वार्षिक रुपये १ लाख ९ हजार अनुदान अनुज्ञेय आहे.

## भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना

अनुसूचित क्षेत्रात स्त्रियांच्या आहारातील उष्मांक व प्रथिनांच्या कमतरतेमुळे कुपोषण, मातामृत्यू, बालमृत्यू व कमी वजनाची बालके जन्माला येणे यांसारख्या गंभीर समस्यांबाबत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग १८ नोव्हेंबर, २०१५ अन्वये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर स्त्रियांना व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार (आठवड्यातून 6 दिवस) देण्याची योजना १ डिसेंबर, २०१५ रोजी सुरु करण्यात आली. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग ५ ऑगस्ट, २०१६ अन्वये भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेच्या टप्पा-२ अंतर्गत अनुसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्रति दिन शाकाहारी मुलांना २ केळी व मांसाहारी मुलांना १ उकडलेले अंडे आठवड्यातून ४ वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे.

## सैनिकी शाळा

शालेय शिक्षण विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या सैनिकी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना अतिरिक्त तुकडीद्वारे इयत्ता 5 वी पासून पुढे शिक्षण घेण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या २४ डिसेंबर २००७ च्या शासन निर्णयानुसार सैनिकी शाळेतील वसतिगृह, निर्वाह खर्च भागविण्यासाठी प्रती विद्यार्थी रु.१५,००० या प्रमाणे वार्षिक अनुदान, या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात दीर्घ सुटीचे कालावधीत सैनिकी शाळेतून मूळ गावी येण्या-जाण्यासाठी प्रवास खर्च व दैनंदिन किरकोळ खर्च (यात शालेय व कवायत गणवेश, नाईट ड्रेस व मोजे, टॉवेल, तेल साबण, दंतमंजन, लेखनसाहित्य इत्यादी) साठी प्रती विद्यार्थी रु.५०००/- असे एकूण वार्षिक रु.२०,०००- याप्रमाणे अनुदान राज्यस्तरीय योजनेअंतर्गत संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत सैनिकी शाळांना उपलब्ध करुन दिले जाते. तर अतिरिक्त तुकडीवरील शिक्षकांच्या वेतनासाठीचा निधी आदिवासी विभागाकडून शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना वितरित करण्यात येतो

## आदिम जमाती संरक्षण तथा विकास कार्यक्रम

शालेय शिक्षण विभागामार्फत सुरु करण्यात आलेल्या सैनिकी शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना अतिरिक्त तुकडीद्वारे इयत्ता 5 वी पासून पुढे शिक्षण घेण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या २४ डिसेंबर २००७ च्या शासन निर्णयानुसार सैनिकी शाळेतील वसतिगृह, निर्वाह खर्च भागविण्यासाठी प्रती विद्यार्थी रु.१५,००० या प्रमाणे वार्षिक अनुदान, या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात दीर्घ सुटीचे कालावधीत सैनिकी शाळेतून मूळ गावी येण्या-जाण्यासाठी प्रवास खर्च व दैनंदिन किरकोळ खर्च (यात शालेय व कवायत गणवेश, नाईट ड्रेस व मोजे, टॉवेल, तेल साबण, दंतमंजन, लेखनसाहित्य इत्यादी) साठी प्रती विद्यार्थी रु.५०००/- असे एकूण वार्षिक रु.२०,०००- याप्रमाणे अनुदान राज्यस्तरीय योजनेअंतर्गत संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत सैनिकी शाळांना उपलब्ध करुन दिले जाते. तर अतिरिक्त तुकडीवरील शिक्षकांच्या वेतनासाठीचा निधी आदिवासी विभागाकडून शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना वितरित करण्यात येतो

## आदिम जमाती (PVTGs) संरक्षण तथा विकास कार्यक्रम

केंद्र शासनाने राज्यातील कातकरी, कोलाम व माडीया गोंड या तीन जमाती आदिम जमाती म्हणून घोषित केलेल्या आहेत.

**कातकरी :** ठाणे, पालघर, रायगड, पुणे व नाशिक
**कोलाम :** यवतमाळ, नांदेड, चंद्रपूर
**माडीया गोंड :** गडचिरोली

## आधारभूत किंमत खरेदी योजना

## धान खरेदी :

आधारभूत किंमत खरेदी योजना केंद्र शासनाची योजना असून, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत दरवर्षी शासन निर्णयान्वये आदिवासी उपयोजना क्षेत्रात महामंडळामार्फत धान व भरडधान्य (ज्वारी, मका, बाजरी व रागी) करणेसाठी महामंडळाची अभिकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात येते. खरेदी केलेल्या धानाची भरडाई करण्यासाठी शासन निर्देशानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत समिती मार्फत राईस मिल निश्चित करुन त्यांचे मार्फत धानाची भरडाइ होऊन तयार होणारा सीएमआर (तांदूळ) विकेंद्रीत योजनेंतर्गत जिल्हा विभागाकडे हस्तांतरित केला जातो.

# स्वयंरोजगार योजना



## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना

- योजना पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागामार्फत राबविण्यात येते.
- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेकरिता maha-cmegp.gov.in हे ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित आहे.. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली डीएलटीएफसी समितीमार्फत शिफारस करण्यात येते.
- राज्यस्तरीय बँकर्स समिती यांच्या मान्यतेने एकूण २३ सार्वजनिक क्षेत्रातील बँका व ११ खासगी क्षेत्रातील तसेच १४ सहकारी बँकांचा समावेश या योजनेत आहे.

**योजनेंतर्गत पात्रतेचे निकष आणि ठळक वैशिष्ट्ये :-**

- उत्पादन उद्योग, कृषिपूरक उद्योग व सेवा उद्योग प्रकल्प योजनेंतर्गत लाभासाठी पात्र.
- प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु.५० लक्ष
  उद्योग / व्यवसाय प्रकल्पासाठी कमाल रु.२० लक्ष

  **शैक्षणिक पात्रता :**
  रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान ७ वी पास
  रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास
- लाभार्थ्यांची स्वगुंतवणूक ५ ते १० टक्के, बँक कर्ज ६० ते ७५ टक्के व राज्यशासनाचे अनुदान १५ ते ३५ टक्के.
- एकूण लक्षांकापैकी किमान ३० टक्के महिला लाभार्थी व किमान २० टक्के अनुसूचित जाती / जमाती. लाभार्थ्यांची वयोमर्यादा १८ ते ४५ इतकी आहे.
- स्वयंसाहाय्यता बचत गट भागीदारी संस्था यांच्यासह एकल मालकी कंपनी व मर्यादित दायित्व संस्था यांचा योजनेंतर्गत नव्याने समावेश करण्यात आलेला आहे.
- विशेष मागास प्रवर्गांतर्गत अनुसूचित जाती / जमाती, महिला,दिव्यांग, माजी सैनिक, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त व भटक्या जमाती, अल्पसंख्यांक यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

- स्वयंरोजगार उभारणीस प्रोत्साहन देण्यासाठी सुलभ तत्त्वावर भांडवल उभारणी करून देणे हा आहे. राज्यात राष्ट्रीयकृत बँकांच्यामार्फत सदर योजनेंतर्गतअर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येते. यासाठी खादी ग्रामोद्योग मंडळ व जिल्हा उद्योग केंद्र या तीन यंत्रणांमार्फत योजनेची अंमलबजावणी करण्यात येते.
- रु. ५० लाखांपर्यंत गुंतवणुकीपर्यंतचे उद्योग प्रकल्प तथा रु. २० लाखांपर्यंतच्या व्यवसाय सेवा घटक प्रकल्पांना ९० ते ९५ टक्के कर्ज राष्ट्रीयकृत बँका तथा विभागीय ग्रामीण बँका, आयडीबीआय मार्फत उपलब्ध होते. उर्वरित ५ ते १० टक्के रक्कम अर्जदाराने स्वतः भरावी लागत
- एकूण कर्जापैकी सर्वसाधारण गटातील उमेदवाराला शहरी भागात १५ टक्के व ग्रामीण भागात २५ टक्के मार्जिन मनी अनुदान देय असून विशेष गटातील उमेदवाराला शहरी भागात २५ टक्के व ग्रामीण भागात ३५ टक्के मार्जिन मनी अनुदान सुविधा आहे. विशेष गटात अनुसूचित जाती/ जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक, महिला, अपंग उमेदवार, माजी सैनिक यांचा समावेश होतो.
- रु. ५ लाखांपेक्षा अधिक गुंतवणुकीचे व्यापार सेवा घटकासाठी तसेच रु. १० लाखापेक्षा अधिक गुंतवणुकीच्या उद्योग प्रकल्पासाठी शिक्षण आठवी वर्ग पास. अन्यथा शिक्षणाची अट नाही.
- वैयक्तिक लाभार्थी स्वतंत्र सहायता गट, सहकारी सोसायट्या, उत्पादित सहसोसायटी, चेरीटेबल ट्रस्ट यांना अर्थसाहाय्य करण्यात येते.
- कर्जवाटपा पूर्वी आवश्यक प्रशिक्षण कालावधी- दोन आठवडे.
- सर्व जिल्हा कार्यालयास लक्षांक वाटप करण्यात येतो. संबंधित जिल्हा कार्यालयामार्फत जिल्ह्यास दिलेल्या लक्षांकाच्या दीड ते दोन पट अर्ज स्वीकारण्यात येतात. प्राप्त अर्जाची छाननी योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केली जाते व पात्र ठरलेले अर्ज जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या जिल्हा कार्यबल समितीच्या शिफारशीने संबंधित जिल्हास्तरीय बँकेकडे पाठविले जातात. बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर व लाभार्थ्याने आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर बँक लाभार्थ्यास कर्जवितरण करते. तदनंतर मार्जिन मनी (अनुदान) नोडल बँकेकडून कर्ज देणाऱ्या बँकेस वितरित करण्यात येते..

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र सरकारची महत्वाकांक्षी योजना असून या योजनेअंतर्गत काम मागणाऱ्या लाभार्थ्यांना अकुशल रोजगार पुरविला जातो. यामध्ये १०० दिवसांपर्यंत रोजगाराची हमी केंद्र सरकारची आहे व त्यानंतरची रोजगाराची हमी राज्य सरकार देते. योजनेचे संपूर्ण कामकाज हे संगणकीकृत असून लाभार्थी यांच्या बँक खात्यात त्यांच्या मजुरीची रक्कम जमा होते. हे सर्व कामकाज पारदर्शक पद्धतीने केले जाते. या योजनेंतर्गत सार्वजनिक तसेच वैयक्तिक कामे देखील घेता येतात. बेरोजगारांना रोजगार निर्माण करून देण्याबरोबरच शाश्वत मत्ता निर्माण करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

## मनरेगा अंतर्गत घेता येणारी २६२ प्रकारची कामे

### वैयक्तिक स्वरुपाची कामे –

- ► प्रधानमंत्री आवास योजना/इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलचे अकुशल काम.
- ► फळबाग लागवड.
- ► वृक्षलागवड (पडीक जमिनीवर /रस्ता दुतर्फा /किनारपट्टी लगत /बांधावर इ.)
- ► सिंचन विहीर.
- ► शेततळे.
- ► शोषखड्डे.
- ► कंपोस्ट खत/नाडेफ खत/गांडूळ खत टाकी.
- ► अझोला खत/ जैविक खतनिर्मीती साचा.
- ► गुरांचा/ शेळीचा गोठा.
- ► कुक्कुटपालन शेड.
- ► शेतबांध बंदिस्ती.

### सार्वजनिक स्वरूपाची कामे –

- ► सार्वजनिक फळबाग लागवड.
- ► सार्वजनिक वृक्षलागवड (पडीक जमिनीवर /रस्ता दुतर्फा /किनारपट्टी लगत /बांधावर इ.)
- ► रोपवाटिका.
- ► सार्वजनिक सिंचन विहीर.
- ► शेततळे.
- ► सी.सी.टी.
- ► सार्वजनिक कालवा/ तळे/ लहान पाझर तलाव/ मत्स्यपालन तलाव बांधणे, दुरुस्ती व नूतनीकरण.
- ► गुरांचा/ शेळीचा गोठा /कुक्कुटपालन शेड.
- ► रस्ते.

### अभिसरण अंतर्गत घेता येणारी कामे –

राज्य अभिसरण आराखड्यामध्ये अकुशल भाग हा रोजगार हमी योजना मधून व कुशल भाग इतर योजना मधून दिला जातो.

- ► शाळेसाठी संरक्षण भिंत बांधकाम.
- ► शाळेकरिता/मैदानाकरिता साखळी कुंपण.
- ► शालेय स्वयंपाकगृह निवारा.
- ► अंगणवाडी बांधकाम.
- ► ग्रामपंचायत भवन.
- ► सार्वजनिक जागेवर गोदाम.
- ► स्मशानभूमी शेड बांधकाम.
- ► बचत गटांच्या जनावरांसाठी सामूहिक गोठे.
- ► सामूहिक मत्स्यतळे.
- ► सिमेंट रस्ता.
- ► डांबर रस्ता.
- ► पेव्हिंग ब्लॉक रस्ता.
- ► नाला मोरी बांधकाम.
- ► सिमेंट नाला बांध.
- ► आरसीसी मुख्य निचरा प्रणाली.
- ► भूमिगत बंधारा.

### सुविधासंपन्न कुटुंब व समृद्ध गाव योजना

रोजगार हमी योजना विभागाने **"मी समृद्ध तर गाव समृद्ध तर पर्यायाने माझा महाराष्ट्र समृद्ध"** हे तत्त्व समोर ठेवून वाटचाल सुरू केली आहे. तसेच लेबर बजेट ऐवजी समृद्धी बजेट राज्यात तयार करण्यात येत आहे. विभागाने गाव हा घटक लक्षात न घेता कुटुंब हा घटक लक्षात घेतला आहे.

मानवी विकास निर्देशांकात आवश्यक असणाऱ्या जसे की आरोग्य, शिक्षण व राहणीमान यावर लक्ष केंद्रित करून सुविधापतीच्या विविध टप्प्यावर संबंधितांना घेऊन जाणे, याकरिता सुविधासंपन्न कुटुंब व समृद्ध गाव योजना राज्यभर राबविण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता नंदादीप गावे निवडण्यात येणार आहेत. तसेच या योजनेच्या नियंत्रणासाठी व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर मिशन कार्यालय स्थापन करण्यात येणार आहे.

## शेत रस्ते पाणंद रस्ते

पाणंद रस्ते हे प्रामुख्याने शेतीमधील कामाकरिता आवश्यक असणाऱ्या साधनांची ने आण करण्याकरिता उपयोगात येतात. पावसाळ्यामध्ये शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रसामग्रीची वाहतूक शेत पाणंद रस्ते योजनेमुळे सुयोग्य झाली आहे.
कामे- राज्यात शेत रस्ते पाणंद रस्ते तयार करणे/ शेतरस्त्यावरील अतिक्रमण काढणे मुरुम व खडी टाकून दगड, माती शेतरस्त्याचे मजबुतीकरण करणे इत्यादी कामे केली जातात.

सदर योजनेस मनरेगामधून अधिक राशी मिळविण्याच्या हेतुने मनरेगा आणि राज्य रोहयो यांच्या अभिसरणाद्वारे पूरक कुशल निधी उपलब्ध करणे तसेच मनरेगामध्ये होणारी विविध कामांमधील अकुशल व कुशलच्या संयोजनामधूनसुद्धा शेतपाणंद रस्ते बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शेत रस्ते/पाणंद रस्ते करण्याकरिता वित्त आयोग, खासदार आमदार स्थानिक विकास निधी, ग्रामपंचायतीला जनसुविधांकरिता मिळणारे अनुदान, मोठ्या ग्रामपंचायतीला नागरी सुविधांसाठी विशेष अनुदान, गौण खनिज विकास निधी जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी, ग्रामपंचायतींना मिळणारे महसुली अनुदान, जिल्हा परिषद पंचायत समितींना सेस मधून उपलब्ध होणारा निधी, ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्न, पेसाअंतर्गत उपलब्ध होणारा निधी (अनुसूचित क्षेत्रातील गावांकरिता ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती (सुधार कार्यक्रम) आदिवासी उपाययोजना गावाकरिता नावीन्यपूर्ण योजना. वैधानिक विकास महामंडळामार्फत उपलब्ध होणारा निधी, इतर जिल्हा योजना. मनरेगा अंतर्गत प्राप्त निधी इत्यादी विविध स्त्रोतांमधून प्राप्त होणाऱ्या निधीतूनही खर्च करण्यात येतो.
सदर योजनेमध्ये रुपये २४.०० लाख एका कि.मी. साठी देण्यात येत असून रुपये १५.०० लाख केंद्र शासनाकडून प्राप्त होत असून उर्वरित रुपये ९.०० लाख राज्य शासन देणार आहे.
या आर्थिक वर्षासाठी ३५००० कि.मी. लांबीचे शेत पाणंद रस्त्याच्या आराखड्याला मान्यता देण्यात आली असून यापैकी बहुतांश रस्त्यांचे कामे सुरू करण्यात आली आहेत.

## ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था

- ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील व १८ ते ४५ वयोगटातील युवक- युवतींना स्वयंरोजगारा साठी १० ते ४५ दिवसांचे विविध व्यवसायांचे (शेती व बिगर शेती) निवासी व विनामूल्य / मोफत प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण केंद्र चालविण्याची पूर्ण जबाबदारी त्या त्या जिल्ह्यातील Lead Bank कडे सोपविण्यात आली आहे.
- प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात किमान एक एकर जमीन बँकेला उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्र राज्यात एकूण ३५ RSETIs आहेत. प्रत्येक प्रशिक्षण केंद्रात दरवर्षी किमान ७५० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी केंद्र शासन प्रशिक्षणाने निर्गमित केलेल्या Common Cost Norms Notification नुसार अनुदान अदा केले जाते.

## दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना

आपल्या देशात ग्रामीण भागात बरेच युवक व युवती हे अनेक कारणांमुळे शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षणापासून वंचित राहतात, त्यामुळे रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे योग्य कौशल्ये नसतात. त्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. तरी केंद्र शासनाने दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजनेंतर्गत ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील युवक व युवतींना कमी कालावधीचे (तीन महिने ते एक वर्षाचे ) कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली आहे. हा कार्यक्रम पीपीपी च्या माध्यमातून राबविला जातो. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करण्याचा या योजनेचा उद्देश आहे. यासाठी ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील ८ वी पास बेरोजगार युवक-युवतींना त्यांच्या इच्छेनुसार प्रशिक्षण देऊन किमान रु. ६००० मासिक वेतनाचे रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम करण्यात येत आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये-**

१. पूर्णपणे मोफत असे ३ महिन्याचे निवासी प्रशिक्षण.
२. मार्केटनुसार तसेच नोकरीची शाश्वती असलेले प्रशिक्षण.
३. ७० टक्के प्रशिक्षणार्थींना नोकरीची हमी.
४. ग्रामीण युवकांना १८ ते ३५ वयोगटातील तसेच आदिवासी, विधवा, वेठबिगारी ह्यांच्यासाठी वरील वयोमर्यादा ४५ एवढी शिथिल करण्यात आलेली आहे.
५ .एस. सी. ३१ टक्के, एस. टी. २५ टक्के, अल्पसंख्याक २० टक्के, महिला-३३ टक्के यांचे अनिवार्य सामाजिक समावेशन केले आहे.

## सुधारित बीज भांडवल योजना (एसएमएस) (जिल्हास्तरीय योजनेंतर्गत)

**पात्रता :-**

१. कमीत कमी ७ वी पास.

२. वयोमर्यादा १८ ते ५० वर्ष.

३. अर्जदार महाराष्ट्राचा किमान १५ वर्षांचा रहिवासी असावा.

**वैशिष्ट्ये :-**

शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी बीजभांडवलाच्या रुपाने अर्थसाहाय्य करणे, संस्थात्मक कर्जाचा लाभ घेण्यासाठी मार्जिन मनीचा भाग पूर्ण करण्यासाठी मृदु कर्ज प्रदान करणे. रोजगारनिर्मितीच्या संधी निर्माण करणे, सदरचे कर्ज हे उत्पादन / सेवा व व्यवसाय याकरिता उपलब्ध करून देण्यात येते.

- प्रकल्प मर्यादा रु. २५.०० लाखांपर्यंत आहे.
- बीज भांडवल कर्जाची कमाल मर्यादा रु. ३.७५ आहे.
- बँक कर्ज ७५ टक्के.
- रुपये दहा लाखांपेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकल्पांमध्ये बीज भांडवल कर्जाचे प्रमाण पुढीलप्रमाणे राहील :-

(१) सर्वसाधारण प्रवर्गातील लाभधारकांसाठी १५ टक्के.

(२) अनु. जाती/जमाती, दिव्यांग, विमुक्त व भटक्या जाती/जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांना २० टक्के.

- बीज भांडवल साहाय्यावर आकारावयाचे व्याज - बीज भांडवलाची रक्कम मृदु कर्ज (सॉफ्ट लोन) म्हणून दरसाल ६% व्याजाने देण्यात यावे.
- बीज भांडवल कर्जाच्या रकमेची विहित कालावधीत परतफेड करण्यात आली नाही, तर थकित रकमेवर द.सा.द.शे. १ दंडनीय व्याज आकारण्यात येईल.
- बीज भांडवल कर्जाच्या रकमेची विहित कालावधीत परतफेड करणाऱ्या लाभार्थीना ३ टक्के रिबेट देण्यात येईल.
- कर्जदाराने थकित मुद्दल व व्याज एकरकमी भरणा केल्यास त्यास दंडनीय व्याज माफ आहे. अशा प्रकरणांमध्ये द.सा.द.शे. १ टक्के दराने दंडनीय व्याज आकारण्यात येणार आहे.
- सदर योजना वाहन व्यवसाय, व्यापार व सेवा उद्योगांसाठी लागू आहे.
- कर्जाची परतफेड ७ वर्षांच्या आत करावयाची असून सुरुवातीची ३ वर्ष विलंबावधी (वाहनांसाठी ६ महिने) निश्चित करण्यात आला.

## जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना (जिल्हास्तरीय योजनेंतर्गत)

ग्रामीण भागात सूक्ष्म उद्योगांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून त्यांचा विकास साधणे व याद्वारे अधिक रोजगार संधी व स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र कर्जयोजना सुरु करण्यात आली. ही योजना जिल्हास्तरीय योजना असून जिल्हास्तरावर जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयामार्फत राबविली जाते.

**पात्रता :-**

१. शिक्षणाची व वयाची अट नाही.
२. उद्योग, लघुउद्योग नोंदणीस पात्र असावा.
३. उद्योगामधील यंत्रसामग्री गुंतवणूक रु. २ लाखांच्या आत असावी.
४. १ लाख लोकवस्ती (१९८१ प्रगणनेनुसार) असणाऱ्या गावांमध्ये उद्योग सुरू करता
५.चालू उद्योगाचा विस्तार करण्यासाठी हीया योजनेचा लाभ घेता येतो.

**वैशिष्ट्ये :-**

- ६५ ते ७५ टक्के बँककर्ज.
- सर्वसाधारण प्रवर्गासाठी २० टक्के बीजभांडवल जास्तीत जास्त मर्यादा रुपये ४०,००० अनु. जाती / जमातीच्या लाभार्थीस ३० टक्के कमाल रुपये ६०,००० पर्यंत. व्याजाचा दर ४% राहील.
- लाभार्थ्यास स्वतःचे ५ टक्के भांडवल.
- बीजभांडवल कर्जाची परतफेड ४ वर्षे.
- नवीन स्थापित होणाऱ्या सूक्ष्म उद्योग या उपक्रमातील एकूण प्रकल्प किंमत रुपये २ लाखांपेक्षा
- कमी असणे आवश्यक आहे.
  मार्जिन मनी प्रकल्प खर्चाच्या २०% रक्कम सर्वसाधारण प्रवर्गाच्या उमेदवाराला दिली जाते.
- प्रकल्प खर्चाच्या ३०% एवढी मार्जिन मनी एससी / एसटी प्रवर्गातील उमेदवाराला दिली जाते.
  मार्जिन मनी घटक वार्षिक ४% व्याज दराने दिला जातो.
  शिक्षणाची व वयाची अट नाही; परंतु लाभार्थ्यांकडे संबंधित उद्योग करण्यासाठी लागणारे
- कौशल्य किंवा अनुभव असणे अपेक्षित
  योजना जिल्हा उद्योग केंद्रामार्फत जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येते.
- ग्रामीण भागातील पात्र उमेदवार जिल्हा उद्योग केंद्राकडे अर्ज सादर करतो. नंतर प्रस्ताव बँकांकडे पाठवतात. बँका पात्र आणि व्यवहार्य प्रस्ताव मंजूर करतात जिल्हा उद्योग केंद्रामार्फत घटकाला मार्जिन मनी आणि बँक कर्ज वितरित केले जाते.

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (जिल्हास्तरीय योजनेंतर्गत)

राज्यात उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे युवक-युवतींना उद्योजकीय तसेच तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये युवक-युवतींना प्रशिक्षण देण्यासाठी विद्यावेतन देण्याची तरतूद देखील केली आहे. या माध्यमातून स्वयंरोजगार सुरू करावेत तसेच तांत्रिक प्रशिक्षण घेऊन कुशल मनुष्यबळाची निर्मिती व्हावी असाही उद्देश होता.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांच्या अध्यक्षतेखाली कार्यबल समिती नेमण्यात आली असून त्यामध्ये जिल्हा समाज कल्याण अधिकारी,अग्रणी बँक अधिकारी व प्रशिक्षण संस्थेचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रात प्रामुख्याने राज्य शासनाने पुरस्कृत केलेली महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, औरंगाबाद व मिटकॉन कन्सल्टन्सी लि. व अन्य मान्यताप्राप्त संस्था उद्योजकता प्रशिक्षणाचे काम करीत आहेत.

**१. उद्योजकता परिचय कार्यक्रम (१ दिवस, अनिवासी)**

एक दिवसाच्या परिचय कार्यक्रमात व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकास, व्यवसाय व्यवस्थापन, शासनाच्या विविध संस्था व अर्थसाहाय्य देणाऱ्या संस्था व त्यांचेमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली जाते. प्रति प्रशिक्षण कार्यक्रम ६०० रुपये खर्च राहील.

**२. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (१२ दिवस, निवासी)**

सदर प्रशिक्षण कार्यक्रम १२ दिवसांचा, निवासी व भोजन व्यवस्थेसह आहे. उद्योजकता परिचय कार्यक्रमात निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना उद्योगांशी संबंधित कलागुणांचा विकास व माहिती मिळण्याचा प्रशिक्षणात प्रामुख्याने समावेश आहे. प्रति प्रशिक्षणार्थी रुपये ४००० संस्थेस देण्यात येतात.

**३. तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम (१५ दिवस ते २ महिने, अनिवासी)**

या प्रशिक्षण कार्यक्रमात उत्पादन / सेवा उद्योगांशी निगडित तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. हे प्रशिक्षण अनिवासी असून प्रशिक्षणार्थीस १५ दिवसांकरिता रुपये ५०० आणि दरमहा रुपये १००० तसेच २ महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी रुपये २००० विद्यावेतन देण्यात येते. तसेच प्रति प्रशिक्षणार्थीस रुपये ३००० संस्थेस देण्यात येतात.

# प्रधानमंत्री मुद्रा योजना

**( माइक्रो यूनिट डेव्हलपमेंट रिफायनन्स एजन्सी )**

## केंद्र सरकारच्या मुद्रा योजनेचे (पीएमएमवाय) दोन उद्देश आहेत.

- पहिले स्वंयरोजगारसाठी सुलभ कर्ज उपलब्ध करून देणे
- दुसरे छोट्या उद्योगांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करणे.

जर तुम्ही आपला स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी इच्छुक असाल आणि तुम्हाला भांडवलाची समस्या सतावत असेल तर तुम्ही केंद्र सरकारच्या पीएमएमवाय योजनेच्या माध्यमातून आपले स्वप्न साकार करू शकता.

## प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे (पीएमएमवाय) लाभ

- मुद्रा योजना (पीएमएमवाय) च्या माध्यमातून विना गॅरंटी कर्ज मिळते.
- या लोनसाठी कोणतेही प्रक्रिया शुल्क आकारले जात नाही.
- मुद्रा योजनेत (पीएमएमवाय) कर्ज परतफेडीचा कालावधी पाच वर्षापर्यंत वाढवला जाऊ शकतो.
- कर्ज घेणाऱ्यांना एक मुद्रा कार्ड मिळते, त्याच्या मदतीने उद्योगासाठी आवश्यक खर्च केला जाऊ शकतो.

## मुद्रा योजनेचा (पीएमएमवाय) लाभ कोणाला मिळतो

- देशातील कोणीही व्यक्ती जो स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यास इच्छुक आहे तो पीएमएमवाय योजनेच्या माध्यमातून कर्ज घेऊ शकतो.
- जर तुम्ही सध्या असलेला व्यवसाय वाढवणार असाल व त्याच्यासाठी पैशाची आवश्यकता असेल तर तुम्ही प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत १० लाख रुपयांपर्यंत कर्जासाठी अर्ज करू शकता.

## मुद्रा (पीएमएमवाय)मध्ये तीन प्रकारची कर्जे दिली जातात

- **शिशु लोन :** शिशु लोन अंतर्गत ५० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जाते.
- **किशोर लोन:** किशोर कर्ज प्रकारात ५० हजार ते ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते.
- **तरुण लोन:** तरुण कर्ज प्रकारात ५ लाख ते १० लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते.

## मुद्रा लोन (पीएमएमवाय) मध्ये व्याज दर

प्रधानमंत्री मुद्रा योजना माध्यातून मिळणाऱ्या कर्जावर निश्चित व्याज दर नाही. वेगवेगळ्या बँका मुद्रा लोनसाठी वेगवेगळा व्याज दर आकारू शकतात. कर्ज घेणाऱ्या व्यक्तीच्या उद्योगाचे स्वरूप व त्याच्याशी संबंधित जोखमीच्या आधारावर व्याज दर निश्चित केले जातात. सामान्यपणे कमीत कमी व्यार दर १२ टक्के आहे.

## प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा लाभ कसा मिळवाल

- मुद्रा योजना (पीएमएमवाय) च्या माध्यमातून कर्ज मिळवण्यासाठी तुम्हाला राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेत जाऊन विहित नमुन्यात अर्ज सादर करावा लागेल.
- जर तुम्ही स्वत: चा उद्योग सुरु करणार असाल तर तुम्हाला घराचा मालकी हक्क किंवा भाड्याच्या घराचे करारपत्र, कामासंबंधित माहिती, आधार, पॅन नंबर सह अन्य कागदपत्रे सादर करावी लागतील.
- बँकेचा शाखा व्यवस्थापक तुमच्याकडून उद्योगासंबंधी माहिती घेईल. त्या आधारावर तुम्हाला पीएमएमवाय योजनेच्या माध्यमातून लोन मंजूर केले जाईल. उद्योगाच्या स्वरूपाच्या हिशेबाने शाखा व्यवस्थापक तुम्हाला एक प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यास सांगू शकतो.

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान 'उमेद' या स्वतंत्र संस्थेची स्थापन करण्यात आलेली आहे. या अभियानाची अंमलबजावणी राज्यातील ३४ जिल्हे व ३५१ तालुक्यात पूर्ण ताकदीने अभियान राबविले जात आहे. या योजनेअंतर्गत महिलांना स्वयंरोजगारासाठी किंवा वैयक्तिक गरजांसाठी बिनव्याजी कर्ज दिले जाते.

ग्रामीण भागात राहत असलेल्या स्त्रिया काही विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्याकरिता सर्व मिळून विविध महिला गटाद्वारे एकत्र येत असतात, अशा महिलांना ह्या उपक्रमातून सरकारकडून पाठबळ दिले जावे. एखाद्या विशिष्ट बचत गटाला जेवढी आवश्यकता आहे, तेवढे कर्ज बँकेकडून दिले जावे, अशी तरतूद खास करून यात करण्यात आली आहे.

### "उमेद" अंतर्गत महिलांना किती कर्ज मिळते

उमेद अभियानांतर्गत सरकार ग्रामीण भागातील तसेच तळागाळातील गरजवंत महिलांना २० लाखांपर्यंतचे कर्ज प्रदान करणार आहे. उमेद अभियानांतर्गत सरकार महिलांना जे कर्ज उपलब्ध करून देते त्यावर नाममात्र व्याज दर आकारले जाते . तर बचतगटाच्या प्रमाणे बँका त्यांना कर्ज देत असतात.

### काहीही तारण ठेवावे लागणार नाही

उमेद अभियानांतर्गत सरकार महिलांना जे कर्ज उपलब्ध करून देणार आहे. त्याकर्जासाठी महिलांना कुठल्याही प्रकारची वस्तू, संपत्ती, घराची व जमिनीची कागदपत्रे, मौल्यवान दागदागिने इत्यादी काहीही तारण ठेवावे लागणार नाही.

### कर्जाच्या रक्कमेत महिला काय करू शकतात

उमेद अभियानांतर्गत जे कर्ज महिलांना दिले जाईल, त्या कर्जाच्या रकमेत महिला स्वतःचा एखादा स्टार्टअप म्हणजे छोटा मोठा उद्योग व्यवसाय सुरू करू शकतील.

### कोणते अटी नियम लागू आहेत

उमेद अभियानांतर्गत प्राप्त होत असलेल्या कमी व्याजदरातील कर्जाचा लाभ फक्त महिला बचत गटामधील सदस्य असलेल्या महिलाच घेऊ शकतात. एवढेच नव्हे तर ही कर्जाची रक्कम महिला आपल्या वैयक्तिक खर्चासाठी देखील वापरू शकतात.

राज्य शासनाच्या आदेशाप्रमाणे अणि केंद्र सरकारने ठरवलेल्या धोरणाप्रमाणे ह्या योजनेचा लाभ त्याच बचत गटाला घेता येईल ज्याची जिल्ह्यातील ग्रामीण विकास यंत्रणेकडे नोंद असणार आहे.

### कोणत्या महिला गटाला शून्य व्याज दराने कर्ज दिले जाते

ज्या महिला बचत गटाकडून आपल्या घेतलेल्या कर्जाची वेळेवर अणि नियमितपणे परतफेड करण्यात येते, अशा महिला बचत गटाला सुमतीबाई सुकळीकर महिला सक्षमीकरण योजनेंतर्गत व्याजावर अनुदान प्रदान करण्यात येते. अशा बचत गटांना शून्य टक्के व्याज दराची आकारणी करून कर्ज देखील दिले जाते

योजनेच्या माध्यमातून सरकार महिलांचा जीवनस्तर उंचावणे व त्यांच्यामध्ये उद्योग कौशल्यामध्ये सुधार करण्याच्या संधी उपलब्ध करेल. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकारद्वारे अनेक कौशल्यविकास प्रशिक्षण कार्यक्रम आणि स्टार्टअप मार्गदर्शन आयोजित केले जातील. नव तेजस्विनी योजनेचा ग्रामीण भागात जवळपास १० लाख कुटुंबांना लाभ मिळेल.

## नव तेजस्विनी ग्रामीण महिला सशक्तीकरण कार्यक्रम

- तेजस्विनी योजना ग्रामीण कुटुंबांना दारिद्र्यरेषेबाहेर आणण्यास आर्थिक मदत. त्याचबरोबर तेजस्विनी योजनेद्वारे महिलांना कमी व्याज दराने कर्ज सुविधा उपलब्ध.
- यासाठी आंतरराष्ट्रीय कोष ३३३ कोटी रुपयांचे अनुदान देईल आणि राज्य सरकार १९० कोटी रुपयांचा निधी पुरवठा.
- 'विकेल ते पिकेल' नुसार होणार महिलांकडून उत्पादनांची निर्मिती
- स्थानिक गरज, उत्पादनक्षमता आणि मागणी यावर अधिक भर देत राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'विकेल ते पिकेल' या योजनेनुसार बचत गटांकडून उत्पादने घेण्यावर भर दिला जाणार आहे.
- खासगी उत्पादक तसेच कॉर्पोरेट क्षेत्रातील उत्पादनांशी तुलना करता बचत गटांची उत्पादने, त्यांचा दर्जा, सादरीकरणात तसेच स्पर्धेत कमी पडतात. यावर मात करण्यासाठी उत्पादनांचे ब्रँडिंग, पॅकेजिंग, उत्पादनांच्या दर्जात करण्यासाठी सर्व प्रकारची मदत माविमच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच 'आयफॅड'च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे कौशल्य तसेच सल्ला या प्रकल्पासाठी मिळणार आहे. त्यामुळे बचत गटांच्या उत्पादनांचा दर्जा वाढण्यासह अधिक भर

# कामगार विभाग



# बांधकाम कामगार योजना

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये कामगार विभागाच्या कार्यालयामध्ये इमारत व इतर बांधकाम कामगाराची नोंदणी करण्यात येते. त्यासाठी खालील पात्रता व कागदपत्रांची आवश्यकता असते.

## पात्रता :



- १८ ते ६० वर्षे वयोगटातील बांधकाम कामगार.
- मागील बारा महिन्यांमध्ये ९० दिवसापेक्षा जास्त दिवस बांधकाम कामगार. म्हणून काम केलेले कामगार.

## नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- वयाबाबतचा पुरावा.
- मागील वर्षभरात ९० दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे नियोक्ताचे प्रमाणपत्र.
- पासपोर्ट आकारातील ३ रंगीत फोटो.
- रहिवासी पुरावा .
- फोटो आयडी पुरावा.
- बँक पासबुकची झेरॉक्स.

**कामगाराने नोंदणी केल्यानंतर नोंदणी जीवित असेपर्यंत त्या कामगारास मंडळाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी तो पात्र ठरतो.**

## सामाजिक सुरक्षा :

- नोंदणीकृत लाभार्थ्याला स्वतःच्या विवाहाच्या खर्चासाठी ३०,०००/- रुपये अनुदान म्हणून दिले जाते. त्यासाठी विवाह नोंदणीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
- नोंदणीकृत लाभार्थी कामगाराला मोफत मध्यान्ह जेवण सुविधा या योजनेअंतर्गत दिली जाते.
- प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेचा बांधकाम कामगारांना लाभ दिला जातो.
- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ नोंदीत पात्र असलेल्या बांधकाम कामगारांना उपयुक्त असलेली अवजारे खरेदी करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला ५००/- रुपये याप्रमाणे अर्थसाहाय्य दिले जाते. त्यासाठी अवजारे खरेदी करणार असल्याचे हमीपत्र देणे गरजेचे आहे.
- नोंदणीकृत कामगार लाभार्थ्याला प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत विविध लाभ दिले जातात.
- पात्र कामगारांना पूर्व शिक्षण आणि आवश्यक ते प्रशिक्षण या योजनेअंतर्गत मोफत दिले जाते.

- नोंदीत बांधकाम कामगाराच्या एका मुलीच्या विवाहाकरिता ५१,००० रु.
- सुरक्षा संच कामगारांना पुरवले जातात.
- दिनांक ३१ ऑगस्ट २०१४ रोजी नोंदणी केलेल्या जीवित असलेल्या बांधकाम कामगारांना दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी प्रति कामगार ३०,०००/- आर्थिक साहाय्य म्हणून प्रशिक्षण दिले जाते.

## शैक्षणिक साहाय्य

- नोंदणी केलेल्या लाभार्थी कामगारांच्या पहिल्या २ मुलांना पहिली ते सातवीमध्ये २,५००/- रुपये प्रोत्साहनात्मक शैक्षणिक आर्थिक साहाय्य म्हणून दिले जातात. त्यासाठी ७५ टक्के हजेरी बाबतचा दाखला देणे गरजेचे आहे.

- नोंदणी केलेल्या दोन मुलांना इयत्ता आठवी ते दहावीमध्ये ७५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण असले, तर रुपये ५००/- प्रतिवर्षी प्रोत्साहनात्मक शैक्षणिक आर्थिक साहाय्य म्हणून दिले जातात.
- इयत्ता ११ व १२ वी च्या शिक्षणासाठी प्रति शैक्षणिक वर्ष शैक्षणिक साहाय्य १०,००० रु.
- नोंदणीकृत लाभार्थ्यांच्या दोन मुलांना इयत्ता दहावी व इयत्ता बारावी मध्ये कमीत कमी ५० टक्के किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रुपये १०,०००/- शैक्षणिक आर्थिक साहाय्य म्हणून दिले जातात. त्यासाठी ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण असल्याचे गुणपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
- कामगाराच्या दोन पाल्यांना अथवा पुरुष कामगार यांच्या पत्नीला पदवीच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचा प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामग्री साठी प्रतिवर्षी २०,०००/- रुपये शैक्षणिक साहाय्य म्हणून दिले जाते. त्यासाठी मागील शैक्षणिक इयत्तेत उत्तीर्ण झालेले प्रमाणपत्र किंवा गुणपत्र आणि चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्याची पावती किंवा बोनाफाईड सादर करणे आवश्यक आहे.
- नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांच्या दोन पाल्यांना किंवा पत्नीला वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात संस्थेत प्रवेश घेण्यासाठी पुस्तके व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रत्येक शैक्षणिक वर्षी पदवी अभ्यासक्रमासाठी रुपये १ लाख व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी रुपये ६०,०००/- शैक्षणिक साहाय्य म्हणून दिले जातात. त्यासाठी मागील शैक्षणिक इयत्तेत उत्तीर्ण झालेले प्रमाणपत्र आणि चालू शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या बाबतची पावती सादर करणे आवश्यक आहे.
- बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना शासनमान्य पदविकेमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलास प्रति शैक्षणिक वर्षी २०,०००/- रुपये आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असल्यास प्रति शैक्षणिक वर्षी २५,०००/- रुपये आर्थिक साहाय्य म्हणून दिले जातात.
- कामगाराच्या दोन मुलांना संगणकाचे शिक्षण एमएस-सीआयटी घेत असलेल्या नोंदणीकृत कामगारांच्या मुलांना शुल्काची परिपूर्ती, तसेच एमएस-सीआयटी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यास त्याचे शुल्क शैक्षणिक आर्थिक साहाय्य म्हणून दिली जाईल.
- पाल्यांना व्यक्तिमत्त्व विकास पुस्तक संचाचे वाटप या योजनेंतर्गत केले जाईल.

## आरोग्यविषयक साहाय्य

- नोंदणीकृत स्त्री बांधकाम कामगार असो किंवा पुरुष बांधकाम कामगार पत्नीला नैसर्गिक प्रसूतीसाठी १५,०००/- रुपये व शस्त्रक्रियेद्वारे प्रसूतीसाठी २०,०००/- रुपये आर्थिक साहाय्य दिले जाते. त्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले नैसर्गिक किंवा शस्त्रक्रियेद्वारे प्रसूतीचे प्रमाणपत्र आणि उपचाराची देयके सादर करणे आवश्यक आहे.
- जर कामगार लाभार्थ्याच्या कुटुंबीयांना गंभीर आजार झाले, तर त्याच्या उपचारासाठी १ लाख रुपये वैद्यकीय साहाय्य एकाच सदस्यास एकाच वेळी कुटुंबातील २ सदस्यांपर्यंत मर्यादित देय आहे. तसेच आरोग्य विमा योजना लागू नसल्यास सदर योजनेचा लाभ दिला जातो. त्यासाठी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याने गंभीर आजाराबाबत दिलेले प्रमाणपत्र आणि वैद्यकीय उपचार कागदपत्रे सादर करावी लागतील.
- कामगाराच्या पहिल्या मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली, तर त्या मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत प्रत्येकी १ लाख रुपये मुदत बंद ठेव लाभ दिला जाईल. त्यासाठी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेले कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया बाबतचे प्रमाणपत्र आणि अर्जदार कामगाराला एक पेक्षा अधिक मुली नाहीत याचा पुरावा आणि शपथपत्र.
- नोंदणी केलेल्या कामगाराला ७५ टक्के किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्याला २ लाख रुपये आर्थिक साहाय्य म्हणून दिले जाते.
- जर बांधकाम कामगारांचे विमासंरक्षण असेल, तर विमा रकमेची परिपूर्ती किंवा मंडळामार्फत २ लाख रुपये आर्थिक साहाय्य यापैकी कोणताही एक लाभ दिला जातो. त्यासाठी ७५ टक्के अपंगत्व असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याकडे प्रमाणपत्र आणि वैद्यकीय उपचाराची देयके सादर करणे आवश्यक आहे.
- या योजनेअंतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेचा देखील लाभ घेता येणार आहे. कामगारांची वेळोवेळी तपासणी केली जाईल त्यासाठी शासकीय केंद्रातून उपचार घेतल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
- या योजनेअंतर्गत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेचा देखील लाभ घेता येणार आहे. कामगारांची वेळोवेळी तपासणी केली जाईल. त्यासाठी शासकीय केंद्रातून उपचार घेतल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

## आर्थिक साहाय्य

- नोंदणी केलेल्या लाभार्थ्याचा कामावर असताना मृत्यू झाला, तर त्याच्या वारसाला ५ लाख रुपये आर्थिक साहाय्य दिले जाते. त्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यू दाखला किंवा कामावर असताना मृत्यू झाला आहे असा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.
- नोंदणीकृत कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाला, तर त्याच्या वारसाला २ लाख रुपये आर्थिक साहाय्य म्हणून दिले जाते. त्यासाठी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला सादर करणे गरजेचे आहे.

- नोंदणी केलेल्या लाभार्थ्याला लाभार्थी कामगाराचा जर मृत्यू झाला, तर त्याच्या नामनिर्देशित वारसाला १०,०००/- रुपये त्याच्या अंत्यविधीसाठी मदत म्हणून दिले जातात. त्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिले मृत्युपत्र आवश्यक आहे.
- कामगाराचा मृत्यू झाला, तर त्याच्या विधवा पत्नीला अथवा स्त्री कामगाराचे निधन झाले, तर विधुर पतीला पाच वर्षांपर्यंत प्रतिवर्षी २४,०००/- रुपये आर्थिक मदत म्हणून दिले जातात. त्यासाठी सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला मृत्यूचा दाखला गरजेचा आहे.
- नोंदणी केलेल्या बांधकाम कामगाराला अटल बांधकाम कामगार आवास शहरी योजने अंतर्गत २ लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य केले जाते. त्यासाठी तो कामगार प्रधानमंत्री आवास योजनेसाठी पात्र आहे याचे सक्षम अधिकाऱ्याचे पत्र देणे आवश्यक आहे.

  घर बांधण्यासाठी ४.५ लाख रुपये अर्थसाहाय्य दिले जाते. त्यामध्ये केंद्र शासनाकडून २ लाख रुपये आणि कल्याणकारी मंडळाकडून २.५ लाख रुपये दिले जातात.

- घर बांधण्यासाठी किंवा घर खरेदी करण्यासाठी बँकेकडून घेतलेल्या घर कर्जावरील व्याजाची रक्कम दोन लाख अनुदान स्वरूपात दिली जाते. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेत कर्ज घेतल्याचा पुरावा किंवा कर्ज किंवा घर पती-पत्नीच्या संयुक्त नावे असल्याचा पुरावा गरजेचा आहे.
- महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगारांकरिता व्यसनमुक्ती केंद्र उपचाराकरिता नोंदीत कामगारास रुपये ६,०००/- आर्थिक साहाय्य म्हणून दिले जातत.



## प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना

कोविड-१९ कालावधीत आणि परिणामी टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजीविकेवर विपरित परिणाम झाला. पथविक्रेते कमी भांडवलावर पथविक्री करतात आणि जे काही भांडवल त्यांच्याकडे होते ते या टाळीबंदीमध्ये शिल्लक राहण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे पथविक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरु करण्यासाठी खेळत्या भांडवलाचा पतपुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी - पथविक्रेत्यांसाठी विशेष सूक्ष्म पतपुरवठा सुविधा योजना सुरू केली असून रुपये दहा हजारापर्यंत खेळते भांडवली कर्ज उपलब्धतेसाठी सुलभीकरण करणे, नियमित परतफेड करण्यासाठी प्रोत्साहन देणे आणि डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे या उद्देशाने महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती क्षेत्रातील पथविक्रेत्यांचा शोध घेऊन त्यांना योजनेचा लाभ उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर कर्जासाठी कर्जपुरवठा करणारी संस्था किंवा बँक कोणत्याही प्रकारचे तारण घेणार नाही. व व्याजदर प्रचलित दराप्रमाणे असतील.

कर्जाचा लाभ घेणाऱ्या पथविक्रेत्यांनी विहित कालावधीमध्ये कर्जाची परतफेड केल्यास ते सात टक्के व्याज अनुदान मिळण्यास पात्र होतील. व्याज अनुदानाची रक्कम अर्जदाराच्या खात्यात तिमाही प्रमाणे तीन महिन्यांच्या अंतराने म्हणजेच एक वर्षातून चार वेळा जमा केली जाईल

**पीएम स्वनिधीच्या सर्व लाभार्थ्यांचे सामाजिक आर्थिक सर्वेक्षण करून केंद्र शासनाच्या पुढील आठ योजनांचा लाभ द्यायचा आहे.**

- प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना.
- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना .
- प्रधानमंत्री जनधन योजना व रुपे कार्ड.
- इमारत व इमारत बांधकाम अंतर्गत नोंदणीकरण.
- प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना.
- एक राष्ट्र एक राशन कार्ड .
- जननी सुरक्षा योजना.
- प्रधानमंत्री मातृ वंदना योजना.

सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येणार आहे.

# घरेलू कामगार

## घरेलू कामगारांची नोंदणी-

- वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या; परंतु ६० वर्षे पूर्ण न झालेल्या घरेलू कामगारांची लाभार्थी नोंदणी.

**नोंदणी शुल्क व मासिक अंशदान :**

घरेलू कामगारांकडून प्रत्येकी रु. ३०/- नोंदणी फी व रु. ५/- मासिक अंशदान याप्रमाणे वार्षिक ६०/- अशी एकूण ९०/- रुपये.

नोंदणी एक वर्षाकरिता असून वर्षाअंती त्याचे नूतनीकरण घरेलू कामगाराने करावयाचे आहे.

**मंडळातर्फे देण्यात येणारे लाभ :**

**१. अंत्यविधी साहाय्य :** मृत घरेलू कामगाराच्या कायदेशीर वारसास अंत्यविधी साहाय्य रु.२,०००/- देण्यात येते.

**२. प्रसूती लाभ :** घरेलू कामगार मंडळाच्या दि. २८.०९.२०१२ च्या बैठकीत घरेलू कामगारांना प्रसूतीलाभ देण्याबाबत ठराव करण्यात आला असून त्याअंतर्गत घरेलू कामगारास दोन अपत्यापर्यंत प्रत्येक प्रसूतीकरिता रु. ५,०००/- इतकी मदत देण्यात येते.

**सन्मानधन लाभ :**

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळातर्फे दिनांक ३१/१२/२०२२ रोजी वयाची ५५ वर्ष पूर्ण केलेल्या नोंदीत व मागील सलग २ वर्ष जीवित नोंदणी असलेल्या पात्र घरेलू कामगारांना महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळाच्या निधीतून सन्मानधन योजना २०२२ अंतर्गत रुपये १०,०००/- एवढी रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात डिबीटीद्वारे जमा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने सर्व जिल्हा कार्यालयांमार्फत लाभ वाटप सुरू करण्यात आले आहे.

## प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना

पात्र लाभार्थींना वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर दरमहा ३,०००/- रुपये लाभ मिळणार आहे.

## ई- श्रम पोर्टल नोंदणी-

असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे व

दिनांक २६/०८/२०२१ पासून असंघटित कामगारांची नोंदणी करण्याकरिता ई-श्रम पोर्टल सुरू करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील सीएससी (कॉमन सर्विस सेंटर) मार्फत असंघटित कामगारांची नोंदणी ई- श्रम पोर्टलवर सुरू करण्यात आली आहे.

# आवास योजना



# घरकुलाच्या योजना

## प्रधानमंत्री आवास योजना (नागरी)

- झोपडपट्टीची जमीन हा स्त्रोत वापरून खासगी विकासकांच्या सहभागाने झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन.
- क्रेडिट लिंक्ड अनुदानाच्या माध्यमातून दुर्बल घटकांसाठी परवडणाऱ्या घरांना प्रोत्साहन.
- सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांच्या भागीदारीतून स्वस्त/परवडणारी घरे.
- लाभार्थींच्या पुढाकाराने करण्यात येणारी खासगी घरबांधणी किंवा सुधारणा यासाठी अनुदान.
- लाभार्थींमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गट यांचा समावेश होतो. वार्षिक उत्पन्नाची मर्यादा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी ३ लाखांपर्यंत आणि अल्प उत्पन्नगटासाठी ३ ते ६ लाखांपर्यंत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक गटातील लाभार्थी अभियानाच्या चारही योजनांकडून मिळणाऱ्या साहाय्यासाठी पात्र आहेत. तर अल्प उत्पन्न गट केवळ क्रेडिट लिंक्ड अनुदान योजना या अभियानातील घटकाच्या अंतर्गत पात्र आहे.

## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) -

- ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील बेघर/कच्चे घर असलेल्या कुटुंबांना घरकूल बांधकामासाठी अर्थसाहाय्य देणे हा योजनेचा उद्देश आहे.
- लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायतीमार्फत केली जाते. ग्रामपंचायतीमार्फत तयार केलेली कायम प्रतीक्षा यादी ग्रामपंचायतीच्या सूचनाफलकावर प्रसिप्रसिद्ध केली जाते. लाभार्थ्यांना घरकूल बांधकामासाठी रू. १,२०,०००/-इतके अर्थसाहाय्य दिले जाते.
- घरकूल अनुदानाव्यतिरिक्त महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत ९०/९५ दिवसांच्या अकुशल मजुरीच्या स्वरूपात अर्थसाहाय्य दिले जाते.
- स्वच्छ भारत अभियानतंर्गत घरकुल लाभार्थ्यांना शौचालयासाठी स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करून दिला जातो.

## रमाई आवास योजना- १५ लाख घरे (किमान २५००० घरे मातंग समाजासाठी)

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गातील लोकांसाठी

**वैशिष्टे:**

१. कच्चे घर असणाऱ्या कुटुंबांना नवीन पक्के घर बांधकामासाठी आर्थिक साहाय्य.
२. प्रपत्र ड मध्ये नोंद असणे आवश्यक.
३. लाभार्थींची प्राधान्यक्रमाने निवड.
४. घर बांधकामासाठी १,२०,०००/- रू इतकी तरतुद
५. मनरेगा माध्यमातून लाभार्थ्यास ९० दिवसांचा रोजगार उपलब्ध
६. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत शौचालय बांधण्यास स्वतंत्र आथिक तरतूद.

**लाभार्थींची निवड :**

रमाई या योजनेसाठी लाभार्थींची निवड ही "सामाजिक, आर्थिक, जात सर्वेक्षण २०११" नुसार अत्यंत पारदर्शकपणे केली जाते.

## शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना

आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी तसेच आदिवासीबाह्य क्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यांतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घराचे २६९ चौ.फु. चटई क्षेत्र असलेले पक्के घरकूल उपलब्ध करून देणे.

अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्नमर्यादा खालीलप्रमाणे:-

अ) ग्रामीण क्षेत्र रु. १ लाख.

ब) नगरपरिषद क्षेत्र रु. १.२९ लाख.

क) महानगरपालिका क्षेत्र रु.२ लाख.

घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढील प्रमाणे आहे.

अ) ग्रामीण साधारण क्षेत्र: रु. १.२० लाख नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी : रु.१.३० लाख.

ब) नगरपरिषद क्षेत्र : रु.१.५० लाख.

क) महानगरपालिका क्षेत्र रु.२ लाख.

## अटल बांधकाम कामगार आवास योजना-

अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत पात्र ठरलेल्या बांधकाम कामगारांनी किमान २६९ चौ. फूट इतके चटई क्षेत्र असलेले घर बांधकाम करणे आवश्यक आहे. त्या करिता रु १.५० लाख एवढे अनुदान देय राहील. मात्र, लाभार्थ्यास त्यापेक्षा जास्त क्षेत्राचे बांधकाम स्वखर्चाने करण्यास मुभा राहणार आहे.

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

- या योजनेंतर्गत निवड झालेल्या विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या कुटुंबास प्रत्येकी ५ गुंठे जमीन देऊन त्यांना २६९ चौरस फूटचे घर बांधून दिले जाते. उर्वरित जागेवर लाभार्थी कुटुंबास शासकीय योजनेद्वारे स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाते.
- भूखंड कोणालाही हस्तांतरित करता येणार नाही किंवा विकता येत नाही किंवा भाडेतत्त्वावर देता येणार नाही.
- प्रति वर्षी ३४ जिल्ह्यातील (मुंबई व बृहन्मुंबई वगळून) प्रत्येकी तीन गावे निवडून त्या गावातील कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. झोपडीत राहणारे दारिद्र्यरेषेखालील कुटुंब ज्यांच्या घरात कमावणारा व्यक्ती नाही अशा विधवा, दिव्यांग, महिला आणि पूरग्रस्त कुटुंबे यांना या योजनेअंतर्गत प्राधान्याने निवड करून लाभ देण्यात येतो.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसाहाय्य योजना

काही बेघरांकडे स्वतःच्या मालकीची जागा नसल्याने त्यांना घरकुलाचे लाभ देणे अशक्य होते. त्यासाठी केंद्र शासनाने "पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी" योजनेकरिता ५०,०००/- किंवा प्रत्यक्ष जमिनीची किंमत यांपैकी जी रक्कम कमी असेल ती या योजनेतून मंजूर केली जाते, जेणेकरून प्रत्येक गरीब कुटुंबाला स्वतःचे घर उपलब्ध होईल.

## मच्छीमारांसाठी राष्ट्रीय कल्याण निधीअंतर्गत घरकूल योजना :-

राज्यातील भूजल आणि सागरी क्षेत्रातील ममच्छीमारांसाठी सुरक्षित निवारा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने घरे बांधून देणे, पिण्याच्या पाण्यासाठी कूपनलिका बांधून देणे, तसेच त्यांच्या सामूहिक उपक्रमांसाठी / कामासाठी समाज मंदिर बांधून देणे, इत्यादी मूलभूत सुविधा पुरविण्यात येत असून दारिद्र्यरेषेखालील आणि दुर्बल घटकातील मच्छिमारांना प्राधान्य देण्यात येते.

मच्छीमार सहकारी संस्थेच्या एकाच गावातील किमान २० सभासदांच्या गटास कुटुंबाला २५ चौ. मी. क्षेत्रफळाचे एक घरकूल बांधण्यासाठी रु.१.२० लक्ष व पिण्याच्या पाण्यासाठी २० घरकुलास १ कूपनलिकासाठी रु.५० लक्ष, किमान ७५ व त्यापेक्षा जास्त घरकुलाच्या समुहाकरिता समाजमंदिर बांधण्यासाठी ४.०० लक्ष इतके अर्थसाहाय्य केंद्र शासनाने निश्चित केले आहे. २५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या घरकुलात १ बैठकीची खोली, १ स्वयंपाकघर, शौचालय व न्हाणीघर यांचा समावेश आवश्यक आहे. समाज मंदिरासाठी २०० चौ. मी. क्षेत्रफळ आवश्यक असून त्यामध्ये दोन शौचालये व १ कूपनलिकेचा अंर्तभाव आहे.

# सार्वजनिक
# आरोग्य विभाग



## 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'

आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला आरोग्य उपचार मोफत मिळावेत यासाठी केंद्र शासनाकडून 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'राबविली जात आहे.
देशातील कोट्यवधी लोक या योजनेत सहभागी झाले आहेत. या योजनेतून लाभार्थ्याला ५ लाखापर्यंतचे मोफत उपचार दिले जातात.

## सरकारकडून मिळतं 'गोल्डन कार्ड'

कोणतीही व्यक्ती या योजनेसाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतींनी अर्ज करू शकते. 'आयुष्मान भारत योजना' ही भारत सरकारची आरोग्य योजना आहे. या योजनेतंर्गत सरकार लोकांना 'आयुष्मान भारत गोल्डन कार्ड' प्रदान करते. या योजनेंतर्गत आयुष्मान भारत गोल्डन कार्डद्वारे आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक रुग्णालयात जाऊन ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळवू शकतात.

## कोण करु शकतं अर्ज?

आयुष्मान भारत योजनेसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीचे वय १८ वर्ष किंवा त्याहून अधिक असावं. जर कोणी स्वतःहून या योजनेसाठी अर्ज करत असेल, तर त्या व्यक्तीचं नाव SECC-२०११ मध्ये असलं पाहिजे. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, SECC म्हणजे काय? SECC म्हणजे, सामाजिक आर्थिक आणि जातिगणना. तुम्हाला या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर तुमची पात्रता तपासावी लागेल. यासाठी तुम्हाला सर्वात आधी mera.pmjay.gov.in या वेबसाईटवर जावं लागेल.

## एकत्रित महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत

एकत्रित महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यात दि. १ एप्रिल २०२० रोजीपासून लागू करण्यात आली आहे. सुधारित स्वरुपात मे. युनायटेड इंडिया इन्श्युरन्स कंपनी लिमिटेड (सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी) एकत्रित योजनेतील लाभार्थ्यांना रु.१.५ लक्ष रकमेपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण विमा तत्वावर पुरवित आहे. पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा योजना शिधापत्रिकाधारक (प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांसह) लाभार्थी कुटुंबांच्या वतीने राज्य आरोग्य हमी सोसायटी प्रति कुटुंब प्रति पॉलिसी वर्ष रु.८५५/- विमा रक्कम त्रैमासिक हप्त्यांमध्ये विमा कंपनीस अदा करीत आहे.
महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेसाठी महाराष्ट्र शासनाकडून संपूर्णतः निधी प्राप्त होत आहे, तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेकरिता केंद्र व राज्य शासनाकडून अनुक्रमे ६०:४० या प्रमाणात निधी प्राप्त होत आहे.

### १) महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी:

**गट अ**

महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्ह्यामधील अन्न व नागरी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून वितरित करण्यात आलेल्या पिवळी शिधापत्रिका, अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिका, अन्नपूर्णा योजना, शिधापत्रिका व केशरी (रु.१ लक्षापर्यंत वार्षिक उत्पन्न ) शिधापत्रिकाधारक कुटुंबे.

**गट ब**

अवर्षणग्रस्त १४ जिल्ह्यातील ( औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा) शुभ्र शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबे.

**गट क**

१. शासकीय अनाथाश्रमातील मुले, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील महिला, शासकीय वृद्धाश्रमातील जेष्ठ नागरिक .
२. माहिती व जनसंपर्क कार्यालयाकडील निकषानुसार पत्रकार व त्यांच्यावर अवलंबित असलेले कुटुंबातील सदस्य.
३. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जीवित नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांची कुटुंबे.

### २) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी:

सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेच्या वंचित व व्यावसायिक निकषानुसार अनुक्रमे ग्रामीण व शहरी क्षेत्रातील कुटुंबांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

**लाभार्थ्यांचा तपशील**

शहरी भागातील खालील ११ व्यावसायिक गटातील कामगार योजनेसाठी पात्र आहेत.

कचरावेचक, भिक्षुक, घरगुती कामगार
गटई कामगार/ मोची/फेरीवाले/ रस्त्यावर सेवा पुरविणारे अन्य कामगार
बांधकाम कामगार / प्लंबर/ गवंडी कामगार/ रंगारी/ वेल्डर/सुरक्षा रक्षक/ हमाल व डोक्याने भार वाहणाऱ्या अन्य कामगार.
सफाईगार/स्वच्छक/ माळी.
घरकाम करणारे / हस्तकला कारागीर /शिंपी.
वाहतूक कर्मचारी/ चालक वाहक/ चालक व वाहकांचे मदतनीस हातगाडी ओढणारे / सायकल ओढणारे.
दुकानात काम करणारे / साहाय्यक / लहान आस्थापनांमधील शिपाई/ मदतनीस / अटेण्डट/वेटर
वीजतंत्री/मेकॅनिक / असेम्ब्ली / दुरुस्ती करणारे
धोबी व वॉचमन.

ग्रामीण भागाच्या एकूण ७ वंचित निकषांपैकी, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्ये खालील सहा वंचित निकषातील (D1 to D5 and D7 ) किमान एक निकषात बसणाऱ्या कुटुंबांचा व आपोआप समाविष्ट (बेघर, भिक्षुक, मुलतः आदिवासी समूह, सफाई कामगार कुटुंबे व कायदेशीर बंधपत्रित कामगार) निकषांतील कुटुंबांचा समावेश होतो.

D1 - कच्च्या भिंती व कच्च्या छताच्या एका खोलीत राहणारे कुटुंब .
D2- १६-५९ वयोगटातील प्रौढ सदस्य नसलेले कुटुंबे.
D3- १६-५९ वयोगटातील प्रौढ पुरुष सदस्य नसलेले कुटुंब.
D4- दिव्यांग कुटुंब प्रमुख असलेली कुटुंबे.
D5 अनुसूचित जाती व जमातीमधील कुटुंबे .
D7- भूमिहीन मजुराची कुटुंबे.

**पात्रता आणि ओळख:**

१) महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेतील लाभार्थी:

**पात्रतेचे निकष**

**गट अ**

सर्व पात्र लाभार्थ्यांची ओळख पिवळी, केशरी, अंत्योदय अन्न योजना व अन्नपूर्णा योजना शिधापत्रिका व त्यासोबत फोटो ओळखपत्र ( वैध ओळखपत्रांच्या यादीनुसार) याद्वारे पटविली जाते.

**गट ब**

महाराष्ट्रातील अवर्षणग्रस्त १४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पात्रता लाभार्थ्यांचे / कुटुंब प्रमुखाचे नाव असलेल्या ७/१२ उताऱ्यासह शुभ्र शिधापत्रिका किंवा लाभार्थी हा शेतकरी असल्याचे/ शेतकरी कुटुंबातील सदस्य असल्याचे नजीकच्या महसूल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व लाभार्थ्यांचे फोटो ओळखपत्र ( वैध ओळखपत्रांच्या यादीनुसार) याद्वारे निश्चित केली जाईल.

**गट क**

लाभार्थ्यांची पात्रता कोणतेही ओळखपत्र / आरोग्य पत्र / राज्य आरोग्य हमी सोसायटीने ठरविल्यानुसार निश्चित केली जाईल.

२) प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील लाभार्थी:

सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना २०११ मध्ये नोंदीत कुटुंबांतील सदस्य प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयात संगणकीकृत ई-कार्ड व फोटो ओळखपत्र दाखवून लाभ घेऊ शकतात.

प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत एका राज्यातील रुग्ण देशातील दुसऱ्या कोणत्याही राज्यातील अंगीकृत रुग्णालयांत जाऊन शस्त्रक्रिया / उपचारांचा लाभ घेऊ शकतो.

## पात्रता निकषाच्या कागदपत्रासोबत स्वीकारण्यात येणाऱ्या वैध ओळखपत्रांची यादी :

पॅन कार्ड,वाहनचालक परवाना, पासपोर्ट,
मतदार ओळखपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र,

शाळा/कॉलेज ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिक ओळखपत्र, रा. गां. जी. आ. योजनेचे ओळखपत्र, आधार कार्ड / लाभार्थ्यांच्या फोटोसह आधार नोंदणीपत्र, फोटोसह राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, केंद्र शासन / राज्य शासनाने निर्गमित केलेले जेष्ठ नागरिक ओळखपत्र, सैनिक कल्याण बोर्डाकडून वितरित केलेले सैन्यदलातील माजी कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र, सागरी मच्छीमार असल्याचे ओळखपत्र (कृषी/ मत्स्यव्यवसाय विभाग महाराष्ट्र शासन यांनी वितरित केलेले/, राज्य/ केंद्र शासनाने वितरित केलेले कोणतेही ओळखपत्र.

ओळखपत्राचा पुरावा म्हणून आधारकार्डचा आग्रह धरण्यात येईल आणि आधारकार्ड / क्रमांक उपलब्ध नसल्यास, आधारकार्ड तयार करण्यासाठी स्विकारण्यात येणाऱ्या कागदपत्रांपैकी कोणतेही कागदपत्र स्वीकारण्यात येतील.

## वार्षिक विमा संरक्षण मर्यादा :

**महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना**

१. उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति कुटुंब रु. १,५०,०००/- पर्यंतचे तर मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी रु. २,५०,०००/- विमा संरक्षण अनुज्ञेय.

२. कुटुंबांतील एक किंवा सर्व सदस्य उक्त मर्यादेत लाभ घेऊ शकतात.

## आयुष्मान भारत

प्रधानमंत्री जन आरोग्य योजना

१. १२०९ उपचारांकरिता प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. ५ लक्षापर्यंत आरोग्य कवच.
२. देशातील कोणत्याही राज्यातील अंगीकृत रुग्णालयात उपचार घेण्याची सुविधा.
३. कुटुंबांतील एक किंवा सर्व सदस्य उक्त मर्यादेत लाभ घेऊ शकतात.
४. रु. १.५ लक्षापर्यंतचे विमा संरक्षण विमा कंपनीमार्फत तर रु. १.५ लक्षापुढील ते रु. ५ लक्षा पर्यंतचे कवच राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत हमी तत्त्वावर पुरवण्यात येते

### उपचारांचा समावेशः

एकत्रित योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये निवडक ३४ विशेष सेवा प्रकारांतर्गत शस्त्रक्रिया व चिकित्सा यावरील निःशुल्क उपचार.
महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये ९९६ शस्त्रक्रिया / चिकित्सा / उपचार आणि १२१ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा समावेश.
प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १२०९ शस्त्रक्रिया/चिकित्सा/उपचार (म. जो. फु.ज. आ. योजनेतील ९९६ उपचार + अतिरिक्त २१३ उपचार) समाविष्ट असून यामध्ये १८३ (म.जो. फु.ज. आ. योजनेतील १२१ सेवा+ अतिरिक्त ६२ सेवा) शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा अंतर्भाव.

### विशेष सेवा प्रकार

१ .जळीत २. हृदयरोग ३. हृदयरोग शस्त्रक्रिया व उपचार ४.आकस्मिक सेवा ५.त्वचारोग,
६.अंतःस्त्राव संस्थेचे विकार ७. कान, नाक व घसा रोग ८. सर्वसाधारण औषधशास्त्र चिकित्सा
९. सर्वसाधारण शस्त्रक्रिया १०.१व्याधी चिकित्सा ११. संसर्गजन्य आजार
१२.इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी १३ जठरांत्रमार्गाचे रोग १४.कर्करोगावरील औषधोपचार
१५ नवजात व बालरोग वैद्यकीय व्यवस्थापन १६ .मूत्रपिंड विकार १७.मज्जातंतूचे विकार
१८. मज्जातंतूच्या विकारावरील शस्त्रक्रिया १९.स्त्री रोग व प्रसूती शास्त्र २० नेत्ररोग शस्त्रक्रिया
२१ अस्थिव्यंग शस्त्रक्रिया २२. बालरोग शस्त्रक्रिया २३.बालरोग कर्करोग २४.प्लास्टीक सर्जरी
२५.आस्कमिक वैद्यकीय उपचार २६ कृत्रिम अवयव उपचार
२७.फुफ्फुसाच्या आजारावरील उपचार २८. किरणोत्सर्गाद्वारे कर्करोग चिकित्सा
२९. संधिवात संबंधी उपचार ३०.जठर व आंत्र विकाराच्या शस्त्रक्रिया
३१ . कर्करोगाच्या शस्त्रक्रिया ३२.मूत्रवह संस्थेच्या विकारांवरील शस्त्रक्रिया
३३. मानसिक आजार ३४. जबडा व चेहऱ्याच्या अस्थीवरील शस्त्रक्रिया

शस्त्रक्रिया व उपचारांची यादी व त्यांचे पॅकेज दर-
**www.jeevandayee.gov.in >operational guidelines** वर उपलब्ध.

एकत्रित योजनेतील ९९६ उपचारांपैकी १३१ उपचार आणि केवळ प्र.मं. ज. आ. योजनेच्या २१३ उपचारांपैका ३७ उपचार केवळ शासकीय रुग्णालयांसाठी राखीव.

**समाविष्ट सेवा :**

- सर्वसाधारण वॉर्डमधील खाटांचे शुल्क.
- परिचारिका शुल्क.
- विशेषज्ञ, मूलतज्ज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचे शुल्क.
- तपासणी शुल्क, मुल, ऑक्सिजन, ऑपरेशन थिअटर व अतिदक्षता शुल्क.
  शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या साहित्याची किंमत.
- औषधे व द्रव्ये, कृत्रिम अवयवाची किंमत, रक्त संक्रमणाचे दर (राज्य शासनाच्या धोरणानुसार रक्त पुरविणे).
- इम्प्लॉट, एक्स-रे व निदान चाचण्या.
- आंतररुग्णास भोजन, डिस्पोजेबल व कन्झुमेबल.
  राज्य परिवहनाच्या दरानुसार किंवा रेल्वेच्या व्दितीय श्रेणी भाडे यानुसार वाहतूक खर्च .
- (रुग्णालय ते रुग्णाचे निवासापर्यंत).
- उपचारादरम्यान काही गुंतागुंत झाल्यास त्यासह संपूर्ण खर्चाचा अंतर्भाव.
- रुग्णाचा मृत्यू झाला तर रुग्णाचा मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत घेऊन जाण्याचा खर्च समाविष्ट.

**अंगीकृत रुग्णालये**

सद्यस्थितीत अंगीकृत रुग्णालये-१०००
शासकीय रुग्णालये- १९५
खासगी रुग्णालये- ८०५
रुग्णालयातील संबंधित व्यक्ती - आरोग्यमित्र
अंगीकृत रुग्णालयांच्या अधिक माहितीसाठी
**www.jeevandayee.gov.in > Network Hospitals**
अंगीकरणाकरिता
**www.jeevandayee.gov.in> Hospitals Hospital Empanelment Request**

**योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व कालमर्यादा**

उपचार / शस्त्रक्रियेस पूर्वमान्यता- १२ तास
आपत्कालीन परिस्थितीत उपचारांकरिता पूर्वमान्यता- तत्काळ
योजनेसंदर्भात कॉल सेंटरद्वारे माहिती- २४ तास X ७ दिवस

**टोल फ्री कॉल सेंटर क्रमांक:**

१) महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना १५५ ३८८ अथवा १८०० २३३२२००
२) आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य १४५५५ अथवा १८०० १११५६५

**क्षेत्रीय कार्यान्वयन**

क्षेत्रीय स्तरावर क्षेत्रीय व्यवस्थापक व प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा समन्वयक कार्यरत.
**www.jeevandayee.gov.in >staff directory** येथे संपर्क तपशील उपलब्ध,

# प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

## योजनेची वैशिष्ट्ये

- या योजनेत केंद्र शासनाचा 60 टक्के तर राज्य शासनाचा 40 टक्के सहभाग असणार आहे.
- कुटुंबातील पहिल्या अपत्यासाठी गरोदर असणाऱ्या सर्व पात्र गर्भवती महिला आणि स्तनदा माता या योजनेसाठी पात्र असतील.
- ही योजना एकवेळ आर्थिक लाभाची असून पहिल्या जीवित अपत्यापुरतीच मर्यादित असून या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.
- नैसर्गिक गर्भपात झाल्यास किंवा मृत बालक जन्मल्यास त्या टप्प्यापुरताच लाभ अनुज्ञेय राहील.
- या योजनेत दारिद्र्यरेषेखालील व दारिद्र्यरेषेवरील लाभार्थ्यांचा समावेश असला तरी वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या महिलांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

## योजनेचा लाभ कसा मिळेल

- पात्र लाभार्थी महिलांना योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने अधिसूचित केलेल्या संस्थेत गर्भवती महिलांना नोंदणी करणे आवश्यक आहे.
- उक्त लाभासाठी महिलेचे व तिच्या पतीचे सहमती पत्रे, दोघांचीही आधार संबंधित माहिती (आधार) आणि लाभार्थी महिलेचे आधार संलग्न बँक खाते अथवा पोस्ट खाते क्रमांक तसेच तिचा / पतीचा / कुटुंबातील सदस्याचा मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.
- प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या लाभाची रक्कम लाभार्थी महिलेच्या आधार संलग्न बँक खात्यात किंवा पोस्ट ऑफीसमधील खात्यात एकूण रुपये ५०००/- रुपयांची रक्कम तीन हप्त्यात जमा केली जाणार आहे.
- पहिला हप्ता रुपये १०००/-हा १५० दिवसात गर्भधारणा नोंदणी केल्यानंतर लाभार्थी महिलेच्या खात्यात जमा केला जाईल.
- दुसरा हप्ता रुपये २०००/- हा किमान एकदा प्रसवपूर्व तपासणी केल्यास गर्भधारणेचे सहा महिने पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी महिलेच्या खात्यात जमा केला जाईल.
- तिसरा हप्ता रुपये २०००/- हा प्रसूतीनंतर झालेल्या अपत्याची जन्मनोंदणी व बालकाच्या प्राथमिक लसीकरणाचा जन्मत: एक मात्रा बीसीजी, ओपीव्ही, हिपॅटॅटीस बी तसेच पेन्टाव्हॅलेन्टचे ३ व ओपीव्हीच्या ३ मात्रा अथवा समतुल्य लसीकरण पूर्ण झाल्यावर लाभार्थी महिलेच्या खात्यात जमा केला जाईल.
- लाभार्थी महिलेची शासकीय रुग्णालयात प्रसूती झाल्यास त्यांना जननी सुरक्षा योजनेंतर्गत रुपये ७००/- (ग्रामीण भागात) व रुपये ६००/- (शहरी भागात ) लाभ अनुज्ञेय राहील.

## मातृ वंदना योजनेसाठी संपर्क

**ग्रामीण क्षेत्र :**

- एएनएम पात्र लाभार्थींना विनाशुल्क विहित नमुना प्रपत्र १ अ चा अर्ज देऊन परिपूर्ण अर्ज स्वीकारेल व परिपूर्ण अर्ज प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत तालुका अधिकाऱ्यांकडे सादर करेल. हा अर्ज भरण्याची जबाबदारी एएनएमची राहील.
- प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी अर्जातील माहिती तपासून तो अर्ज तालुका अधिकाऱ्यांकडे जमा करतील.
- विहित संकेतस्थळावर तालुका अधिकाऱ्यांमार्फत लाभार्थी महिलेच्या अर्जाची माहिती भरण्यात येईल. राज्यस्तरावरून संगणक प्रणालीद्वारे थेट लाभ अदा करण्यात येईल.

**नगरपालिका क्षेत्र :**

- एएनएम पात्र लाभार्थींना विनाशुल्क विहित नमुना प्रपत्र १ अ चा अर्ज देऊन परिपूर्ण अर्ज स्वीकारेल. परिपूर्ण अर्ज हेल्थ पोस्ट वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्याधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल.
- हेल्थ पोस्ट वैद्यकीय अधिकारी अर्जातील माहिती तपासून तो अर्ज मुख्याधिकाऱ्यांकडे सादर करतील.
- मुख्याधिकारी विहित संकेतस्थळावर लाभार्थी महिलेच्या अर्जाची माहिती भरतील.

**महानगरपालिका क्षेत्र :**

- मुंबई तसेच इतर महानगरपालिका क्षेत्रात एएनएम पात्र लाभार्थी महिलेला विनाशुल्क विहित नमुना प्रपत्र १ अ चा अर्ज देऊन परिपूर्ण अर्ज स्वीकारतील. परिपूर्ण अर्ज वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल.

## मातृ वंदना लाभासाठी आवश्यक कागदपत्रे

- लाभाच्या पहिल्या टप्प्यासाठी तथा नोंदणीसाठी प्रपत्र 1 अ माता व बाल संरक्षण प्रमाणपत्र व आधार संलग्न बँक / पोस्ट खात्याची माहिती देणे आवश्यक आहे.
- लाभाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी प्रपत्र 1 ब माता व बाल संरक्षण प्रमाणपत्रावर किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी (ए.एन.सी) ची नोंद असणे अनिवार्य आहे.
- लाभाच्या तिसऱ्या टप्प्यासाठी प्रपत्र 1 क जन्म नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व बाळाला लसीकरणाचा पहिला खुराक दिल्याची नोंद असलेले माता व बाल संरक्षण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- आधारसंदर्भात नोंदणी / सुधारणा करण्यासाठी लाभार्थी प्रपत्र २ क चा वापर करेल.
- या योजनेच्या नोंदणीबाबतच्या माहितीमध्ये (पत्ता/भ्रमणध्वनी क्रमांक/बँक खाते क्रमांक/ नावात बदल / आधार क्रमांक ) सुधारणा करण्यासाठी प्रपत्र ३ चा वापर करावा.
- सदर प्रपत्रे अंगणवाडी सेविका / एएनएम तसेच आरोग्य संस्थेमध्ये विनाशुल्क प्राप्त होतील. तसेच लाभार्थींकडे आधार कार्ड / बँक खाते/ पोस्ट खाते नसल्यास सदर कार्ड व खाते काढण्यासाठी अंगणवाडी सेविका/एएनएम मदत करतील.

**या योजनेतून मातांना योग्य मार्गदर्शन, आहार प्राप्त होणार आहे.**

# बेबी केअर कीट योजना

- महिलांची प्रसूती अधिकाधिक प्रमाणात रुग्णालयात करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशातून सरकारने ही योजना सुरू केली आहे.
- शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात गरोदरपणाची नाव नोंदणी केलेल्या व प्रसूती झाल्यानंतर २ महिन्याच्या आत अर्ज सादर करणाऱ्या महिलांना पहिल्या प्रसूतीच्या वेळी बेबी केअर किट मिळणार आहे.
- जन्माला येणाऱ्या नवजात बाळाला २ हजार रुपये किमतीच्या बाळाच्या उपयोगातील "बेबी केअर किट" चा लाभ मिळणार आहे.

- नवजात बालकाचे कपडे,
- टॉवेल,
- मच्छरदाणी
- अंगाला लावायला तेल,
- ब्लँकेट,
- प्लास्टिक चटई,
- शाम्पू,
- नेलकटर,
- खेळणी,
- हातमोजे, पायमोजे,
- आईसाठी हात धुण्यासाठी लिक्विड बॉडी वॉश,
- झोपण्याची लहान गादी.

**हे सर्व साहित्य ठेवण्यासाठी लहान बॅग मिळणार आहे.**

**बेबी केअर किट योजनेचे लाभ**



- रुग्णालयांमध्ये मुलांना जन्म देण्यास प्रोत्साहन देणे.
- शिशु मृत्यु दर (आयएमआर) मध्ये कमी आणणे.



# शिक्षण विभाग



## ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी विशेष योजना

ऊसतोड कामगारांच्या मुलांची संख्या महाराष्ट्रात फार मोठी आहे, कारण २५ तालुक्यांतून साधारणतः ५ लाख कुटुंबे स्थलांतरित होतात. राज्यातील साखर कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर ऊसतोडणीसाठी हंगामी कामगार लागतात. त्यांच्या मुलांच्या शिक्षणात या काळात खंड पडून ती शाळा सोडतात.

ऊसतोड व अन्य हंगामी कामागारांसाठी साखर कारखान्यांच्या परिसरात साखरशाळा जिल्हा परिषदांमार्फत सुरु केल्या आहेत. अशा प्रकारची शाळा सप्टेंबर महिन्यात सुरू होते. सध्या महाराष्ट्र राज्यात पुणे-६, अहमदनगर -२, सोलापूर-३, सातारा-५ अशा साखरशाळा सुरू आहेत. तसेच ऊसतोड कामागारांच्या मुलांसाठी बीड जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर १ वसतिगृह सुरू करण्यात आले आहे.

मुलांचे स्थलांतर रोखण्यासाठी वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत.

## सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना

सावित्रीबाई फुले योजनेत शिक्षक कुटुंबाच्या भेटी घेऊन त्यांच्या मुली गरिबीमुळे वा अन्य कोणत्या कारणांमुळे शिक्षणव्यवस्थेतून गळण्याची शक्यता आहे, ते निश्चित करतात आणि अशा मुलींच्या शिक्षणासाठी समाजातील सुखवस्तू, दानशूर आणि सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या व्यक्तींना दरमहा ३० (रुपये तीस फक्त) रोख किंवा वार्षिक रुपये ३०० किंवा रुपये ३,००० एकदाच आठ वर्षांसाठी देण्याची विनंती करतात. अशा प्रकारे दत्तक मुलीला आठवीपर्यंचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले जाते.

राज्यात जिल्हास्तरीय निधींच्या आर्थिक व्यवहारासाठी सभापती, शिक्षण समिती, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यान्वित आहे. देणगीरूपाने गोळा झालेली रक्कम जिल्हा सहकारी बँक/बँक ऑफ महाराष्ट्र यामध्ये मुदतठेवीत ठेवली जाते व या रकमेवर मिळणाऱ्या व्याजातून लाभार्थ्यांना मदत केली जाते.

**महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागामार्फत खालील योजना राबविल्या जातात :-**

- मुलींची पटसंख्या वाढविण्यासाठी शिक्षकांना व शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके.
- दुर्बल घटकांतील मुलींना नियमित येण्यासाठी उपस्थित भत्ता देणे.
- शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या भागात प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती / जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरवठा.
- शैक्षणिकदृष्ट्या मागास १०३ विकासगटांतील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील इयत्ता १ ली ते ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांना विशेष सुविधा.
- प्राथमिक शाळांमध्ये मुलींच्या स्वच्छतागृहांची सोय करणे.

## प्राथमिक शाळेतील पुस्तकपेढी योजना

- समग्र शिक्षा अभियानांतर्गत अशी पाठयपुस्तके दिली जातात
- डोंगराळ, ग्रामीण, आदिवासी जाती व जमाती व दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते ४ थीमधील मुलामुलींना मोफत पाठ्यपुस्तके पुरविली जातात.
- प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या इयत्ता १ ली ते ४ थीमधील मुलांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविण्यात येतात.
- आर्थिक अडचणींमुळे मुलांना पुस्तके घेणे शक्य होत नाही, म्हणून पालकाने आपल्या पाल्यांना शाळेत न घालता घरी ठेवल्यामुळे, गळतीचे प्रमाण वाढते. ते प्रमाण कमी व्हावे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. या योजनेचा लाभ इयत्ता १ ली ते इयत्ता ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांना (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) दिला जातो.

## प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना

केंद्र आणि राज्य शासनाच्या शासनमान्य अनुदानित शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, अंशत: अनुदानित आणि अनुदानास पात्र असलेल्या खासगी शाळा, वस्ती शाळा, अनुदानित अपंग व मूकबधिर शाळा इत्यादी शाळांतील इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सन १९९५- ९६ पासून ८० टक्के उपस्थितीच्या आधारे ३ किलो तांदूळ मोफत देण्यात येत होता. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाकडील आदेशान्वये जून २००२ पासून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आणि जानेवारी २००३ पासून इतर सर्व शाळांमध्ये अन्न शिजवून देण्यात येत आहे.

ग्रामीण भागामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शालेय व्यवस्थापन समिती, शहरी भागामध्ये नगरपालिका, महानगरपालिका, शिक्षण मंडळे अथवा शिक्षण समित्या तर खासगी अनुदानित शाळांच्या बाबतीत संबंधित शाळेचे व्यवस्थापन यांच्याकडे अन्न शिजवून देण्याची जबाबदारी सोपविली आहे.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा देण्यात येतो.

ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबरच इतर धान्यादी मालाचा पुरवठा शाळास्तरावर करण्यात येतो.

शहरी भागामध्ये महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी स्वयंपाकगृह उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत शाळांमध्ये शिजविलेल्या आहाराचा पुरवठा करण्यात येतो.

या योजनेंतर्गत सद्य:स्थितीत फोर्टिफाईड तांदूळ केंद्र शासनाच्या भारतीय अन्न महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात येतो.

▶ (७) गणवेश भत्ता, पुस्तक व स्टेशनरी भत्ता, वाहतूक भत्ता, पाठ्यवाचक भत्ता, विद्यार्थी मूल्यांकन, अपंग विद्यार्थिनींसाठी स्टायपेंड, संरक्षक भत्ता.
(८) वैयक्तिक मदतीच्या उपकरणांची प्रत्यक्ष किंमत (उपकरणे, शैक्षणिक साहित्य, वैयक्तिक अध्ययन अध्यापन साहित्य).
(९) एकास दहा या प्रमाणात तीव्र अस्थिव्यंगाच्या मुलांसाठी शाळेत मदतनीस याची नियुक्ती.
(९) एकास दहा या प्रमाणात तीव्र अस्थिव्यंगाच्या मुलांसाठी शाळेत मदतनीस याची नियुक्ती.
(१०) विद्यार्थी जेथे शिक्षण घेतात तेथील वसतिगृहात राहत असतील, तर निवास व्यवस्था.
(११) शाळेच्या वसतिगृहात राहणाऱ्या तीव्र अस्थिव्यंगाच्या मुलांसाठी आया / मदतनीस यांना अनुदान.
(१२) शारीरिक उपचार सेवा.
(१३) अंधांकरिता स्क्रीन रीडिंग सॉफ्टवेअर खरेदी (जावा आणि साफा) कर्णबधिर मुलांसाठी वा चा ओळख, संगणकीय शब्दसंग्रह विकास कार्यक्रम.
(१४) मार्गदर्शक साहित्याची खरेदी, निर्मिती.

## प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना

केंद्र आणि राज्य शासनाच्या शासनमान्य अनुदानित शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, अंशत: अनुदानित आणि अनुदानास पात्र असलेल्या खाजगी शाळा, वस्ती शाळा, अनुदानित अपंग व मूकबधिर शाळा इत्यादी शाळांतील इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना सन १९९५- ९६ पासून ८० टक्के उपस्थितीच्या आधारे ३ किलो तांदूळ मोफत देण्यात येत होता. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाकडील आदेशान्वये जून २००२ पासून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना आणि जानेवारी २००३ पासून इतर सर्व शाळांमध्ये अन्न शिजवून देण्यात येत आहे.

ग्रामीण भागामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा शाळांमध्ये शालेय व्यवस्थापन समिती, शहरी भागामध्ये नगरपालिका, महानगरपालिका, शिक्षण मंडळे अथवा शिक्षण समित्या तर खाजगी अनुदानित शाळांच्या बाबतीत संबंधित शाळेचे व्यवस्थापन यांच्याकडे अन्न शिजवून देण्याची जबाबदारी सोपविली आहे.

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्राथमिक तसेच उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना आहाराचा पुरवठा देण्यात येतो.

ग्रामीण भागामध्ये तांदुळाबरोबरच इतर धान्यादी मालाचा पुरवठा शाळास्तरावर करण्यात येतो.

शहरी भागामध्ये महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी स्वयंपाकगृह उपलब्ध नाहीत अशा ठिकाणी केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत शाळांमध्ये शिजविलेल्या आहाराचा पुरवठा करण्यात येतो.

योजनेंतर्गत सद्य:स्थितीत फोर्टिफाईड तांदूळ केंद्र शासनाच्या भारतीय अन्न महामंडळामार्फत उपलब्ध करून देण्यात येतो.

## राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना

शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अपघाती विम्याचे संरक्षण देणे.
विद्यार्थी १ ली ते १२ वी मध्ये शिकणारा असावा.

**खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान मिळेल.**

१.अपघाती मृत्यू झाल्यास रु. १ लाख ५० हजार.
२.अपघातामुळे कायमचे अपंगत्व (२ अवयव / २ डोळे किंवा १ अवयव / १ डोळा निकामी ) झाल्यास रु. १ लाख.
३.अपघातामुळे कायमचे अपंगत्व (१ अवयव किंवा १ डोळा कायम निकामी )झाल्यास रु. ७५ हजार.
४. विद्यार्थ्यास अपघातामुळे शस्त्रक्रिया करावी लागल्यास प्रत्यक्ष हॉस्पिटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त रु. १,००,०००
५. विद्यार्थी आजारी पडून सर्पदंशाने किंवा पोहताना मृत्यू झाल्यास.रु. १,५०,०००.
६. विद्यार्थी कोणत्या कारणाने जखमी झाल्यास (क्रीडा स्पर्धेत खेळताना, शाळेतील जड वस्तू पडून, आगीमुळे, विजेचा धक्का, वीज अंगावर पडून)प्रत्यक्ष हॉस्पिटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त रु. १,००,०००

**संपर्क**

संबंधित शाळांचे मुख्याध्यापक / गट शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) / शिक्षण निरीक्षक

**(२) मोफत पाठ्यपुस्तक :**

लाभार्थी : इयत्ता १ली ते ८ वीच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व शासन अनुदानित शाळांतील सर्व विद्यार्थी. इयत्ता १ली ते ८ वीकरिता मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तेलगू, सिंधी, अरेबी, तामीळ व बंगाली माध्यमातील पाठ्यपुस्तकांची छपाई.

- पाठ्यपुस्तकांचा व लार्ज प्रिंटचा पुरवठा बालभारती, पुणे यांच्यामार्फत तर ब्रेल पुस्तकांचा पुरवठा नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइन्ड इंडिया, मुंबई यांच्यामार्फत.

बालभारती गोडाऊन ते केंद्रस्तरापर्यंत पाठ्यपुस्तकांची वाहतूक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत.

- शाळेच्या पहिल्या दिवशी लाभार्थी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वितरण शाळास्तरावरून करण्यात आले आहे.

**(३) २५ टक्के प्रवेश सुविधा**

- लाभार्थी शिक्षण हक्क कायद्यातील कलम १२ (१) (सी) नुसार दुर्बल घटक (ज्या कुटुंबाचे वार्षिक एकत्रित उत्पन्न रुपये एक लाखापर्यंत आहे अशा पालकांची बालके) व वंचित गटातील मुलांना (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि सर्व जाती धर्मातील दिव्यांग बालके) राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार खासगी विनाअनुदानित व खासगी कायम विनाअनुदानित शाळांमध्ये ( अल्पसंख्याक वगळून) २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश.

पात्र शाळा: सर्व माध्यमाच्या प्राथमिक शाळा (राज्यमंडळ, सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. व आय. बी. सह) विना अनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वयं अर्थसाहाय्यित (मदरसा, मक्तबा, धार्मिक पाठशाळा, अल्पसंख्यांक शाळा वगळून).
राज्य शासनाकडून शाळांना प्रथम शुल्क प्रतिपूर्ती.

# मुख्यमंत्री साहाय्यता निधी



# मुख्यमंत्री साहाय्यता निधी

महाराष्ट्र राज्यातील तसेच देशातील आपत्ती ग्रस्तांना तातडीने साहाय्य देणे, हे मुख्यमंत्री साहाय्यता निधीचे उद्दिष्ट आहे. पूर, दुष्काळ, आगीमुळे होणारे अपघात अशा मोठ्या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित नागरिकांना "मुख्यमंत्री साहाय्यता निधी" मार्फत अर्थसाहाय्य पुरविले जाते. समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दुर्धर आजारांवर उपचार करण्यासाठीही या निधीतून अर्थसाहाय्य पुरविले जाते.

मुख्यमंत्री साहाय्यता निधीची मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अंतर्गत "मुख्यमंत्री साहाय्यता निधी" या न्यासाची नोंदणी करण्यात आली आहे.

### निधीची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत

- राज्यातील तसेच उर्वरित देशातील नैसर्गिक आपत्तींमधील आपत्ती ग्रस्त व्यक्तींना मदत करणे.
- जातीय दंगलीत मृत व्यक्तींच्या वारसदारांना तसेच ज्यांना दुखापत झालेली आहे आणि / किंवा ज्यांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे, त्यांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे. दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या किंवा दुखापत झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.
- रुग्णांना उपचार आणि / किंवा शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.
  अपघाती मरण पावलेल्या (मोटार/रेल्वे/विमान / जहाज अपघात वगळता) व्यक्तींच्या वारसांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.
- आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदतीची आवश्यकता असणाऱ्या विविध संस्थांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.
  शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक चर्चासत्रे आणि संमेलने आयोजित करण्यासाठी आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.
  शैक्षणिक आणि वैद्यकीय आस्थापनांच्या इमारत बांधण्याकरिता अंशत: आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करणे.

महाराष्ट्र शासन

**संकल्पना व माहिती संकलन : मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष**

प्रकाशक - माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

www.mahasamvad.in /MahaDGIPR /MaharashtraDGIPR